# डॉ. नितीन मोरे



# सदू आणि दादू

# सदू आणि दादू

## डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# सदू आणि दादू

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# सद् आणि दाद्

लेखक: डॉ. नितीन मोरे, वसई

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ३० जानेवारी २०२२ (पौष वद्य त्रयोदशी, शके १९४३ )

©esahity Pratishthan®2022

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत: आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे छत्तिसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# सदू आणि दादू
# (४ पत्रकथा)

## डॉ. नितीन मोरे

# चार शब्द

प्रिय अमूक यास किंवा हिस

प्रिय तमूक याने किंवा हिने लिहिलेली पत्रे..

नि त्यातून साकारलेले कथानक..

म्हणजेच या पत्ररूपातील चार पत्रकथा..

डॉ. नितीन मोरे.

# सदू आणि दादू

अनुक्रम

१. सदू आणि दादू
२. अव्यक्त
३. धोबीपछाड
४. आता तरी येशील का ?

१

# सदू आणि दादू

प्रिय दादूस

तुला लिहायला बसलो की काय लिहावे कळत नाही.. नाही.. काय काय लिहावे कळत नाही! आपली भाषा किती लवचिक आहे नाही दादू? काय आणि काय काय मध्ये इतका फरक पडावा काय? काय! तू म्हणशील मी लिहितोय काय पण! पण खरे सांगतो मला याचे काय पण वाटत नाही! काय आहे तुला माहिती आहे माझ्या अशा काय पण लिहायची आणि काय काय असे शब्द खेळ खेळत बसायची सवय आहे मला! एकूण काय.. हाय काय आणि नाय काय! हो की नाय?

तर आता मूळ मुद्द्याकडे वळावे का? नकोच. तुला सवय आहे माझ्या अशा दळण मांडत हळूहळू मुद्द्यावर पोहोचायची. मला वाटते ती मोडू नये! त्यामुळे थोडे अजून परिचयात्मक प्रस्तावना वगैरे किंवा पह्यले नमन वगैरे लिहून मग मूळ मुद्द्याला स्पर्श करतो! नाहीतर तुझी अवांतर वाचनाची सवय मोडायची! अवांतर म्हणजे मुद्द्यास सोडून आजूबाजूचे

सारे वाचण्याची. आठवतेय आपण कॉलेजात असताना पण असे करायचो? आपण नाही मी! मी रोज तुला नुसता रोजचा पेपर वाच म्हटले तरी नाक मुरडायचास तू. पण शेवटी माझे ऐकून तू वाचू लागलास. त्याचा तुला किती फायदा झाला! म्हणजे तुझी ती नोकरी मिळण्यासाठी झालेल्या मुलाखतीत बातम्याच वाचून प्रश्न विचारलेत की काय असा प्रश्न पडावा! तर ते एक राहू दे.. मला यावरून एक गाणे सुचते आहे तेवढे सांगितल्यावाचून पुढे नाही जाता येणार..

दळण मांडू दे रे ..
माझे सारे दळणासाठी !

तर आता दळण! जात्यावर बसले की ओव्या सुचतात म्हणे! गंमत सांगू? मागे काही लिहायला सुचत नव्हते त्यामुळे मी चक्क जाते आणून सकाळी दळण्याचा प्रयत्न केला. हल्ली सारे रेडीमेड मिळते आणि गहू प्रत्यक्ष दळायचे तर एवढा स्टॅमिना कुठून आणायचा? मग मी रेडीमेड पीठच जात्यात डायरेक्ट घालून जाते फिरवत बसलो. तुला सांगू..

सकाळची मंगलमय वेळ.. पक्षी नुकतेच झोपेतून जागे झालेत.. जांभया देत कूजन करताहेत.. बाहेर दूधवाले नि पेपरवाल्यांचे आवाज येताहेत नि त्या वातावरणात काही ओळी सुचल्या मला जरूर. त्यातल्या काही तुला सांगितल्या नाहीत तर तोंड फुगवून बसशील. म्हणून लिहितोच.. वाच..

जात्याच्या जोत्यावर I बसला रं माझा दादूराया
दळण दळितो कांडितो I सदूराया

दळिता कांडिता जात्यावरी I ओवी सांडे  ओवरी वरी
देई रे देई जरा अक्कल त्यास I सदूराया

मागून घेईन अक्कल न लाजता I दादूसाठी रे आपल्या
देईल नाहीतर टपल्या I सदूराया

पाहिलेस दादू, या सदूस किती काळजी तुझी. मागे श्यामची आई अशा ओव्या आपल्या श्यामसाठी गात असे तशा मी दादूसाठी जात्यावर बसून गायलो. नुसताच गायलो नाही.. तर जे तुझ्याकडे असण्याची शक्यता नाही ते मागून घेतले मी त्या ओव्यांतून. असा तू माझा जिगरी दोस्त आहेस. माझ्या ओव्यांनी तुला नक्कीच भरून आले असणार हे मी इथूनही सांगू शकतो. उगाच नाही अख्खी चार वर्षे आपण एकाच रूम मध्ये होतो. आता वर्षे लोटली त्यास पण अजून आठवतात ते दिवस.

आठवतेय? पहिलाच दिवस आपला. मी रूम मध्ये शिरलो. तू आधीच बसलेलास येऊन. मी म्हणालो तुला, मी सदू.. तू कोण? तू म्हणालास, जमेल आपले नक्की.. मी दादू! खूप नंतर कळले तुझे नाव दादू

नव्हतेच.. तू कुणी भैरवनाथ नावाचा गडी होतास! कागदोपत्री. बाकीच्यांसाठी भैरू. माझ्यासाठी दादू! तुझ्या विनोदबुद्धीची ओळख पटली पहिल्याच दिवशी. ते एक बरे झाले. कारण विनोदच काय बाकी दुसऱ्या कुठल्या बुद्धीचेही दर्शन नंतर तू घडू दिले नाहीस लबाडा! अजून आठवतात ते दिवस.. म्हणूनच तर ओव्यांमधूनही तुझ्यासाठी खास अक्कल मागून घेतली आहे. मला तुझी किती काळजी हे पाहून तुझा ऊर भरून आला असणारच.

आपण तिकडे हॉस्टेलात तासन तास गप्पा मारायचो आठवतेय? काय बोलत असणार आपण? आता आठवत नाही. पण माझी ही विषयांतराची सवय तेव्हापासूनची. त्यामुळे त्यात तुला नवलाचे काही नाही. तर तुला सांगावयाचे ते एक..

काल संध्याकाळी आकाश भरून आले. त्यात तुझी आठवण आली. म्हणून लिहितोय हे पत्र. आणि हाच गड्या पत्राचा मुख्य मुद्दा..

मेरा दादू गया रंगून
किया नै वहांसे टेलिफून..
तुम्हारी याद सताती है!

पत्राच्या शेवटी मुख्य मुद्दा लिहावा ही माझी जित्याची खोड! तुला ती ठाऊक आहेच.

पत्र लिहिच.

वाट पाहतोय.. रिक्षावाला! हे शेवटचे उगाच. दिवस गणपतीचे. बाप्पा हे गाणे ऐकल्याशिवाय मोदकांना तोंड.. सॉरी सोंड लावत नाही म्हणे! त्यामुळे हे गाणे ऐकून ऐकून म्हटले तुलादेखील या उच्च दर्जाच्या काव्याची अनुभुती द्यावी.. म्हणून आपले ते वाट बघतोय रिक्षावाला!

चल.. लेखनसीमा

तुझा

सद्या

ता.क. आपल्या वर्गातील सीमा साखरदांडे दिसली होती त्या दिवशी. सुटलीय चांगलीच.. म्हणजे तू सुटलास! असो.

ता.क. २

लिहिण्याकरिता काही कथाकाव्य बीजे असल्यास पाठव. इकडे रूजवून त्याचे झाड उगवता आले तर पाहातो.

बाय

सद्या

***

प्रिया सदूरायास,

तुझे अत्यंत जिव्हाळयाचे पत्र पावले. संतोष जाहला. त्यातील तिरकस टोमण्यांनी तू इतक्या वर्षांत काहीच बदलला नाहीस इतके कळाले.

आपली मैत्री किती गाढ असावी याचा प्रत्यय तुझ्या ओव्या वाचून आला. ज्या गोष्टीची स्वतःस गरज आत्यंतिक आहे ती सोडून तू माझी चिंता करतोयस हे पाहून भरून आले. स्वतः सोडून माझ्यासाठी तू अशी प्रार्थना करावीस यातच सर्व आले. तसा तू त्यागी आधीपासूनच होतास. तू अभ्यासाचा त्याग करून कट्ट्यावर वेळ घालवीत असायचास ते आठवते. असेच बारीकसारीक त्याग तू तेव्हा करायचास ते आठवून मन भरून आले.

तर आधी तुझ्या ताकाबद्दल.. म्हणजे ताज्या कलमांबद्दल. सीमाच्या बद्दल तू आठवण करून दिलीस आणि मन त्या रम्य आठवणींत रमून गेले. साखरदांडे तेव्हा उसाच्या चिपाडासारखी होती ती सुरणाचा गड्डा बनलीस म्हणालास.. एकच प्रश्न.. तू तिला ओळखलेस कसे?

दुसरे.. कथा आणि काव्यबीजे पुरवण्याचा व्यवसाय माझा नाही. असली कामे स्वतःच स्वतःची करून स्वावलंबी व्हावे म्हणजे कुणापुढे कुणी आयडिया देता का आयडिया असा हात पसरावा लागत नाही! तूर्तास.. समज ती सीमा तुझ्या मनातली एक सुंदरी होती.. आज तू तिला

पाहिलेस.. मग तुझ्या विद्ध मनोवस्थेबद्दल काढ पाने भरून! एक बीज इथे दिसतेय.. घाल खतपाणी आणि वाढतोय का वृक्ष बघ तुझ्या कथेचा.

तुला माझी आठवण आली याबद्दल खरेच मन भरून आले. रूममधल्या पहिल्या दिवसाबद्दल लिहून तू आठवणी जागवल्यास त्याबद्दल धन्यवाद. त्यादिवसांत तू तुझी होती नव्हती तितकी बुद्धी वापरून संपवली असणार. आम्ही पुरवून वापर करणारे. त्यामुळे बुद्धिमत्तेचा पुरवठा माझ्याकडे अजूनही सुरळीत आहे. फक्त कथा काव्य बीजांप्रमाणेच बुद्धी पुरवण्याचाही व्यवसाय नसल्याने क्षमस्व!

आता माझे म्हणून काही पत्रात स्वतंत्र लिहिणे ..

मागे एक लावणी वाचली.. होय ती बघणे माझ्या तब्येतीत बसत नाही.. ते असो. पण त्यात अत्तराचा फाया .. तुम्ही मला आणा राया असे काही होते.. मला सुंदराताईची आठवण आली. तिने पण असेच काही म्हटले असते.. अत्तराचा फाया मला आणा सदूराया! सुंदरा कुठे असते रे आजकाल? म्हणजे तिचाही भोपळा झाला की काय? पण तुझ्या सुटलेल्या पोटाची शपथ.. सुंदरा तुला नक्कीच मिस करत असणार!

बाकी आमचे राज्य इथे व्यवस्थित आणि सुरळीत सुरू आहे. त्यामुळे चिंता नसावी. आणि मी काही तुझ्यासारखा लेखक किंवा कवी नाही. त्यामुळे वेडेवाकुडे लिहीन त्यास गोड मानून घेणे.

खरेतर तुझे पहिलेच वाक्य माझ्याबाबतीत खरे. तुला काय काय लिहू हे कळत नाही आणि मला काय लिहू ते! तरीसुद्धा मी आपल्या कॉलेजच्या मवांम मध्ये एक कविता बिनधास्त लिहिली होती.. आठवत असेल तुला की ठाऊक नाही. पण तुझ्या ओव्यांना उतारा म्हणून चालेल का तूच बघ.

ऐका ऐका हो सर्वत्र
आमचा आहे एक मित्र
होते त्याचे पहिले सत्र
लिहिले (प्रेम)पत्र तयाने

प्रिये तुजवीण मी उदास
म्हणतो कवी देवदास
टाईट अति हा प्रेमपाश
मम हृदयास पाडितो घरे

तू माझे गे हृदयस्वामिनी
वाग्ववरदे विलासिनी
ह्दयावरूनी हे गजगामिनी
तू तुडवुनी जाऊ नये

चल वेगीने चाल गे सुंदरा
होडी आली असे बंदरा
प्रवेशण्या मम मनमंदिरा
येशी ना तू तातडीने

वाट पाहितसे मी व्याकूळ
देवासी वाहून खोबरे न गूळ
न समजावे यास खूळ
होशील ना प्रसन्न?

एवढ्या वर्षांनीदेखील मला शब्द न शब्द आठवते ती कविता. कारण काय असेल त्याचे सांग? काही तर्क? अरे एकच कारण.. की ही माझ्या आयुष्यात केलेली पहिलीच.. आणि शेवटची कविता! माझ्या लग्नानंतर नि त्याआधीही माझ्या हिच्यासाठी मी तुझ्याकडूनच कविता लिहून घेतल्या होत्या.. आठवते ना? वहिनींची मजा आहे.. काव्यप्रसूती यंत्रच घरी आहे तुमच्या! त्यातून छपाई यंत्रासारखा खाडखाड आवाज येत असतो का? असल्यास कळवणे. माझ्या माहितीतील एका मेकॅनिकला जरूर पाठवून देईन. यंत्र दुरूस्तीसाठी. अरे मित्रच मित्राच्या कामी नाही आला तर कोण येईल?

असो. पत्र फारच लांबलेसे वाटते का? किंवा तू वाचताना कंटाळलास का? असल्यास लिहिण्याचे सार्थक झाले म्हणावे! त्यामुळे मी कृतार्थ आहे.

तुझे उत्तर येईलच.

तुझा

दादूमिया

ता. क.

आपल्या मैत्रीचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्याची वेळ झाली. तुझी तब्येत बरी नसल्याचे कानी आले होते. काळजी घेणे. तुम्ही आम्हाला खूप हवे आहात. तुम्ही नसलात तर या पामराने कोणाच्या तोंडाकडे पाहात तुमचेच पाय खेचावेत?

दादू

***

प्रिय दादूमियास,

तातडीने सावकाश उत्तर दिल्याबद्दल आभार. तुझे पत्र हाती आले आणि ते मी अधाश्यासारखे वाचून काढले असे तुला वाटेल. साहजिकच आहे. पण तसे काही नाही. तरी तुझ्या पत्राने संतोष जाहला हे खरे. कित्येक वर्षांनंतर हा पत्रव्यवहार जुन्या दिवसांची आठवण करून देतो.

साखरदांडी बद्दलच्या प्रश्नातली खोच.. त्यास सीमा नाही. तू होतास तसाच आहेस.. आनंद आहे! पण एका लग्नात ती स्वतःहून येऊन भेटली.

स्वतःची ओळख करून दिली तिने. तेव्हा तिने मला कसे ओळखले असा प्रश्न विचारणे जास्त संयुक्तिक व्हावे नाही का? हवे असल्यास तिचा पत्ता कळवतो. कळीचा नारद होण्यास माझी हरकत नाही! तुझे कथाबीज पावले. त्याचा वटवृक्ष बनवण्याचा प्रयत्न करीन. पण त्यातून तृणपाते जरी उगवले तरी धन्य म्हणावे असे माझ्या मेंदूचे झाले आहे. आजकाल लिहावयास सुचत नाही. तुला पत्रे लिहित बसावे लागते. यावरून किती मंदी मेंदूतील या लेखन विभागात असावी याचा अंदाज यावयास हरकत नाही. असो. मंदी सगळीकडेच आहे आजकाल. बाजारपेठाही ओस पडल्याचे पेपरात वाचले. आठवले म्हणून जाता जाता हा प्रश्न विचारून घेतो.. पेपर वाचायची सवय सुरू ठेवलीस की नोकरी मिळाल्यानंतर सोडून दिलीस? माझे ऐक. वाचन सुरू ठेव. कुठे उपयोगी पडेल सांगता येत नाही.

बाकी भैरू पैलवान कसा आहे? तुझ्या उजाड अशा डोक्याची शपथ घेऊन काही लिहावेसे वाटते पण माझ्या सुटलेल्या पोटाचा अस्थानी उल्लेख करून तू गाठलेल्या पातळीइतका मी खाली कसा जाऊ? सुंदरा कविता (तिच्याइतकीच) सुंदर आहे. मी ती वाचलेली आठवते. आणि त्यानंतर तू कवितालेखन बंद केलेस हा तुझ्या सूज्ञपणाचा पुरावाच मानला पाहिजे! तुझ्या अशा सूज्ञपणामुळेच तुझी आणि माझी मैत्री झाली आणि टिकली आहे इतकी वर्षे. नाहीतर तू मित्र म्हणून माझी निवड केली असतीस का? तुझ्या निवडीबद्दल तुला नक्कीच अभिमान वाटला पाहिजे!

तुझ्या एकास एक ठोश्यामुळे शाब्दिक बॉक्सिंग खेळल्याचा भास झाला. तुझ्या एका मैत्रिणीच्या उल्लेखास माझी एक! माझ्या ओव्यांच्या उत्तरात तुझी एक कविता! असो. खेळाची तुझी आवड अजून टिकून आहे. फक्त पैलवानी सोडून बॉक्सिंग करतोस असे वाटते. आनंद आहे!

काव्यप्रसूती यंत्र हल्ली बंद आहे. काव्यनिर्मितीचाच खडखडाट असल्याने यंत्राच्या खडखडीचा प्रश्न नाही! तरी तो मेकॅनिक ते यंत्रच सुरू करून देत असल्यास त्यास पाठवणे! कमीत कमी पुढच्या दिवाळी अंकांसाठी बेगमी करीन. या वर्षी माझे असंख्य वाचक माझ्या लिखाणास मुकणार पण पुढील वर्षी काही होते का ते पाहता येईल. तरी देखील एक खास तुझ्यासाठी म्हणून कविता लिहिली आहे. तू वहिनींकरता माझ्याकडून कविता लिहून घेतलेलीस ती आठवते. गंमत सांगतो, त्यानंतर राघव, मुक्या आणि दिन्या तिघांनी माझ्याकडे अशाच कवितांची ऑर्डर दिली होती! त्यांनी देखील त्यानंतर यशस्वी किल्ला लढविला. त्या तिघांच्याही लग्नात मी गेलो होतो त्याची आठवण झाली. असो. तशा कविता लिहून तेव्हा विकल्या असत्या तर? गडगंज श्रीमंतीत लोळलो असतो. फक्त त्या चारही वाहिनी मंडळींस त्या कविता मी लिहून दिल्या होत्या हे ठाऊक नाही म्हणून बरे. नाहीतर तुम्हा लोकांच्या घरी मी म्हणून पाहुणा आलो तर चारी घरचा पाहुणा उपाशी राहिला असतो!

तर काव्ययंत्र बंद असले तरी खास तुझ्यासाठी ही खास कविता.. कविता कसली तुझी आरतीच ओवाळतो आता..

जय जय जय पैलवान भैरू
नादी न लागे तुझ्या कुणी ऐरू गैरू!

इक्षुदंडासम दंड तुझे ते
बेटकुळी शोभे न मुळी ते
तव भेटीसाठी भक्तगण येथे
लांबलांबूनी लाईन लावती ते
जय जय..

तुझ्या मुठीचा एकच प्रहार
वाकेल ती सटकन् लोह पहार
तुझ्या ताकदीने होईल कहर
असो सकाळ रात वा दुपार प्रहर
जय जय..

दादूमिया दादू दादोजी तू असशी
स्तुतीसुमनांनी बिल्कुल न फसशी
काडी पैलवानी असली तू करशी
भल्याभल्यांना दाखवशी फरशी

जय जय..

थोडक्यात तुझी आरती ओवाळून धन्य धन्य वाटले. आता सुखाने डोळे मिटावयास हरकत नाही. म्हणजे काही वेडेवाकडे विचार नकोस आणू मनात. झोपण्यापूर्वी लिहित आहे हे पत्र. तेव्हा अजून जांभया अनावर होण्याआधी आवरते घेतो. ( जांभया मला अनावर होण्याआधी.. तुला नव्हे. तुझे काय सुप्रसिद्ध साहित्यिकाची पत्रे वाचतोयस.. एकेकाचे नशीब आणि काय! )

तुझा

सदू

ता.क.

ताकात लिहिण्याजोगे काही नाही.. म्हणून ताक रिकामा

सदू

***

प्रिय सदोबास,

सदू म्हटले तरी लिहितोस आणि सदोबा म्हटले तरी लिहितोस! तेव्हा सदोबाच म्हणतो आज.

पत्र मिळाले. वाचले. समजले. कळले. आता या सर्व क्रियापदांचा काळ ओळख म्हणून सांगू नकोस. तुझ्या पत्रावरून तू कुठल्याशा साहित्यिक ब्लॉक मध्ये अडकला आहेस असे वाटते. आनंद आहे! त्यामुळे

आरती तर आरती.. काही तरी तुझ्या लेखणीतून प्रसवलेस याबद्दल समाधान आहे आणि या सुप्रसिद्ध अशा महान लेखकाचा लहान प्रेरणा स्त्रोत मी असावा याचाही आनंद आहे.

तुझे पत्र वाचता वाचता खरेच आंभया जनावर झाल्या. त्यामुळे पुढील भाग मी आपण आपल्या शेवटच्या बेंचवर बसून झोपा काढत नोट्स काढायचो तसा लिहिला आहे. त्यामुळे चु.भु.द्या.घ्या.

तर माझी पैलवानकी व्यवस्थित सुरू आहे. आजवर कित्येकांना आसमान दाखवले. बाय द वे .. कुणास लोळवल्यास त्यास आसमान दाखवणे म्हणतात.. फरशी दाखवणे नाही बरे! तरी तुझ्या फरशीची फारशी दखल न घेणे इष्ट.

तुझ्या आरतीमुळे मला आपण म्हणायचो ती आरती मुटकुळेची आरती आठवली. आरती छान होती ( लिहिलेली.. ) तू लिहिली होतीस तरीही! आता ती आठवत नाही. तशी आरतीदेखील चांगलीच होती. ती पण कुठल्या समारंभात भेटली तर कळवणे. तुला अशा वर्गभगिनी बऱ्या सगळीकडे भेटत असतात. अजून एक बाय द वे.. तिने तुला ओळखले हा तुझा भास.. आभास.. भ्रम की कल्पनाविलास? कारण जुन्या सदूचे काही अंश फक्त मानववंशशास्त्रज्ञांसच ओळखू येतील इतका तू बदलला आहेस. नुसत्या सुटत्या पोटावर जाऊ नकोस.. वहिनीस विचार.. बघ ती काय म्हणते ते!

असो. तुझा तुझ्या कवितांमुळे तुझ्या वहिन्या आम्हाला वश झाल्याचा गोड गैरसमज झालेला दिसतो. तो तसाच राहू देण्यास हरकत नाही. तेवढाच तुझा सेल्फ एस्टीम वाढेल. मित्रासाठी एवढे तर मी करू शकतोच! आणि डोळे मिटण्याआधी थोडे समाधान तुला दिल्याचे मलाही समाधान! डोळे सुखाने मिट. फक्त पुढचे पत्र लिहिण्याआधी ते उघड म्हणजे झाले. खूप दिवसांनी मला कुणाच्या टिंगलीची संधी मिळत आहे. ती वाया जाऊ नये आणि काय! बाकी काय संतोष ही संतोष.

दिवाळी जवळ येत आहे. काय नवल विशेष? थोडक्यात दिवाळीत काय लावणार दिवे? फराळ खाऊन अजून ढेरी वाढवून न घेणे.. आणि फटाकड्यांपासून दूर राहणे.

तुझा दादूमिया

ता.क.

( मी दही व्यवस्थित लावल्याने माझ्याकडे भरपूर ताक आहे!)

१

एक मेंदू तरंग आला आज.. तुझ्या लिखाण क्षमतेच्या ऱ्हासाचा उल्लेख केला आहेस त्या अनुषंगाने. आज सकाळीच वाटले मला.. जात्यावर बसावयास तेथे पाहिजे जातीचे! ते येरागबाळ्याचे काम नोहे! तेव्हा थोडी तडजोड करावी आणि मिक्सर चालवून ओव्या स्फुरतात का ते पहावे.

२

तुझ्या पत्रलेखनाने जुने दिवस आठवले. वो भी क्या दिन थे! बाकी तुला काही येत असो की नसो हे मात्र तू छान केलेस. मी उत्तर लिहिनच. फक्त उत्तरे लिहिता यावीत अशी पत्रे लिहित जा. आतुरतेने पाहतोय वाट.

३

आणि एक.. तुझी बहुतेक पुस्तके वाचलीत मी.. चांगला लिहितोस म्हटले तर मी खोटे बोलतोय असे तर नाहीना वाटणार तुला? पण खरेय ते. म्हणजे मी खोटे बोलतोय ते नव्हे.. तू माझ्याकडून बऱ्यापैकी शिकलास हे बघून बरे वाटते.

तुझा

दादू

***

प्रिय दादाभाईस,

पूर्वी दादाभाई नौरोजी नावाचे मोठे महान गृहस्थ होऊन गेले. त्यांचे नाव तू लावावेस यासारखा दैवदुर्विलास तो कोणता? दचकू नकोस. आता तू माझी पत्रे वाचशील तेव्हा अशा मोठमोठ्या शब्दांची सवय करून ठेव! न कळल्यास विचारून घेत जा.

दिवाळीचा उल्लेख तू केलास.. तेच तर तुला मी लिहिले होते. या दिवाळीत माझ्या लेखनशक्तीचे दिवाळे वाजले की काय न कळे. उगाच

काही खरडणाऱ्यांपैकी मी नाही. तुला ठाऊक आहेच ते! त्यामुळे या दिवाळीत विशेष काही साहित्यिक दिवे लागले नाहीत.

दुसरा उल्लेख फटाकड्यांबद्दल. तुला नक्की काय अभिप्रेत आहे ते कळेल काय? नाही म्हणजे मी तुला ओळखून आहे त्यामुळे नक्कीच तू फटाक्यांबद्दल बोलत नाही आहेस होय की नाही? आणि कुठल्याही फटाक्यां नि फटाकड्यांपासून मी किती दूर असतो हे मी सांगण्याची गरज नाही. ती स्पेश्यालिटी तुझी. कामिनी कामेरकर आठवत असेलच. खरेतर तिलाच तू आठवत असशील! तर मला असा शहाजोग सल्ला देणाऱ्या मर्कटा.. त्यानिमित्ताने तू फटाकड्यांची आठवण काढून घेतलीस इतके मात्र नक्की! असो. दिवाळीचे फटाके इतपत पुरे! नाहीतर धूमधडाका व्हायचा हिला किंवा तुझ्या घरी वहिनीला काही सुगावा लागला तर!

तू माझी पुस्तके वाचलीस हे वाचून आनंद झाला. कितीही वाया गेलेला असलास तरी तुझ्यात काही चांगले गुण शाबूत आहेत ते असे! मात्र वाचलेल्या काही पुस्तकांची नावे कळवली असतीस तर बरे झाले असते!

तुला आंभया जनावर झाल्या हे वाचून मला असणे हनावर झाले. फक्त एक मित्र म्हणून काळजीपोटी सल्ला देतो. जांभई देताना तोंडात माशी शिरू देऊ नकोस. आजकाल माशांचा नेम नाही.. किंवा खरेतर नेम धरून त्या तुझ्या तोंडात शिरतील. मग बिचाऱ्या माशांचे काही खरे नाही. त्या मुक्या प्राण्यावर दया तू नाही करणार तर कोण करणार? बाय द वे.. तुलाच बाय द वे सुचते असे नाही.. तर

बाय द वे.. १ माशी स्त्रीलिंगी असेल तर तिचे पुल्लिंगी रूप काय काही कल्पना?

बाय द वे २ मुक्या प्राण्यांवर दया करा म्हणून गेले साधू संत त्यात मच्छर, माशा, झुरळे इत्यादि का समाविष्ट नसावेत? त्यांना सरसकट सारेच मारत असतात. ते काय बोलके प्राणी समजावेत का? आणि दया त्यांच्यावर करत नसू आपण तर त्यांचा नायनाट हे सर्वमान्य राजमान्य का असावे? माहिती आहे तुझ्या कुवतीबाहेरचे विचारत आहे प्रश्न पण बघ.. जरूर प्रयत्न करून. शेवटी काय.. प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेल ही गळे! काय? त्यातून अजून एक

बाय द वे.. ३. माझ्या एका कथेत बायको असे म्हणते.. मग नवऱ्याने काय करावे.. तेल म्हणून एक किलो वाळू आणून देतो! बस रगडत म्हणत! आणि काढ तेल! अर्थात नवऱ्याची पाठ रगडली जाते शेवटी हे तुला सांगणे न लगे!

असो.. आता रस्ता सोडून.. म्हणजे बाय द वे जाणे पुरे! आता मूळ मार्गावर येतो. तर तुझे मूळ पत्र ताकाहून छोटे आहे गड्या. कधीतरी तू पत्राऐवजी नुसतीच ताजी कलमे लिहिशील असा संशय येतो मला. होते असे कधी कधी. म्हणजे संशय नाही. तुझ्या लिहिण्याबद्दल बोलतोय मी.

काही म्हण तुला पत्रे लिहायला लागल्यापासून नि तुझी पत्रे यायला लागल्यापासून जरा बरे वाटते आहे. आजकाल टेलिफोनने सारे तंत्र बिघडवून टाकले आहे. पत्राची गंमत नाही त्या संभाषणांत हो की नाही?

उदाहरणार्थ फोनवर तुझ्या जुन्या जमानातल्या गुलाबी आठवणी! त्या लिहिताना आपणच पुन्हा तरूण झाल्यासारखे वाटते नाही?

तू म्हणशील जुना जमाना कसला? अजून यौवनात मी.. मी आहेच.. तुझे ठाऊक नाही! आणि तू लाख म्हणशील तसे.. पण तुझ्या डोईवरल्या तळपत्या आणि चमकत्या चंद्रास साक्षीस ठेव म्हणजे झाले!

बाकी तुझी दिवाळी कशी काय? जे काय लावायचे ते दिवे तू कधीच लावून घेतले आहेस तेव्हा नव्याने तू तरी काय करशील? दिवाळी अंक वगैरे वाचतोस की नाही? की दिवाळी म्हणजे नुसतीच खादाडी? तशी वहिनी सुगरण. त्यामुळे तुझे पोटोबा सदा तृप्त असतात. तेवढा जिभेवर ताबा ठेवलास की झाले!

आमच्याकडे दिवाळी म्हणजे काय.. घरट्यातून पिले गेली उडून. आम्ही दोघे एकमेकांची तोंडे पाहात साजरी करतो झाले.. सॉरी. लिहायला घेतल्यापासून ठरवून टाकलेय एकही सूर असा निगेटिव्ह लावायचा नाही. आपण विचार करतो तेच लिहितो असे नाही.. कित्येकदा लिहितो त्याचा ही विचार करत असतो. वरील वाक्य पुढे कुणी कोटेबल कोट्स म्हणून वापरल्यास त्याचा हक्क माझ्याकडे आहे हे ठेवशील ना  लक्षात?

तर दादूमिया, पत्रप्रतीक्षेत..

तुझा

सदू

ता. क.

तुझ्या ताकाहून माझे ताक छोटे.. पण पॉवरबाज..

का का ची आठवण येते की नाही?

***

प्रिय सदुमिया,

सदुमिया, तुझे मिया मूठभर.. दाढी हातभर पत्र वाचले. म्हणजे काय ते विचारशील.. तर हे, पत्राशेवटी तू जे लिहिलेस ना ते काही तुझ्यापुरतेच मर्यादित नाही रे. घरोघरी मातीच्याच चुली राजा. तेव्हा चिअर अप. आणि त्या मूळ मुद्द्याला लपवायचा एवढाही प्रयत्न नाही करू. शेवटी आपल्या भावना व्यक्त करायलाच पत्र लिहितो ना आपण? तेव्हा जे सांगायचे ते लपवायला हातभर दाढीसारखे पत्र तुझे! असो. यापुढे मनातील लिहायला पत्रव्यवहार. मग सारेच काही छान छान म्हणून कसे चालेल सांग.

दिवाळी म्हटले की फराळ हे खरेच रे. आठवते आपली हॉस्टेल मधली दिवाळी? आठवत असणारच रे. तेव्हा आपण अभ्यासामुळे घरी जाऊ शकलो नव्हतो तर आपल्या घरच्यांनी तशीच केली असणार ना दिवाळी? थोडक्यात बेटा सुपातले कधी न कधी जात्यात येतातच!

त्यामुळे सृष्टीचे चक्र आपल्या गतीने चालते आहे एवढे आणि एवढेच खरे आणि तुला काय नि मला काय वाटणारा एकटेपणा.. तोही

खराच! असे काही लिहिले की मी कुणी मोठा असल्यासारखे वाटते. त्यामुळे त्यापुरते मोठेपण स्वीकारून परत .. पुनश्च विदुषकाचा वेश धारण करतो. म्हणजे मग आपण काहीही केले तरी लोक हसतात! मग तो विदूषक भले रडत का असेना! लोक काय टाळ्या पिटायचे थांबत नाहीत!

तर आता तुझ्या बाकीच्या मुद्द्यांकडे.

मर्कटाचे तर्कट चांगलेच लक्षात आहे म्हणायचे. का का (म्ह.तीच.. कामिनी कामेरकर) ने मर्कट म्हटल्याचे आठवतेय तुला अजूनही! मला देखील. अर्थात त्याचवेळेस आपल्या क्लासरूमबाहेरच्या झाडावर एक माकड उड्या मारत होते हा योगायोग म्हणावा का? तर का का ची आठवण येतेच आणि त्याबरोबर बाकी सुद्धा कितीतरी होत्या त्यांचीदेखील. आठवते ती ज्योती नरगुंदे? नि डाव्या गालावर तीळ असलेली मनीषा म्हात्रे. गालाच्या खळयांवरून नाव पडले असावे असे वाटायला लावणारी गीता खळे. आज जुन्या आठवणींची पोतडी उघडूनच बसलोय. आणि आज भाऊबीज आहे. पाडवा सरला कालच! आणि आता काय साऱ्या वर्गभगिनीच. तुला ही मान्य व्हावे ते! आणि नाही झाले तर वहिनी असेलच डोळे वटारून बाजूला उभी.

तू कुठली पुस्तके वाचलीत मी हे विचारले आहेस. का कोणास ठाऊक ते वाचताना त्याच्यामागे तुझा छद्मी हसतानाचा चेहरा दिसत होता. सिनेमात कसा पत्र वाचताना दिसतो चेहरा तसा. तुला मी काही वाचू शकेन हेच पटत नाही नि पचतही नाही असे दिसते. पण तुला दोष नाही देत.

कॉलेजच्या जमान्यापासूनच मी हा असा. तेव्हा सावकाश कळवतो नावे.. फक्त त्यापुढे काही प्रश्न विचारून तू परीक्षा घेणार नाहीस ना इतके प्रॉमिस दे म्हणजे झाले.

तर तुझे बाय द वे गंमतीदार आहेत. माझ्या डोक्यावरून जातील हे खरे. पण त्यात माझी चूक नाही. माझी साडेपाच फूट उंची कारण आहे त्याचे. आणि उंची आपल्या हाती असते का? अरे गावस्करला पण लिटल मास्टर म्हणत त्याच्या उंचीमुळे. तर माझी शारीरिक उंची कमी असेल पण बौद्धिक उंची नाही! तुला ते नाही पटणार पण वस्तुस्थितीकडे डोळे झाकून कसे चालेल? तरीदेखील तुझ्या प्रश्नांना उत्तरे देणे कठीण आहे. मासा हे माशीचे पुल्लिंग समजले तर तो आंतरप्रजातीय विवाह होईल! त्यामुळे तुझा हा मौलिक प्रश्न असाच सोडू इथे.

तुझी मुक्या प्राण्यांबद्दलची कळकळ आणि कळवळा पाहून भरून आले. तू आता मक्षिका संवर्धन आणि मच्छर पालनाकरिता ऊर्वरित आयुष्य वाहून घ्यावेस असे वाटते. झुरळ संगोपनाचाही जोडव्यवसाय करावा. झुरळ म्हटल्यावर वहिनी साथ देईलच त्या कामास! जमल्यास पाली आणि घुशी यांकरिता डे केअर सुरू केलेस तर उत्तमच. पण तुझ्या प्रश्नांनी तुझ्या बुद्धिची चमक आणि झेप दिसत आहे हे नक्की!

पण मी देखील काही प्रश्न विचारु शकतो.. बाय द वे! उदा. १ थालिपीठाला इंग्लिशमध्ये काय म्हणतात? २ समज अ हा ब पेक्षा दहा पटीने हुशार असेल.. तर आपल्यात अ आणि ब कोण? प्रश्न सोपा वाटत

असेल पण तसा तो नाही.. तू स्वतःस हुशार समजशील तर मी म्हणेन तू स्वतःस शहाणा समजतोस! आणि मी हुशार तुझ्याहून म्हणालास तर वस्तुस्थिती आहे म्हणून मान्य करावेच लागेल मला!

एकूण काय बाय द वे विचार आम्ही देखील करत असतो.

बाकी तू पत्राबद्दल म्हणालास ते खरे आहे. पत्रलेखनानंतर तुला नक्कीच तरूण झाल्यासारखे वाटत असणार. आपण नसतो तसेच आपल्याला व्हावेसे वाटते यातच सारे आले!

तू लिहावयास सुरूवात करून आयुष्यात तू काही चांगले करू शकतोस एवढे मात्र सिद्ध केले आहेस यात शंका नाही.

उत्तर लिहिशीलच. वाट बघतोय. रिक्षावाला नव्हे.. मी!

तुझा

दादोजी

ता. क.

तुला तेल हवे असल्यास सांग. घरपोच होलसेल वाळू डिलिव्हरी दिली जाईल.

मे. दादू आणि दादू

सॅंड सप्लायर्स

***

प्रिय दादू द दातवाला,

दादू द चकलास? म्हणजे दचकलास? दातवाला म्हटले म्हणून? अरे दोन कारणे आहेत त्याला,

१ काही जण हाताच्या नखांनी बोचकारतात तर काही डायरेक्ट दातांनी चावा घेतात. तू दुसऱ्या प्रकारातील. बऱ्यापैकी साहित्यिक चावे घेतलेस तू. दात सांभाळ म्हणजे झाले या वयात! नाहीतर अगदीच बोळके व्हायचे! बाय द वे.. मागे कुणा एकाच्या कवळीतलेही दात किडल्याचे ऐकले होते. ऐकावे ते नवलच नाही का?

२ विदूषक म्हणून दात काढणे, कुणाला काढायला लावणे आणि त्यातून टाळ्या मिळवणे व्यवस्थित जमते तुला. कदाचित तू दंत स्पेशालिस्ट म्हणून जास्त शोभला असतास असे वाटते. नाही म्हणजे दात पण काढले असतेस, वर त्यातून कमाई पण केली असतीस!

दिवाळी संपली की वर्ष उलटल्यासारखे वाटते. अजून दीड दोन महिने बाकी असूनही! आता वर्षअखेर आणि नववर्ष! त्या कुण्या कविने नेमेचि येतो पावसाळा का म्हटले असावे? नेमेचि येणारे उन्हाळे नि हिवाळे काय सृष्टीच्या चमत्कारात बसत नाहीत की काय? त्यांचे कौतुक नको?

कौतुक सगळ्याचे व्हावे! मागे एकदा तू फायनल परीक्षा पहिल्या फटक्यात पास झालेलास तेव्हा मी तुझेसुद्धा कौतुक केलेले.. आठवतेय ना?

आजकाल मला असले मूलभूत प्रश्न पडतात सांगतो. आणि तुझ्याकडून समस्यापूर्तीची शक्यता नसतानाही तुला लिहित असतो. असो. जमल्यास प्रयत्न करावास नाहीतर दे सोडून. जगात कित्येक अशा गोष्टी तुला ठाऊक नाहीत हे ठाऊक आहे मला. त्यातील अजून एक!

तर वर्ष उलटत आले.

पुढील महिन्यात तुझा वाढदिवस असतो. कितवा ते मी लिहू नये नि तू सांगू नये! तरीही वाढदिवसाचे काय प्लॅन्स? इथेही दचकलास ना? दचकलास तर चालेल.. गचकलास तर नाही चालणार! अरे एक जुनीपुराणी डायरी सापडली त्यात लिहिलेला तुझा वाढदिवस. पुढच्या महिन्यापर्यंत लक्षात नाही राहिले तर? म्हणून आताच नोंद करून ठेवतो! वयोमानानुसार तुला नाहीतर विसर पडायचा!

यावर्षी इकडे थंडी लवकरच पडली आहे. माझे ठीक आहे. थोडे तरी चरबीचे संरक्षण आहे. तुझ्या डायरेक्ट हाडांत डायरेक्ट थंडी घुसत असेल नाही भैरू पैलवान? तरी सांभाळून राहावे. मागे तूच मला लिहिल्याप्रमाणे.. तू आम्हाला खूप खूप हवा आहेस अजून! अरे असा आयता कोणी पाय खेचावयास मिळत असेल बकरा तर त्या बकऱ्याने

शतायुषी व्हावे असे त्याच्या जवळच्यांना का नाही वाटणार? त्याला कुणी बकरी इदच्या दिवशी कापेल का? तर वाढदिवस..

तेव्हा आताच विश करून घेतो.. जीवेत शरद: शतम! म्हणजे शरदा तू शंभर वर्षे जग! आणि मी देखील तुला तेव्हा म्हणजे शंभराव्या वाढदिवशी परत विश करीनच!

कालच एक कथा लिहायला घेतली आहे. तुझ्या पत्रातून सुचली. त्यामुळे तुला त्याचे श्रेय! चांगली जमली तर तुझ्या आयुष्यात तुझ्या नावावर काही चांगले काम क्रेडिट होईल! तेवढेच पुण्य तुला! आणि त्याची गरज आहेच. स्वर्गात ॲडमिशन सोपी नाही म्हणतात. म्हणजे फक्त ऐकून आहे. जाऊन प्रत्यक्ष नाही पाहिले काही मी. पण तिकडची एनट्रन्स खूप टफ असते म्हणतात! असो. माझा काही प्रश्न नाही पण तू तिकडे स्वर्गातच येऊ शकलास तर बरे. दोघे एकत्र राहू.. त्यामुळे असा पुण्यसंचय सुरू ठेवत जा.

पत्रोत्तरातील अक्षर थोडे थरथरत्या हाती लिहिल्यासारखे वाटते गड्या. हातीपायी धड आहेस ना? अर्थात माझ्यासारख्या लेखकास पत्र लिहायचे म्हणजे थोडे कंपन साहजिकच आहे. पण तुला सांगतो.. आपल्याकडे कित्येकांची किंमत ते गेल्यावर कळते. मग त्याच्यावर पोस्टमॉर्टेम बक्षिसांचा वर्षाव होतो.. तो किती महान होता वगैरे भूतकाळात

सांगायला आम्हास आवडते. तर हे सारे माझ्याबद्दल हे चाणाक्ष दादूने ओळखले असेलच. सांगायचा मुद्दा.. त्यावेळी माझा अप्रकाशित पत्रव्यवहार प्रकाशित करतील. तेव्हा तुझी पत्रे माझ्या बरोबरीने येतीलच! सुसंगतीचा असा फायदा होतो! अर्थात कॉलेजच्या दिवसांपासून तू माझ्याबरोबर असल्याने तुला अनुभव आहेच.

चल इथे थांबतो. कथानकात काही सुचते आहे.. ते लिहिणे ही प्राथमिकता! तू काय आहेसच.

पत्रोत्तर लिही. मला तशी बरीच कामे असतात. तुझे तसे नाही. तेव्हा लिहीच.

तुझा सदू

ता. क.

का का किशाचा..

***

सद्गुणी बाळ सदू यास

अनेकोत्तम आशीर्वाद.

पत्रास उशीर होतो आहे. क्षमस्व! काय आहे थोडे हळू हळू चालते काम आणि विसरलो लिहावयास. तरी रा मा नये! म्ह. राग मानू नये!

तुझ्या महानतेबद्दल सांगितलेस ते बरे केलेस. काय आहेना मला कधी तुझ्याबरोबर राहूनही संशय आला नव्हता की तू इतका मोठा असशील त्याचा! चांगलाच छुपा रुस्तुम निघालास!

हल्ली स्वर्गाचे बुकिंग इकडून करता येते असे कुठेतरी वाचलेले आठवते. वाचावे ते नवलच नाही का? थोडक्यात आम्हीदेखील काही वाचन करीत असतो.

तुझ्या एकेका मुद्द्यास.. खरेतर गुद्द्यास.. उत्तर देण्याइतकी सवड मला नाही. माझा बिझिनेस मोठा. सकाळी उठून मी कामास लागतो ते थेट रात्री पर्यंत! सगळ्यात मोठे काम म्हणजे कुठले काम करायचे ते आठवणे! मला काय वाटते ना.. तरूणपणी डोक्यावर केस नसले तर चालतील.. नंतर उगवले की बरे! म्हणजे शेंडी असेल तर आठवणीसाठी मारता येईल ना गाठ?

बघ.. मूलभूत चिंतन तुझी मोनोपॉली नाही. मलाही थोडेफार जमते! तुझ्या आणि माझ्या मूलभूत मध्ये मात्र मूलभूत फरक आहे! तू मुलभूत म्हणजे तुझ्यातले भुतासारखे मूल! आणि मी म्हणजे खराखुरा मूलभूत! जास्त डिटेल लिहित नाही. उगाच गाढवापुढे वाचली गीता..

पण एका गोष्टीची कबुली द्यायलाच हवी..

माझ्या पत्राची अशी स्तुती तुझ्याकडून अपेक्षित नव्हती! माझा विदुषकाचा उल्लेख पटलेला दिसतोय. आभारी आहे. या नाचीज पत्र लेखकास एका प्रथितयश लेखकाने नावाजावे याउप्पर त्या भगवंताकडे मागणे नाही! आता मी डोळे मिटण्यास मोकळा असे नाही म्हणणार.. कारण अजून खूप काही करायचे बाकी आहे.. झालंच तर तुला पत्रे लिहायची आहेत! नाहीतर तुझ्या निद्रिस्त प्रतिभेस कोण आणील जाग आणि समस्त मराठी भाषा मुकेल ना तुझ्या साहित्यकृती! तू गोष्ट लिहिण्यास सुरूवात केलीस हे ऐकून भरून आले.. डोळे. आता ते रडू कोसळल्याने की आणि कशाने हे मी तुझ्यावर सोडतो! पण हृदयातल्या रक्तवाहिन्यांसारखा किंवा तुंबलेल्या गटारीसारखा तो ब्लॉक निघाला हे महत्त्वाचे! मी त्यात तुला उपयोगी पडल्यामुळे मला प्लंबर झाल्यासारखे वाटत आहे बघ!

तू समस्यापूर्तीसाठी माझी निवड केल्याने मला कुठल्याशा मासिकातील चंपू वन्स झाल्यासारखे वाटते आहे! इश्श! काही तरीच हां सद्या! काही म्हण तुला माझ्यासारखा मित्र मिळाला हे मात्र सृष्टीचे कौतुक जाण बाळा!

तुझ्या पत्रांबद्दल एकच.. म्हण बदलून घेतली पाहिजे.. नळयाबरोबर गाड्याची जत्रा! तेव्हा वत्सा तुजप्रत कल्याण असो. आकाशातील बाप जेव्हा घेण्यास येईल पापपुण्याचा हिशेब तेव्हा फक्त माझे नाव घे! उद्धार होईल! कां की जो पुण्यात्मा तू शोधत आहेस तो तुझ्यासमोरच आहे.

किशाच्या काकाचे किस्से का काळजात कैद केलेस? कामिनीस उचक्या भरपूर लागत असणार! बाकी वर्गमैत्रिणींस देखील! त्या उचक्यांचा उगम मात्र तुझ्यामुळे हे समजून घे.

पत्र जरा विस्कळीत वाटत असेल तर ते कार्यबाहुल्याने बरे! त्यामुळे गोड मानून वाचावे. आणि अक्षरास हसू नये!

पत्रोत्तराच्या प्रतीक्षेत.. भारतीय पोस्ट डिपार्टमेंट. आपल्या पत्रव्यवहारावरच पोस्टाचा खर्च भागत असणार.. तेवढाच परोपकार आणि काय!

बाय

तुझा

डाडू

ता. क.

१

कथा सावकाश येऊ दे.. घाई नको.. सोऱ्यातून चकली पडावी तशी कथा पडोत तुझ्या सुपीक मेंदूतून हीच सदिच्छा!

२

कथा कशी लिहावी.. बाय दादूमिया.. स्टेप बाय स्टेप गाईड..

वाचा पुढील पत्रात!

ड

***

डाडूमियास,

ह बा वि वि!

म्ह. का?

ओळखल्यास माझे अर्धे राज्य बक्षीस!

मला माहिती आहे तू ओळखू शकणार नाहीस ते.. आणि तू का व्यर्थ आपल्या लहान मेंदूस ताणावेस? आधीच तो चिमुकला.. तेव्हा सस्पेन्स न ताणता..

ह बा वि वि! हळू बाबा विसराळू विनू.. !

तुझ्या पत्राची वाट पाहात म्हातारा झालो असे वाटायला लागले आहे मला! आणि विसरतोस कसला? शेंडी नसेल तर शेपटीला गाठ मार! आम्हा उत्क्रांत प्राण्यांचे शेपूट गळाले तरी तशी सोय तुला आहे.. किती तुझे भाग्य! माशा.. दोन्ही पु आणि स्त्रीलिंगी.. उडवायची सोय आहे तुझ्याकडे!

तू थोड्या आळसानेच पत्र लिहिल्याचे जाणवते आहे शब्दाशब्दातून. इतकी कसली रे कामे तुला? तरी बरे डोक्यावरच्या केसांचा भांग पाडण्याचा वेळ वाचतो तुझा. माझ्या कथेची काळजी करू नये. गोष्ट पूर्ण करण्यास श्री समर्थ आहेत! तरीदेखील तुझे ते गोष्ट लिहिण्याचे तंत्र आणि मंत्र वाचण्यास मी उत्सुक आहे! बघूया काय म्हणतात दादूमिया ते! आपला ज्याच्याशी दुरान्वायानेही संबंध नाही त्याबद्दल काय लिहितोस याची उत्सुकता आहे. तसा तुला अनुभव बराच आहे म्हणा! कॉलेजच्या परिक्षांत तू वेगळे काय करायचास?

वाढदिवस तुझा उलटून गेला दादू. आठवण होती की विसरलास? बहुधा विसरला असावास. बरे झाले मी आधीच तुला विश करून घेतले होते. आता एक कोडे.. माझा वाढदिवस कधी ते आठवून दाखव! एक क्लु देतो.. तुझ्या मैत्रिणीच्या वाढदिवसाच्या दुसऱ्या दिवशी. आता तू विचारशील कुठली मैत्रीण? म्हणजे कुठकुठली मैत्रीण.. इतक्या होत्या! तर तीच नीले नीले गाल और लाल लाल बाल.. सॉरी तपशीलात थोडी चूक होतेय. पण तू ओळखशीलच नक्की! आणि आता तुला नक्कीच आठवेल माझा बड्डे!

माझी तब्येत आता बरी आहे. डॉक्टरचे औषध घेतल्याने त्या डॉक्टरला बरे वाटते आहे! त्यामुळे तुझ्या पत्राची वाट पाहात होतो. ते आज

आले आणि बरे वाटले. माझ्या पत्रात या उप्पर सीरियस मजकूर अलाऊड नाही. तेव्हा पुन्हा आपल्या नेहमीच्या लिखाणाकडे वळतो.

तर गोष्ट लिहून होत आली आहे. खरेतर मध्ये खूप दिवस गेले. त्यात वेळ झाला नाही. आणि तुझे स्फूर्तिदायी पत्रही आले नाही त्यामुळे गोष्ट अर्धवट राहिली आहे. ती पूर्ण करेन. गोष्ट अशी आहे की तिच्यात दोन म्हातारे.. ते एकटे असतात एकदा भेटतात कुठेतरी. मग गप्पा मारत सुटतात. रोज भेटून असाच गप्पांचा सिलसिला सुरू राहतो! मग एके दिवशी त्यांच्यापैकी एक येतच नाही! पुढे काय.. लिहितोय! दिल थामके बैठो! तुला काही सुचल्यास सूचनांचे स्वागत आहे! आज कितीतरी दिवसांनी पोवाडा लिहायची इच्छा झाली.. लिहून टाकला! आता तू तो वाचून टाक!

आइका एका शूर सरदाराची कथा
माज्या रं दादू रायाची कथा

त्याने केला पण
एकदा पण
त्याच्या डोईवर ओझं मण मण
लावीतो सद्यापाठी भुण भुण
त्याला रं मयतरीची आन

जी रं जी रं जी..

दादू तो संथ आणिक विसराळ
डोक्यावर उजाड प्रदेश गवताळ
दादू म्हणे बाप हिरवागार भवताल
आठवितो दिव्य आपला भूतकाळ
त्याला रं भूतकाळाची आन
जी जी जी जी..

काय ते होते दिवस महाराज
त्याला ना सुचे काही काम न काज
म्हणून का सोडितो कुणी हो लाज
त्याचा हो अलग अलग हा बाज
त्याच्या सर्व मयतरणींची आन
जी जी जी..

कुणी होती एका कूर्मगती कामिनी
जशी का गजगती गजगामिनी
आठवे गीता मीता नीता मालिनी
पूर्वा अपूर्वा मंदाकिनी शालिनी

त्याला त्याच्या का का ची हो आन
जी जी जी..

मर्द मग दर्द होऊनी उभा ठाकला
म्हणे मी असा मर्द मावळा
कुणा जरी भासे तो बावळा
मर्कट म्हणूनी प्रसिद्ध तो जाहला
त्याला त्याच्या वाकुल्यांची आन
जी जी जी..

होती त्याची अलगच असली शान
बघता बघता सुटे त्याचे हो भान
लायनी मारतो असा पैलवान
भैरू मग जाला म्हणून महान
त्याच्या त्या महानतेची आन..
जी जी जी..

दादूमिया तसा होता नशीबवान
त्याला भेटे सदू नामक मित्र महान
तारिले त्याचे तारू सद्याने म्हणूनशान

दादू देई दान सुटता गिराण

त्याला त्याचा नशिबाची हो आन

जी जी जी..

थोडक्यात दादू हे असे आहे बघ. तुझ्या नशिबाबद्दल हेवा वाटावा अस दोस्त तुला मिळाला. आणि काय हवंय?

असो. अजून लिहिले असते पण तुला वाचायला झेपेल का? म्हणून थांबतो.

पत्र पोहोचल्या पोहोचल्या लिहायला घे तुझे पत्र म्हणजे हळू बाबा थोडे जलद पाठवतील उत्तर!

तुझा

सद्या

ता. क.

तेवढ्या तुझ्या कापऱ्या हाताचे बघ. कुछ लेते क्यू नही?

सदू

***

प्रिय सदुभौ,

काय वं पावनं तुमी तर लय फर्मास पवाडा लिवलात. आसं वाट्टं शिवाजी म्हाराजांनतर या उब्या म्हाराष्ट्रान कुनाचा आइकावा पवाडा तर तो माजाच! आन लिहावा कुनी.. तर आपल्या गुनी शाहीर पठ्ठे सदाराव यांनी. तू इत्का हुशार कदी जाला रं.. तुजं कवतिक वाटतया नेमीच.. तुज्या हुशारीचा कुनाला सौंशय यू नये असा तू नेमी वागत आसतो. परतेक्ष या मितरास बी कदी त्याचा आनभव आलेला न्हाई आजवर ते तू करून दागवतोस.. आनंद हाये.

तुझी कथा लिहायला घेतलीस ती अजून पुरी केली नाहीस? अरे चालव काही डोके आणि टाक लिहून पटकन. दिल थामके बसलोय.. लवकर लिही नाहीतर खरेच थांबून जायचे ते!

तू कारण नसताना पुरानी यादोंको ताजा करत आहेस यार. उगाच त्या सर्व जणींना उचक्या लागत असणार. बिचाऱ्या! काही म्हण अजूनही मला सॉफ्ट कॉर्नर आहे.. कारण मी आहेच तसा मोठ्या हृदयाचा! मोठ्या हृदयावरून आठवले.. डॉक्टर म्हणे मी खरेच बडे दिलवाला आहे म्हणून! कार्डिओमेगॅली म्हणे! आता इतक्या जणींना ठेवायचे त्यात तर हृदय मोठेच हवे हो की नाही? तब्येत माझी अगदी तबियतीत असते आजकाल. त्यामुळे

कापऱ्या हातांचे काय घेऊन बसलाहेस.. डॉक्टर म्हणे कंपवात आहे.. म्हणजे हात कापले नाहीत तर तो बिचारा आजार गोंधळून जाईल! त्यामुळे ह्या

हळुबाबाचे हळूहळू लिखाण

वाचावे नयनांस देऊनी ताण!

वा! दोन ओळी तरी जमल्या बघ! पवळयाशेजारी ढवळ्या बांदला.. आणि वाण नाही तर गुण लागला! तर तुझं गुण लागलं पाहा पावणं.. होपफुली याहून जास्त कसले गुण लागणार नाहीत!

असो.. आता ज्याची तू आतुरतेने वाट पाहातो आहे ते.. तुझ्यासारख्या होतकरू लेखकांसाठी..

कथा कशी लिहावी याचे मार्गदर्शन.. मार्गदर्शक श्री दादोपंत दादोजी दोंदे..

वाचा तर..

गोष्ट लिहिण्याची पाककृती

साहित्य

एक कथानक. त्यात काही माणसे घ्यावीत. कुठल्या प्रकारची गोष्ट लिहावयाची आहे त्यावर अवलंबून माणसे घ्यावीत. उदा. प्रेमकथेत नायक नायिका.. मित्र मैत्रीण.. मग आईबाप.. त्यात कॉलेज घेतल्यास उत्तम. नायक हरहुन्नरी असल्यास गाणे, कविता, म्युझिक, मारामारी इ. सोय आपोआप होते. तेवढी पाने भरण्याची सोय. बाकी पात्रे चवीप्रमाणे!

कृती

वरील सर्व पात्रे एकत्र करून घ्यावीत. कथेच्या प्रकारानुसार वाटून घ्यावीत. म्हणजे पाटा वरवंट्यावर अथवा मिक्सर मध्ये. जात्यावर दळले तरी चालेल. अरद मरद वा एकजीव मिश्रण करून घ्यावे. ते चकलीच्या सोऱ्यात टाकून घ्यावे. एका कढईत तेल गरम करून घ्यावे. आणि वरील मिश्रणाच्या कथा पाडाव्यात. मंद आचेवर खरपूस तळून घ्याव्यात. खुसखुशीत होतात. गरमागरम वाढाव्यात. (कुणी खायला तयार नसेल तर स्वतःच खाव्यात)

या रीतीने कथा लिहिल्यास तर सदोबा नाव काढले असतेस आपल्या शाळेचे.. शाळेतून नव्हे! तेव्हा अजून वेळ गेलेली नाही! या दादूगुरूजींचे मार्गदर्शन घे.. खूप शिंक.. मोठा हो! शि वरील अनुस्वार मुद्दाम दिला आहे! जे तुला शक्य आहे तेच करावयास सांगतोय! शिकणे तेरे बस की बात नही.. आता तू म्हणशील.. बस क्या! तर बस!

पुन्हा भेटू पुढच्या पत्रात! तोवर

बाय.. टेक केअर!

तुझा

दादू

ता. क.

पुढच्या पत्री

वाचा.. फर्मास लावणी!

आता तुझी झोप उडणार हे नक्की! पण पाव्हनं जरा दमानं

***

दादूजी,

तुमचा ताक तुमच्या पत्राहून फर्मास म्हना की वं. हे पत्र लिहिन्यास कारण की हे लिव्हल्याबिगर तुमी तुमचे दुसरे पत्र याचं न्हाई अन तुमची फर्मास लावनी वाचायला मिलायची न्हाई. फकस्त एक कीडा डोक्यात वळवळतोय.. ह्ये लिखान बिखान कंदी पास्नं.. की फकस्त लावनीपुरतेच गड्या? की अजून कुनाकडनं लिवून घेतोयास?

वाट पाहतोय.. दादूजी जरा जल्दी भेजो तुम्हारा लावणीभरा खत! एकूण लाकडं गेली पुढे पण दादूमियाचा रंगेलपणा जाईना म्हणा की!

तू मी विचारलेल्या प्रश्नांना हुशारीने कात्रजचा घाट दाखवलास की!

नीले गाल
करती हाल
लाल बाल
तिचे कमाल

भरूनी पाहतो
तुजला डोळा
दृष्ट तू करीते
चोळामोळा

बघ एकदाच
मागे फिरून
पलट मागे
मान फिरवून..

आठवते ती कविता आणि त्या कवितेची मालकीण? तू हुशारीने उत्तर टाळलेस हे मला कळले नाही असे तुला वाटते आहे का? त्यामुळे

लावणीचे आमिष दाखवून मूळ प्रश्न टळेल अशा भ्रमात राहू नकोस! हम सवाल करनेवाले उत्तर निकालना जानते हैं!

तुझी गोष्ट लिहिण्याची पाककृती उत्तम आहे. त्यामुळे या पाककृतीच्या कर्त्याने कामास लागावे आणि कथा चकल्या पाडाव्यात हव्या तितक्या! आम्ही आहोतच तुझ्या वातड चकल्या खायला! हल्लीच नवीन दात बसवले आहेत त्यांची टेस्ट होऊन जाऊ देत.

माझी कथा पुढे सरकत आहे. थोडा वेग कमी आहे पण कथा लेखनात वेगापेक्षा आवेग महत्वाचा! (अजून एक कोटेबल कोट..) त्यामुळे ती पुढे सरकेलच!

बाय द वे.. नववर्षाच्या शुभेच्छा! हल्ली थर्टीफस्टच्या नावाखाली धागडधिंगा चालतो नाही? की आपण अकाली वृद्ध झालो आहोत? तू काय केलेस नवीन वर्षारंभी?

जानेवारी म्हणजे माझा नावडता महिना. हिला देवाघरी जाऊन आता दहा वर्षे झाली. जानेवारीतच. अर्थात तुला ठाऊक आहे. शेवटी तू आणि मी.. सेलिंग इन सेम बोट! पळा पळा कोण पुढे पळे तो एवढे पाहायचे

बाकी आहे! तुला पत्र लिहिल्यापासून मात्र एक नवी उमेद वाटते आहे. कारण माझ्याहून बावळट असा तू दिसलास की वाटते.. ठीक आहे यार.. गॉड इज नॉट दॅट अनकाइंड टू मी!

चल आज इथेच थाबतो! वाट पाहातोय लावणीची लावणीसम्राट दादूजी ढोलकर! हून जाऊ द्या!

तुझा

सदू

ता. क.

तुझ्या कंपवात आणि मोठ्या ह्रदयात काळजीचे कारण नाही ना? एक तपशील चुकतोय तुझा.. मोठ्या ह्रदयात सर्वांना सामावण्यासाठी जागा आहे असे नव्हे.. इतक्या जणींना तिथे ठेवल्याने ते मोठे झाले आहे. ते असो.. पण कमीत कमी पत्रे लिहित जा. एवढा धडधाकट आहेस ना? कमीतकमी याचा अर्थ पत्रे कमी लिही असे नाही.. ॲटलीस्ट पत्र लिही! एवढी साहेबाची भाषा तुला कळत असावी!

***

प्रिय सदाशिवराव पेशवे यांस

आपले पत्र पावले. मजकूर समजला. तुझाच काय माझा ही जानेवारी नावडता महिना आहे. आणि त्याचेही कारण तेच रे! असो.

तर तुझी ती कविता! लाल लाल बाल वाली विसरलो नाही मी. त्या कवितेच्या मालकिणीसही नाही विसरलो. ती स्नेहा.. तुला माझ्याच तोंडून ऐकायचे तर ऐकून घे नाव. नाव घ्यायला लाजत नाही मी! लग्नातही मी तुझ्यासारखा भाजीत भाजी मेथीची वाला उखाणा नव्हता घेतला. तुझ्या लग्नातली धमाल आठवते मला अजून. वहिनींनी उखाणा घेतलेला..

नाही आता सांगत नाही मी तो.. पण सदू तू चक्क लाजलेलास! आय कुडन्ट बिलिव्ह दॅट! म्हणजे आमचा निर्लज्जम् सदासुखी लाजू शकतो? त्यावेळी फोटो काढून ठेवायला पाहिजे होते! आणि त्यानंतर तिच्या हातून घास घेतानाही लाजलेलास तू! अख्ख्या आयुष्यातील लाजणे संपवलेस त्या दिवशी तू आणि अखंड आयुष्य निर्लज्जम् झालास तू!

तर माझ्या मोठ्या काळजाबद्दलची कळकळ.. कळवळा आणि काळजी कळून काळजात कालवाकालव की झाली! तू खरेतर डॉक्टरच

बनायचास! पुढच्या खेपेस जाईन तेव्हा डॉक्टरांना हे विचारून घेतो.. माझ्या डॉ. सदुभाऊने दिलेले सेकंड ओपिनियन म्हणून!

आता तुला ज्या गोष्टीचा बेसब्रीसे है इंतजार ती गोष्ट.. लावणी! तुला सांगू लावणी लिहिणे सोपे आहे रे! शब्द फिक्स असतात.. तेच फिरवायचे! आता तू म्हणशील म्हणून मला जमते ते.. मान्य आहे! पण काहीतरी जमतेय ना!

तर अधिक न ताणता.. वाच!

माझा माझ्यावर ताबा ऱ्हाइना
माझ्या रूपाला लाजंल आईना

काल आला गडी एक पैलवान
त्याची आगळी व्हती शान
समद्या गावात त्याला मान
बघत राहिले मी बेभान
त्याचा रूबाब मनातून जाईना..
माझ्या रुपाला लाजंल आईना

तो आसंल असा मर्द पैलवानी

म्या पन नार हाय बावनखनी
आडदांड रूप गडी मरदानी
म्या पन चतुर नार खानदानी
गडी माझा होईल की होईना
माझ्या रूपाला लाजंल आईना

म्या गावाची लटक चटक चांदणी
म्हनत्यात लाखात अशी देखणी
भरदार अशी जरी छोटीशी चणी
त्यासाठी सजले करून कंगवाफणी
तो माझा होईल झाल्याबिन ऱ्हाइना
माझ्या रूपाला लाजंल आईना

गडी भेटंल आज पुन्यांदा तरी
डोळा घालीन म्यां त्याचावरी
दोगं मिळून जाऊ कोल्हापुरी
इष्काची हौस करूया पुरी
कुनी पाहिल की ना पाहिना
माझ्या रुपाला लाजंल आईना

आता उडवा फेटे सदाशिवराव!

करू नका डराव डराव!

तुम्ही चोर आम्ही साव..

खाऊ नका उगीच भाव!

त्या लावणीच्या चार कडव्यांनी माझा आत्मविश्वास वाढलाय चांगलाच! आता कदाचित महाकाव्यही लिहून जाईन जाता जाता!

तुझा

शाहीर दादू

ता. क.

१

यापुढे काव्य रचना सुरू करू म्हणतोय.. काही काव्यबीजे पाठव! अर्थात तुझ्याकडे काही असतील तर!

२

काव्यरचना सोपी असते रे.. ती सोपी व्हावी म्हणून मी जुळणाऱ्या शब्दांची बॅंक काढीत आहे. तुला हवे असल्यास शब्द भाड्याने वा कर्जाऊ मिळतील.

तुझा

दूदा

***

शाहीर दादूस

तू शाहीर.. लावणीत माहीर!

फर्मास आगदी गड्या. दादू दादू कुटं रं इक्ता शिकलास.. वशीला अस्ता तर बालिस्टर झाला अस्तास की रं. पन गड्या येक सांग यातला पैलवान गडी मंजे तूच की न्हाई? कोंच्या मंजुला सातारकरीणीनं ब्वा म्हटली तुला पाहून ही लावनी? लय ब्येस गड्या! लय ब्येस! अशी ही साताऱ्याची तऱ्हा!

अरे लिहिता येत नाही म्हणतोस आणि असे लिहितोस.. लिहिता येत असते तर आमच्यासारख्या लेखकाच्या पोटावर पाय आणला असतास तू.

आता मी हे लिहिले म्हणून लगेच भाळून जाऊ नकोस स्वतःवर! लिहावे लागते. नवोदितांना प्रोत्साहन द्यावे लागते. कौतुकाचे चार शब्द कधी ऐकले नसतील ते तरी ऐकायला मिळावेत हीच एक इच्छा.

तुझी शब्द बॅंकेची आयडिया भन्नाट आहे. फक्त तपशीलात थोडी मिस्टेक आहे. इथे तुझ्या बॅंकेस लोन तुझा ग्राहक म्हणजे मी देईन. इच्छा असल्यास संपर्क साधावा. येऊ घातलेल्या महाकाय महाकाव्यासाठी होलसेल दरात शब्द मिळतील. अजून एक.. ही महाकाव्याची घोषणा ऐकून स्वतः व्यास आणि वाल्मिकी अस्वस्थ झाल्याची खबर आहे! त्यांना असली स्पर्धा इतक्या युगायुगात कधी दृष्टीक्षेपातही आली नव्हती! तेव्हा

लगे रहो लावणीसम्राट! फक्त एक पोक्त सल्ला.. कितीही बेडकी फुगली तरी त्याचा बैल होत नाही! तरीही बेडका, मदत म्हणून काही शब्द सॅपल म्हणून फ्री पाठवत आहे.. बाहेर माहेर.. छाती नाती माती.. वेढा तेढा मेढा.. आतडे कातडे..इ. जमेल तसे आणि तितके वापरून घेणे. अजून हवे असल्यास मागून घेणे. लाजू नये. तुला म्हणून सवलतीत देईन.

बाकी ते लग्नातले नाव घेणे अजून आठवते. आमच्यात लाजण्याची पद्धत अजूनही आहे लग्नात! तुमच्यात नाही हे मी तुझ्या लग्नात पाहिलेच आहे! तसा निलाजरेपणा तुला मात्र शोभून दिसत होता हे खरे!

नावे आणि नावाच्या मालकिणी लक्षात ठेवण्याची तुझी क्षमता दाद देण्याजोगी! पत्र लिहायला विसरणारा विसराळू विनू हे मात्र नीट ध्यानात ठेवतो! ये बात कुछ हजम नही हुई! पण तुझ्याबाबतीत कुछ भी हो सकता है! शेवटी काय आपल्या प्रायॉरिटिस ठरवाव्या लागतात आणि काय!

बाकी तुझे कंपवाताचे हात काय म्हणतात? मोठ्या ह्दयाचा तू! पण तू काय अन मी काय एकाच बोटीचे प्रवासी.. सारे प्रवासी बोटीचे म्हण! आपण एकाच बोटीने एकाच ठिकाणी पोहोचणार हे ठरलेले. तेव्हा थोडी हुरहूर लागते रे!

ता.क.

गृहपाठ:

फुकटात मिळालेल्या शब्दांतून एक कविता प्रसवा आणि आपल्या मित्रास पत्रातून कळवा.

***

राजमान्य राजश्री श्रीमान सदुभाऊ सापळे यांसी,

बालके दादूचा शि सा न.

आपले पत्र पावले. त्यातील तुमच्या नेहमीच्या सवयीने शेवटच्या काही वाक्यात मूळ मुद्दा सांगण्याचा यत्न समजला.. गड्या हे संध्याछाया भिवविती हृदया लिखाण शोभत नाही रे तुला! गेल्या पत्रात नि ह्या पत्रातही! अरे आपली इनिंग संपली की पॅव्हेलियनमध्ये परत जावेच लागेल ना! लहानपणापासून मला नवे काही दिसले की गंमत वाटते. काय नवीन आहे किंवा असेल याची उत्सुकता दाटून येते. मग या इनिंगनंतर काय.. हे पण पाहायची उत्सुकता आहेच. तिथे गेल्यावर माझी मालती परत भेटेल याची ओढ ही आहे. तेव्हा संध्याछाया भिववीत नाहीत! उलट या संध्या आणि छाया कशा असतील ते ही पाहायचे आहे! असतील.. सुंदरच असतील!

तुझ्या फ्री शब्दांबद्दल थ्यांक्स! काव्यमातेचे काव्यप्रसूतीगृहात नाव नोंदवले आहे. त्यातून नऊ मासात कविता प्रसूत होईल. त्या डिलिव्हरी नंतर

तिची डिलिव्हरी पत्राद्वारे रीतसर देण्यात येईल.. नोंद घ्यावी! तो पर्यंत पैलतीरी नयन लावून बसू नयेत. आपली कवितारुपी नात अंगाखांद्यावर खेळवणे आहे!

बाकी वाढदिवसाबद्दल तू विचारले होतेस.. सांगतो. आमच्या येथे सर्वांचेच वाढदिवस झोकात साजरे होतात! तसाच माझाही झाला. केक कापून झाला. कापऱ्या हातांनी केक कापणे वाटले तितके कठीण नव्हते मित्रा! सगळयांनी हॅपी बर्थडे टू यू म्हणून गाणे गायले. एकूण आनंदी आनंद झाला. मी देखील सर्वांना रिटर्न गिफ्ट म्हणून एक एक एक्लेअर वाटले. आपल्याला गड्या इतकेच झेपते. पण सारेच खूश होते हे महत्त्वाचे! तुझा वाढदिवस अर्थातच माझ्या लक्षात आहे. योग्य वेळेस तुला शुभेच्छा मिळतीलच! मागे तू म्हणालास त्याप्रमाणे शेपटीस गाठ मारून ठेवली आहे! आणि त्यासाठी एक शेपूट लावून घेतली आहे. मित्राचा प्रेमळ आग्रह आणि काय! फक्त गाठ मारल्यावर थोडे दुखत आहे.. तुला काही अनुभव त्याबद्दल? म्हणजे दुखण्याबद्दल? कदाचित ओरिजीनल शेपूट कमी दुखत असावी या आर्टिफिशियल शेपटीपेक्षा. आपला स्वानुभव कळवणे.

तुझ्या कथेत पुढे काय झाले गड्या? म्हणजे त्यातला एक अचानक येणे बंद का झाले याचे उत्तर शोधतो आहेस? मी कथालेखनाच्या टीप्स पाठवल्या होत्या त्यात टाकून चकल्या तळून पाहाणे! बाकी आपण प्रथितयश लेखकसूर्य! आपल्यापुढे तोंड उघडणे म्हणजे सूर्यापुढे

काजव्याचे चमकणे! अर्थात हे मी सूर्यास्तानंतरच्या काजव्याबद्दल बोलत आहे!

एक चांगली गोष्ट घडते आहे.. जानेवारी संपला.. आता पुढच्या वर्षीपर्यंत काही तो येत नाही! याबाबतीत तुमचं आमचं जमतं बरे! आता फेब्रुवारीत काही व्हॅलेंटाइन्स डे असतो म्हणे. आपल्यावेळी ही सोय नव्हती. नाहीतर किती सोपे झाले असते नाही? असू देत. पुढच्या जन्मी उपयोगी पडेल! असा दुर्दम्य आशा-वाद हवा! आपल्या वर्गात आशा होती तिचा नि ह्याचा काही संबंध नाही.. नाहीतर भोचक पणे काहीतरी लिहिशील. तशी सवयच तुझी!

तुझा डायबिटीस बरा आहे ना? गोड न खाता माझ्याशी गोड वागला असतास तर ही वेळ नसती आली! तू सांगितलेलेच तुला सांगतो.. जीभेवर ताबा हवा!

तुझा

दादू

ता. क.

व्हॅलेन्टाइन डे कसा साजरा केलास ते कळव! जमल्यास फोटो देखील पाठवणे!

दादू

***

प्रिय दद्दुस,

काय सांगू गड्या! पत्र लिहायला उशीर होतोय.. तोही माझ्या कडून! तुला अपेक्षा नसेल याची. कारण तू तर हळूबाबा! आणि विसराळू विनू! पण नाही राजा! व्हॅलेन्टाइन डे सेलिब्रेट झाला माझा! कसा? अरे गोकुळ भरलेले काही दिवस! तू नात अंगाखांद्यावर खेळू दे म्हणालास.. तेच घडले रे. माझी एकुलती राजकन्या सुवर्णा आणि तिची चिमुकली राजकन्या.. दोघेही आलेले. सारा आनंदी आनंद! असे दिवस गेले की ते मी मनात भरून ठेवले आहेत. दीर्घ श्वासातून! आता पुढचे काही महिने बघायला नको. त्यामुळे आनंदात आहे मी!

खरेतर तू म्हणतोस तेच ठीक. एरवीही आनंदात राहणे गरजेचे आहे. उगाचच आपल्या एकटेपणाचे कोडकौतुक करून स्वतःवरच दया येणे.. मूर्खपणा आहे. आज या बाबतीत तुला पूर्ण मार्क्स.

मार्क्स म्हणजे अगदी कार्ल मार्क्स म्हण!

आठवतोय ना कार्ल मार्क्स?

असो. आता तुझे कौतुक बास झाले. आता स्वप्नातून वास्तवाकडे वळू. तर कविता करणे सुरू आहे की नाही? खरेतर एक गद्य माणूस पद्य भाषा करतो हाच एक मोठा विनोद आहे की नाही? पण विनोद आयुष्य सुसह्य करीत असेल तर तेही क्रेडिट तुला द्यावयास हरकत नाही!

तर कधी पाठवतोस तुझे विनोद.. म्हणजे कविता? वाट पाहतोय बाबा.

आता मला वाट पाहण्याचाच छंद लागलाय म्हण ना! दोन तीन महिन्यांतून घरी येणारी राजकन्या ( तिला राजकन्या म्हटले की मी आपोआप बनतो.. राजा!) आणि महिन्या दोन महिन्यात येणारे तुझे पत्र! यांना लाइफलाइन म्हणू नये तर काय म्हणावे? आज माझे काही बिनसले आहे गड्या पण. बघू म्हणता तुझ्यातले दुर्गुण दिसायलाच तयार नाहीत! होते असे कधी कधी! आता तुझे म्हणणे मानून मी आता एकदा ही संध्या आणि छाया यांना घाबरणार नाहीए. याबाबतीतही तुझे आभार मानावेच लागतील.

एकाएकी हा आभार समारंभ झाल्यासारखे वाटायला लागले आहे राजा! पण तू असे चांगले काही करत असतास आधी तर तुला आधीही मी चांगले नसते का म्हटले? काही हरकत नाही आता तर आता.. सुधारलास हे चांगले झाले! इट्स नेव्हर टू लेट यार!

बाकी तुझा वाढदिवस आनंदात साजरा झाला याचा आनंद झाला. एक्लेअर काय किंवा केक काय.. शेवटी आनंद महत्वाचा! तो तुला मिळाला याचाच आनंद आहे मला देखील!

आज खूप दिवसात खूप तृप्त वाटते आहे. अर्थात काही बिनसले आहे माझे! म्हणजे तुला चांगले म्हणावेसे वाटतेय यातच सारे आले. पण मित्रा.. एक सांगतो .. यू आर ॲन इंपॉर्टन्ट पार्ट ऑफ माय लाइफ! थ्यांक्स फॉर बिइंग देअर! तुझी पॉझिटिव्ह एनर्जी इज इन्फेक्शियस. आणि मी तुझ्याहून कित्येक पटींनी नशीबवान असतानाही तूच मला आधार द्यावास.. हॅट्स ऑफ टू यू मित्रा..

आणि आज लिहिले ना ते एकदम मनापासून गड्या. थांबतो.

पत्रोत्तराच्या प्रतीक्षेत

तुझा

सदू

ता. क.

जिंकलंस मित्रा.. आणि जिंकलास ही तू!

सदू

***

प्रिय सदुटल्या,

हे आभार समारंभीय भाषण वाचले. गड्या डोळे भरून आले. थरथरत्या हातांनी पुसले स्वतःच ते. तसे इथे सारे काही आहे रे. आजूबाजूला समवयीन आहेत. समदु:खी नाही म्हणत. कित्येकांना तर पोटची पोरे सोडून गेलीत इकडे वृद्धाश्रमात. कुणाच्या घरात जागा नाही त्यांच्यासाठी तर कुणाच्या मनात! मी कमीत कमी त्यांच्यापेक्षा सुदैवी. आम्हाला तर मूलबाळच नाही. त्यामुळे असलेल्या मुलांकडून उपेक्षेचे तरी दु:ख नाही. मालती गेल्यावर हेच माझे घर. गेली काही वर्षे ह्या आश्रमामुळेच झालीत सुसह्य. त्यात गेल्या काही महिन्यांपासून तुझा पत्र सहवास. मी आयुष्यात कधी पेला अर्धा रिकामा आहे म्हटले नाही. अरे तो त्या पेल्यातल्या पाण्यावर अन्याय नाही का? मालती गेली.. एकटेपणा काय असतो ते अनुभवले. त्यात ह्या आश्रमातल्या सुपातल्या लोकांची साथ.. आज ना उद्या सारेच जातील जात्यात! पण सारे जाणूनबुजून हसत असतात. विरंगुळा म्हणून सारेच एकमेकांची टिंगल करत असतात. नवा कुणी भिडू आला तर त्याला कॉलेजच्या दिवसांसारखे रॅगिंग ही करतात. आमच्या इथले सारेच म्हणजे इकडचा स्टाफ आणि माझे डॉक्टर.. सारेच चांगले आहेत. त्या साऱ्यांवर नि तुझ्यासारख्या दोस्तांवर उगाच दुर्मुख होऊन का करावा अन्याय?

मी काय की तू काय.. आपण काही मोठे तत्वज्ञ नाही. सामान्य माणसे आपण. आपले सारेच सामान्य. म्हणून आपण विचार ही सामान्य

का करावा? तू मला जे आज लिहिलेस तेच माझ्याकडून तुला लागू होते राजा. यू आर ॲन इक्वली इम्पॉर्टन्ट पार्ट ऑफ माय लाइफ. आणि मी त्याबद्दल तुला थ्यांक्स नाही म्हणणार! कारण मीच नसतो तर तू माझ्या आयुष्याचा भाग कसा झाला असतास? पण आज तू खूश आहेस वाचून मी पण खूश झालोय इथे. वयानुसार की काय माहिती नाही डोळे भरून येताहेत.. तेव्हा थांबतो रे.

वाट पाहतोय.. तुझ्या पत्राची.

तुझा

दादू

ता. क.

१ होळी गेली.. पाडवा येतोय.. लवकरच एक राष्ट्रीय सण येतोय.. कुठला ते कळेलच तुला.

२ कार्ल मार्क्सला कसे विसरणार? आपल्या कॉलेजात जगातील सारे बॅक बेंचर्स एक व्हा ही हाक त्यानेच तर दिलेली! अगदी कार्ल.. नाही काल घडल्यासारखे आठवतेय! नाही.. तसे नसणार.. हल्ली मला काल घडलेल्याचा विसर पडतो.. पण जुन्या गोष्टी बरोबर आठवतात..

बाय

दादू

***

प्रिय सदू,

सद्या सध्या आहेस कोठे? होळी कधीच झाली. पाडवा आला. रंग बरसे गाणे म्हणून झाले. गुढ्याही झाल्या उभारून. कॉलेजातली आपली रंगपंचमी आठवली. तरी तुझ्या पत्राचा पत्ता नाही. अरे तू लेखक. तुझ्या पत्रास उत्तर देणे ही आजवरची माझी एकमेव साहित्यनिर्मिती. थोडक्यात तुझे पत्र हे माझ्या पत्रलेखनाचे इंधन. असे असताना तेच तू लिहित नसलास तर म्या पामराने साहित्यचूल कशावर पेटवावी? काय लिहावे?

आठवतेय, तू कशा लांबलचक चिठ्ठ्या लिहायचास पूर्वी.. म्हणजे आपण कॉलेजमधून काही महिन्यांसाठी घरी जात असू त्यात तुझी दोन तीन पत्रे लिहून होत. मला झकत उत्तरे द्यावी लागत. मी ती कशीबशी लिहित असे. पण आता तूच लिहित नाहीस.. लिहीच.. कारण एकच.. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही. पण काळ सोकावतोय! हल्ली तर गडी लई फॉर्मात होता. आणि एकाएकी पत्र लिहिणे बंद व्हावे?

रंगपंचमीच्या आठवणी किती आहेत सांगू. तुला ठाऊक असणार.. तुझ्या आठवणीत असणार सगळेच! माझी मालती मला त्याच दिवशी भेटलेली. त्यावेळी तू मला किती चिडवलेलेस. आणि त्यावेळी मी लाजलो होतो! आणि तू म्हणतोस मी निलाजरा आहेस! आणि त्यानंतर तू मला कितीवेळा कविता लिहून दिलेल्यास. मालूला कवितांचे वेड होते. मी तिला फक्त तुझ्यावर आणि तुझ्यासाठीच मी कविता करतो सांगून बाकी कविता

लेखनातून सुटका करून घेतलेली. प्रेमात सारेच माफ! पुढे आमची प्रेमकथा त्याच पायावर उभी राहिली. याच्यापुढे त्याबद्दल मी तुझा ऋणी राहिन वगैरे लिहिले असते.. पण नाही लिहिणार.. कारण आपला आभार प्रदर्शनाचा समारंभ आधीच संपलाय ना!

त्यानंतर मला तुझी आणि वहिनीची झालेली भेट आठवते. आपल्या रूममध्ये तुम्ही भेटणार होतात. मी नसल्याचे समजून. आणि मी त्या बेडखाली लपून राहिलेलो. कसली धांदल उडालेली तुझी! तू तर तेव्हा रागवलेलास माझ्यावर! पण आपल्याच शरीराच्या भागावर कुणी रागावू शकतो? आपण एकाच शरीराचे दोन भाग असल्यासारखे अभिन्न होतो. पुढे आपल्या वाटा वेगळ्या झाल्या. आधीतरी आपण भेटत असू. नंतर तू संसारात रमलास. मालती आणि मी आम्हाला न होणाऱ्या मुलामुलीची वाट बघण्यात गुंतलो. आपले एक ठीक असते पण मालतीला ते असह्य व्हायचे. शेवटी आम्ही समजून चुकलो.. आमच्या नशिबी हेच आहे. पण त्यात कितीतरी वर्षे खर्ची पडली. तुला तशी माझी कहाणी ठाऊक आहे. मध्ये आपला रेग्युलर पत्रव्यवहार होता. तुझ्या राजकन्येच्या लग्नात आपण भेटलो ते शेवटचे. नंतर मालतीच गेली. मी इकडे आश्रमात आलो. मी तेव्हा नशिबावर खूप रागावलेलो. कित्येक महिने माझे असेच गेले. शेवटी विचार केला.. थिंक हाऊ सदू विल थिंक अबाऊट इट.. तू अखंड पॉझिटिव्ह असायचास. आणि ॲडव्हर्स परिस्थितीतच तर आपली खरी परीक्षा होते. एक दिवस सकाळी उठलो तेच हा विचार करून. एका रात्रीत समूळ

बदललो. म्हटले नो मोअर क्रिबिंग. जे मिळालेय त्याबद्दल विचार करीन. थिंक हाऊ सदू थिंक्स! असो. इतके गंभीर लिहिणे पुरे आता. मला ही ते शोभत नाही.. आणि तुझ्या जन्मजात भोचकपणाने तू त्यावर काहीबाही खोचक लिहायचास.. म्हणजे लिहिशीलच!

पण आता तुला दिलेले प्रॉमिस.. यस्स वेडीवाकुडी का होईना लिहिलीय मी कविता.. वाच.. नाही वाचावीच लागेल तुला. आणि तिच्याबद्दल मत नाही कळवलेस तरी चालेल. तू काय बाबा.. प्रथितयश साहित्यिक!

सदू दादूचे बडबडगीत!

एका गावात होती
एकदा दोन मुले
एका हाती बुके
दुसऱ्या हाती झुले

उंच लई उडे
झुल्यावरचा दादू
ये जमिनीवरती
सांगे त्याला सदू

दादू ऐकतो कसला
उंच जाऊन बसला
सद्या मारे धक्का
धापकन खाली फसला

सद्या होता हुशार
दादू लाडका त्याचा फार
म्हणे बाळा रहा तयार
अशी स्टोरी सो फार..

सदू दादू दोघे होते
जन्मजात खोडकर
दोघे मसालेदार
एक कुबल दुसरा बेडेकर!

एकदा झाले काय
सद्या ओढे दादूचे पाय
दादू तसा हुश्शार
तावडीत सापडेल काय!

सुळकन सुटे उठे
सदू हाती नाही येई
दादू न सापडतो
त्यास उपाय का काही!

असे खेळतात ते
रोज रोज कबड्डी
सदू लिंबू कच्चा
दादू म्हणे तू ना रेड्डी?

त्यात माझ्या उत्तुंग प्रतिभेस शोधू नकोस.. प्रतिभा इनामदार.. तीच थर्ड इयर वाली.. तिला तर मुळीच नको शोधूस. फक्त बडबडगीत आहे ते दोन निरागस बालकांचे! वाच आणि सोडून दे!

पत्र लिही रे.. वाट बघतोय.. आता पाडवा.. पुढच्या महिन्यात राष्ट्रीय सण आहे आपला!

तुझा

दादु

ता. क.

दही न लावल्याने आज ताक नाही!

***

बालके सदूस

अनेकोत्तम आशीर्वाद.

सद्या गद्ध्या आहेस कुठे?

आपला राष्ट्रीय सण म्हणजे तुझा वाढदिवस आला नि तू साधे चार ओळींचे पत्र लिहू नयेस? अरे तू आज मोठा झालास.. सद्या जयंती आज आणि तू लोळत पडलायस गाढवासारखा. उठ आणि मोठ्या माणसांच्या पाया पड.. म्हणजे माझ्या. जीवेत शरद: शतम.. म्हणजे अजून म्हतारा होशील असा एक म्हताऱ्याचा दुसऱ्यास आशीर्वाद!

अरे विचार काय आहे तुझा? मागच्या पत्राचे उत्तर नाही.. न राहवून आज परत लिहितोय. का असला अबोला कळेल काय? की ती तुझी नवनवनोन्मेष शालिनी की अशी काहीतरी म्हणतात त्या प्रतिभेने तुला इथेही दिलाय दगा.. टांग म्हणणार होतो.. पण वाढदिवसाच्या शुभचिंतनात थोडा डेकोरम तर पाळायला हवा!

तर आज काय प्लॅन? तुझा वाढदिवस म्हणजे काय! वहिनीचा फिक्स बेत असायचा. तुझी आई तुझ्यासाठी बनवायची तसा गुळाचा शिरा! आता तुझी लाडकी लेक बनवूत खाऊ घालत असेल. तेवढे ब्लड शुगरीकडे लक्ष राहू दे म्हणजे झाले.. म्हटले ना.. जीभेवर ताबा हवा! तर शिराबिरा खाऊन झाला असेल तर आळस झटकून उठ आणि ध्येयाकडे वाटचाल

कर! तुझे ध्येय एकच.. मला पत्र लिहिणे! ती ध्येयपूर्ती झाली की तू डोळे मिटलेस तरी चालेल.. मग पुढच्या पत्राच्या वेळी उघड ते!

वाढदिवसाचे फोटो पाठव. तुझी आधीच सुटलेली ढेरी अजून किती सुटली ते बघायचे आहे. तुझ्यात नि माझ्यात हाच फरक आहे बघ! माझ्या एकदा पडलेल्या टक्कलाची टक्केवारी वाढण्याची शक्यता नाही.. पण तुझे वाढता वाढता वाढलेले पोट भेदिले सूर्यमंडळा म्हणून कितीही पुढारलेले असू शकते! तेव्हा माझे फोटो बदलणार नाहीत तर तुझ्यात जाणवेल बदल! तेव्हा न लाजता फोटो पाठवच!

वाट पाहातोय रे.. लिही लवकर!

दुझा,

तादू

ता. क.

या पत्रास उत्तर नाही दिलेस तर रागावण्याचे सर्व हक्क राखून ठेवले आहेत मी!

दादु

***

आदरणीय दादूकाकांस

स. न.

तुमचे अप्पांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देणारे पत्र आजच मिळाले. दैवयोग काय असावा.. की अप्पांना त्यांच्या जन्मदिनीच देवाज्ञा झाली. त्याआधी महिनाभर ते आजारी होते. त्या अवस्थेतही अप्पा 'पत्र लिहायचेय' असे काही पुटपुटत असत. आज तुमचे पत्र मिळाले. त्यांच्या टेबलाच्या ड्रॉवरमध्ये तुमची आधीची पत्रे मिळाली. आणि त्यांनी आजारी पडण्याआधी तुम्हाला लिहायला घेतलेले पत्रदेखील मिळाले. तेव्हा त्यांनी तो पत्र लिहिण्याचा ध्यास का घेतला होता ते कळले. त्यांचे ते अर्धवट सोडलेले पत्र देखील बरोबर पाठवत आहे.

त्यांच्या आयुष्यात तुमचे स्थान महत्त्वाचे होते. कित्येकदा ते तुमच्या कॉलेजच्या मैत्रीच्या गोष्टी सांगत असत. त्यांच्या जाण्यानंतर हा एक अध्याय संपला म्हणायचे. गेल्या काही महिन्यांत ते खूपच खूश दिसायचे. त्याचे श्रेय तुम्हालाच आहे.

आपली काळजी घ्या. प्रकृती सांभाळा.

आपली नम्र

सौ. सुवर्णा

अप्पांचे ते अर्धेमुर्धे पत्र बरोबर दिले आहे.

***

प्रिय दादूमियास,

कविता फर्मास. आवडली. फक्त सदू आणि दादू या नावांची अदलाबदल झाली आहे. तेवढी चूक सुधारलीस तर उत्तम. थोडक्यात काय सुधारणेस भरपूर वाव आहे!

तर.. तुझे पत्र वाचून फार शांत वाटत आहे. मित्र असावा तर असा. म्हणजे माझ्यासारखा.. ज्याला तू असे पत्र लिहू शकतोस. कसे कोण जाणे काही दिवसांपासून अगदीच तृप्त आणि शांत वाटत आहे. वाटते की आता आपली ही खेळी संपली तरी चालेल. आधी वाटत असे की कधीही तो यमदूत येऊन म्हणेल, म्हाताऱ्या म्हाताऱ्या खाऊ का तुला.. मी म्हणेन.. नको रे बाबा खाऊ मला.. चार दिवस राहिन.. तूपरोटी खाईन.. मग मला खा! असे म्हणून मी भोपळ्यात बसून निघून जाईन. पण आता वाटतेय.. त्याने विचारावे.. म्हाताऱ्या म्हाताऱ्या.. खाऊ का तुला. नि मी म्हणेन.. खा की! तू म्हणालास तशी उत्सुकता मला देखील आहे. अनंताच्या प्रवासाची. तिथे जायला न तिकिट लागते ना काही सामान. तू म्हणालास तसे.. मला देखील तिथे हिला जाऊन भेटण्याची उत्सुकता आहे..

फक्त पत्रांची उत्सुकता असते ती नसेल.. म्हणजे मी नसल्यास तुला पत्र कोण लिहिल रे? आणि तुझे कसे होईल रे?

एक माझ्यासाठी चांगली आणि तुझ्यासाठी वाईट गोष्ट आहे रे.. आता तुझ्याकडे आयडियांची भीक नको मागावयास.. कारण मी लिहित होतो त्या गोष्टीचा शेवट आता जवळ आलाय..

(पूर्वप्रसिद्धी: गंधाली दिवाळी २०१९)

२

# अव्यक्त ..

डिअर राम,

गॉट धिस ॲड्रेस समहाऊ.. आहेस कुठे रे तू? एफबी वर तुझे नुसतेच नाव पाहिले. फोटो नाही नि काही नाही. कुठून कुठून पत्ता मिळवला.. आणि पत्र लिहायलाच बसले..

कसा आहेस तू? पंचवीस वर्षांत आपली भेट नाही की कसला अतापता नाही. बनारसमध्ये आहेस एवढे या पत्त्यातून कळले.. पण त्याच्या पुढे मागे अजून काही नाही .. तुला इतक्या वर्षांत या ॲनीची आठवणही नाही आली का रे? नसेल आली तरी ठीक आहे.. मला मात्र डॉ. रामशरण त्रिपाठींची आठवण मधून मधून येत होती.. कॉलेज सोडल्यानंतर आपले मार्ग वेगळे झाले.. अजूनही कॉलेजचे दिवस आठवतात.. राम नावाचा एक हँडसम डॉक्टर सगळ्या पोरींत प्रसिद्ध होता.. आणि त्याची मी एक खास मैत्रीण होते.. खास म्हटले तर चालेल ना तुला? त्यानंतर तू जो दिसेनासा झालास..

लवकर तुझा व्हॉट्सॲपचा नंबर पाठव म्हणजे इन्सटं कम्युनिकेशन होईल.. हो की नाही?

तू कितीही बिझी असलास ना तरी जुन्या मैत्रीची शपथ, या पत्रास उत्तर लिहीच .. म्हणजे माझी तशी ऑर्डर आहे समज हवे तर. वाट बघतेय.

ॲनी

***

प्रिय ॲनी,

तुझ्या पत्राचे पाकीट नि त्यावर तुझं मोत्यासारखं अक्षर पाहून उडालो मी तीनताड. इतक्या वर्षातही तुझं अक्षर नाही विसरलोय.. तूच सांग इ मेल नि व्हॉटस्ॲप वर असले अक्षर बघायला मिळाले असते? हस्ताक्षराच्या मागे.. सिनेमात दाखवतात ना तसे.. ती व्यक्ती उभी असलेली दिसते.. त्या साठी ह्या स्नेल मेलला पर्याय नाहीच.

इतक्या वर्षांनी तुझं अचानक पत्र येऊन पडलेय .. माझा विश्वास बसत नाही.. आणि पंचवीस वर्षांनंतरही तेव्हाची गोल्डन कॉलेजक्वीन ॲनी व्हर्गीस माझी आठवण काढून मला पत्र पाठवते.. और क्या चाहिए?

खरं सांगू ना तर मला लिहावे काय तेच सुचत नाहीये.. या पत्राच्या सुखद धक्क्यातून सावरलो की मोठे पत्र लिहायला घेईन. मोठमोठया उत्तरांसाठी मी प्रसिद्ध होतोच की नाही कॉलेजात?

पण सध्या एवढेच. आधी जाऊन हे पोस्टात टाकतो. भारतीय पोस्ट खात्यास आपल्यासारख्यांची सक्त गरज आहे! वयाच्या पन्नाशीत देशाला आपली तेवढीच मदत!

रामशरण

***

डिअर राम,

थ्यांक्स. तू पत्र पाठवलेस .. अगदी लगेच नि मनापासून लिहिलेस.. धन्यवाद. तुझ्या मोठ्ठ्या पत्राची वाट बघते आता.

तू काही इतक्या सहज मला तुझा फोन नंबर द्यायचा नाहीस असे दिसते .. हस्तलिखित पत्राबद्दल तू म्हणतोस ते खरेच आहे.. पण मला तुझं अक्षर वाचणे म्हणजे डॉक्टरचे प्रिस्क्रिप्शन वाचल्यासारखे वाटते त्याचे काय? बिचारे तुझे पेशंट! नाही पण तू पॅथॉलॉजिस्ट आहेस.. तुला कशाला प्रिस्क्रिप्शन लिहावे लागत असणारे .. तरीही तुझे पत्र वाचून आयॅम थ्रिल्ड!

राहता राहिली कॉलेज क्वीन ची क्वीनशिप.. ते संस्थान कधीच खालसा झाले.. त्यामुळे गेलेल्या दिवसांच्या आठवणी फक्त उरल्या आहेत..

ते सोड, लवकरच डॉक्टर रामशरण पन्नाशी गाठत आहेत. तुझा वाढदिवस अजून लक्षात आहे माझ्या ..

काय बेत? दणक्यात होऊन जाऊ देत.. हाफ सेंच्युरी सेलिब्रेशन. जवळपास असते तर मी आलेच असते..

पण काही हरकत नाही. माझ्या वाटेचा केक तू खाशीलच.. अजूनही तू तसाच खादाड आहेस का? असशील तर बायकोचे हाल आहेत तुझ्या. बिचारी जेवण बनवून बनवून थकत असेल.. लग्नाआधी भेटवली असतीस तर तिला वॉर्न तरी केले असते ना..

तुझे लांबलचक पत्र लिहायला घे. अक्षर जमेल तसे काढ.. मला नाहीच कळले तर जवळचा केमिस्ट आहेच .. काय?

ॲनी

***

प्रिय ॲनी,

तुझे दुसरे पत्र मिळाले. काही गोष्टी क्लियर करून टाक.. तुझे अक्षरशः मोत्यासारखे तेव्हाही होते नि आता ही आहे.. पण मला सांग सगळ्यांचेच अक्षर असे सुंदर असते तर कुणी तुझ्या अक्षराला सुंदर म्हटले असते काय? थोडक्यात आमच्या सारख्यांमुळे तुझ्या अक्षराला खरी किंमत आहे! थोडक्यात यू शुड बी ग्रेटफूल की माझे अक्षर अक्षरशः तुझ्यासारखे सुंदर नाही! हो की नाही?

फोन नंबरचे काय आहे ना की मी एकदा माझ्या खुर्चीत बसलो की फोनकडे पाहात नाही. बारा तास मी हॉस्पिटलात असतो.. मायक्रोस्कोप

आणि स्लाइड्सशिवाय दुसरे काही सुचत नाही मला.. आजूबाजूला पाहात नाही मी. मग तू म्हणशील, रामच्या डोक्यात हवा गेलीय. ही जस्ट डझंट रिप्लाय एनी फोन कॉल्स! त्यापेक्षा हे गोगलगाय टपाल चांगले .. हो की नाही? हे प्रश्नचिन्ह व्याकरणाच्या सोयीसाठी फक्त.. तू होच म्हणणार याची खात्री आहे मला.

तर आता तुला माझी पंचवीस वर्षांची गोष्ट सांगून टाकतो. अगदी दर वर्षाला एक ओळ दिली तरी पंचवीस ओळी होतात. त्यात मग इंट्रो.. कन्क्लयुजन वगैरे घातले की तीस पस्तीस ओळी तर कुठे गेल्या नाहीत .. आता तूच लांबलचक पत्राची अपेक्षा व्यक्त करून स्वपादधोंडा पाडून घेत असशील तर माझी त्यात चूक नाहीच.. हो की नाही? हे प्रश्नचिन्ह ही तसेच.. त्यामुळे उत्तर .. नाही हेच!

तर सुरू पॅथॉलॉजीपासून करतो. इन्टर्नशिप संपली नि तू कॉलेज सोडून गेलीस.. ती गेलीसच.. आगेमागे काही कॉलेजची पोरं आहेत नि जस्ट फ्यू मंथ्स अगो आपण सगळे बेस्ट ऑफ फ्रेंड्स होतो .. हे विसरलीस? अर्थात तुझ्या स्वप्नातला प्रिन्स चार्मिंग भेटला असणार .. त्याच्या रथावर आरूढ तू संसारात मग्न असणार .. असा विचार करून ही तेव्हा बरे वाटायचे.. एम डी त मी पहिला आलो तेव्हा ते गोल्ड मेडल पहिले तुलाच दाखवायचे होते.. पण तुझा पत्ता काही लागला नाही. त्यावेळी हे मोबाईल नि सोशल साइट्स नव्हत्या, नाहीतर.. तर पॅथो संपले.. मी काही वर्षे आपल्याच गोल्डन मेडिकल कॉलेजात लेक्चरर झालो.. मग बॅक टू बनारस.

इकडच्या मोठ्या हॉस्पिटलात मी चीफ पॅथॉलॉजिस्ट आहे.. वर्कलोड खूप आहे.. बारा तास मी कामात डुबवून घेतो स्वतःला.. बाकी कसला विचार करायची गरजच नाही मग.. पॅथो मध्येही रीनल पॅथॉलॉजीत माझं स्पेशलायझेशन आहे.. अगदी रिसेंटली अमिलॉइड किडनी डायग्नोझ केली.. माझ्या दहा पेशंटची सीरीज पुढच्या कॉन्फरन्समध्ये प्रेझेंट करतोय.. बस और क्या चाहिए जीने के लिए?

थोडक्यात हे असे आहे.. आजही कॉलेजचे दिवस आठवतात. इंग्रजी नाटकातली तू राजकन्या .. एका खऱ्या राजकन्येने खोट्या राजकन्येचा दिमाखात केलेला रोल.. मी यात फक्त प्रेक्षक वर्गात .. स्टेजवर न मला कधी वावरणे जमले, न जमेल.. पण तू ग्रेट होतीस .. जस्ट अ सेकंद.. तू नाव बिव बदलून स्टेज आर्टिस्ट तर नाही ना झालीस? आपल्या ट्रेक्स आठवतात.. पिकनिक्स नि कॉलेज वीक.. ऑक्रेस्ट्रात आपण सगळे धमाल करत असायचो.. तुझ्या आजूबाजूला सदा पोरांची गर्दी. तसे असले तरी तुझी न माझी मैत्री मात्र खास होती. कॉरिडॉरमध्ये आपण तासन् तास गप्पा मारत बसायचो.. कटिंग चहा नि अखंड गप्पा. वुई वेअर बेस्ट ऑफ फ्रेंडस्. म्हणून तर तुझा कॉलेज सोडल्यावर कसलाच कॉन्टॅक्ट नाही म्हटले तर थोडी धाकधूक व्हायची. बट नॉट नाऊ.. यू मस्ट बी हॅपी विथ युवर हब्बी अँड किड्स ..

मला सध्या तरी कॉलेजच्या ग्रुपमध्ये नाही जावेसे वाटत.. एकतर ॲम ॲव्हर्स टू मोबाईल .. आणि दुसरे, मला वाटते आय हॅव ग्रोन अप

फास्टर दॅन यू ऑल.. किंवा लाईफ हॅज मेड मी ग्रो अप फास्टर दॅन अदर्स! कॉलेजग्रूपमधला टाइमपास आता नाही खुणावत मला.. त्यापेक्षा कुठल्यातरी रेअर पॅथो स्लाइड्स बघण्यात जास्त गंमत वाटते मला.

तुला माझा वाढदिवस आठवतो.. एकच रिक्वेस्ट.. कॅन यू रिमाइंड मी व्हेन इज इट? आणि तुझा बर्थडे कधीय ते पण कळव जरा. आजकाल हे बर्थडे सेलिब्रेशन वगैरे खूपच होते नाही? आपल्यावेळी एक कप आइस्क्रीममध्ये साजरा व्हायचा तो..

तू पत्राला उत्तर लिहीच. माझ्या नेहमीच्या जर्नल्स नि हॉस्पिटल कम्युनिकेशन मध्ये तुझ्या अक्षरातले पत्र म्हणजे सुक्या गवतात उमललेले रानफूल वाटते.. त्याची भूल पडणार नाही असे कसे होईल? तेव्हा लिहीच.. लिहित रहा..

वाट बघतो.. अॅश्युअर यू ऑफ रिप्लाय फ्रॉम माय साईड..

बाय

राम

***

डिअर राम,

थॅंक्स फॉर फाइंडिंग टाइम टू राइट.. मी लिहितेय.. तू लिहीशील.. लेटर फॉर अ लेटर विल मेक द होल वर्ल्ड लेटरड्.. लिटरल्ली..

तू पॅथोचा बॉस झालायस हे वाचून आयॅम प्राऊड ऑफ यू. तू तेव्हा पण रॉबिन आणि बॉइडची टेक्स्ट बुक्स बायबलसारखी वाचायचास.. पॅथो प्रॅक्टिकल दुपारी जेवणानंतर असायचे.. आम्ही सारे लॅबमध्ये डुलक्या काढायचो तेव्हा तूच एकटा जागा असायचास. झोप येऊ नये म्हणून त्यादिवशी दुपारचे जेवण स्कीप करायचास. अशी कितीतरी प्रॅक्टिकल्स आठवतात मला. आपण मग संध्याकाळी कँटीनमध्ये गप्पा मारत तासन् तास बसायचो. आपली गँग पण तशी क्यूट होती. खरे सांगू ना, तर ते कॉलेजचे दिवस अगदी कालच सगळे घडल्यासारखे डोळ्यांपुढे येतात. कट्ट्यावर आपली गँग बसलीय. कुणी सीरियस असेल तर त्याला गंभीर राहूच न देण्याचा पण करत एकमेकांची टांग खेचायचो आपण. आय नो, तू तसा शांत तेव्हाही होतास.. पण कट्ट्यावर तुझ्यात काय संचारायचे भूत कोणास ठाऊक. याच कॉरिडॉरमध्ये बसून कित्येक जोड्या जमल्या.. काही तुटल्या.. नि काही.. जमता जमता राहिल्या. एखाद्या दहावीतल्या निबंधात विचारावे तसे, गोल्डन मेडिकल कॉलेजचा कट्टा बोलू लागला तर.. असा काही निबंध लिहावा का रे? तू लिहिशीलही. कॉलेजला आता सत्तर वर्षी झाली.. दर वर्षावर एक लिहिली तरी सत्तर ओळी होतात .. आणि बाकी इंट्रो नि कन्क्ल्युजन वाल्या आहेतच ॲडिशनल.. म्हणत. आय थिंक दॅट इज युवर सीक्रेट ऑफ टॉपिंग एक्झाम्स!

बरे, बर्थडेबद्दलचे रडगाणे गाणे बंद कर.. कमॉन.. आठवत नसेल तर आपले बर्थ सर्टिफिकेट चेक कर.. नाहीतर अर्थातच मी आहेच.. पण या

स्नेल मेलचा काय भरवसा? आज टाकलेले पत्र पुढील वाढदिवसाला मिळाले तर? त्यापेक्षा तू आपला नंबर देऊनच टाक.. म्हणजे इन्स्टंट रिमायंडर पाठवेन..

मी तुला तेव्हापासून ओळखून आहे. नो वन कॅन कन्व्हिन्स यू.. अ टफ नट टू क्रॅक.. त्यामुळे तू मला नंबर देणार नाहीस हे माहिती असूनही लिहितेय.. लिहीत राहिन.. टिल आय गेट दॅट फ्रॉम यू.. आणि यू ऑल्सो नो मी वेल.

ॲनी

ता.क.

तुझे पत्र वाचताना काही प्रश्न येतात मनात .. बट् सम अदर टाइम..

ॲ

***

डिअर ॲ,

रिगार्डस फ्रॉम आर.ए.एम.. म्हणजे रँडम ॲक्सेस मेमरी .. त्यामुळे अजून काही आठवणी हव्या असतील तर ॲक्सेस कर.. फक्त बर्थडेट मात्र सोडून .. का ते विचारू नकोस..

हे शेवटचे वाक्य लिहिले ना की मला मिलीतला अमिताभ आठवतो.. पाठून कुणीतरी म्हणतेय..

कितने दुखी हैं अमितबाबू.. जया भादुरी सिंपथॅटिकली बघतेय आणि अमितबाबू गाणे गात बसलेत.. मद्यपान करत..

एखाद्या दु:खाला काव्यात्म कसे करावे या सिनेमावाल्यांकडून शिकावे नाही? आणि ते मद्यपान! मला आठवतेय आपले किती डिस्कशन झालेले या बद्दल. तू म्हणालेलीस.. माय सोल कंडीशन इज.. नो अल्कोहोल फॉर माय ग्रूम .. मी म्हणालेलो तेव्हा .. बट युवर जॉनी ऑर रॉबर्ट ऑर पीटर.. हॅव यू सीन एनी वन नॉट ड्रिंकिंग इन कॅथलिक्स? सो विल्यू बी अनमॅरिड थ्रू आऊट?

तू काही बोलली नव्हतीस तेव्हा पण आय होप यू हॅव मॅनेज्ड अ टीटोटलर हब्बी.. टी टोटलर म्हणजे चहा पिणारा नवरा! तू तशी जिद्दी आहेस..

तू अशी पण जिद्दी आहेस.. माझ्याकडून फोन नंबर मिळाल्यावाचून शांत होणार नाहीस .. पण ते काय म्हणतात तसे, हमने भी कच्ची गोलियां नहीं खाई.. हे लोकं कसल्या गोलियां खातात एनी आयडिया? पॅरासिटॅमॉल? डोन्ट नो! पण सांगायचा मुद्दा हम भी इतकेच जिद्दी है!

तू इतके सारे लिहिलेस पण सध्या काय करतेस ते सांगितले नाहीस ते? अँड युवर डियर नवरा. तू म्हणतेस तसे कॉलेजबद्दल लिहायला बसलो तर .. दर महिन्याला एक प्रमाणे साडेचार वर्षांच्या किती ओळी होतील? हिशेब तू कर.. तेव्हा लिहिणे कठीण नाही .. लिहिलेले वाचणे नि ते वाचण्यापासून वाचणे कठीण आहे.. तेव्हा विचार करून सांग..

बाय द वे, तू अजूनही कविता करतेस का? की ये ढेर से कपडे मैं कैसे धोऊं वगैरे म्हणता म्हणता कवितांचा प्रवाह आटला? तशी वॉशिंग मशिन्स मिळतात चांगली .. तर कविता करत असशील तर नमुन्यादाखल एखादी पाठव. चकलीसारखी खुसखुशीत असेल तर बरेच.. मी कविता लिहिणे कधीच बंद केले आहे. प्रत्येक ठिकाणी इतरांना वाव देण्याचा उदार दृष्टिकोन माझा. तेव्हा तू बिनधास्त रहा. धिस राम विल नॉट कम इन वे.. आता मी ज्या चारोळी लिहायचो त्यात राम नव्हता हे खरे.. पण हे सीक्रेट तुझ्याशिवाय अजून कुणाला ठाऊक आहे सांग? फक्त एकच.. कवितांबरोबर इंग्रजी इंटू हिंदी डिक्शनरी पण पाठवायला विसरू नकोस!

चल बाय, वुई द बिझी पीपल ची जाण्याची वेळ झाली.. लिही परत काहीतरी .. मी पण लिहीनच.. काहीतरीच .. प्रॉमिस!

बाय

राम

***

डियर राम,

किती छान वाटतंय सांगू पत्रे वाचताना .. तू म्हणालास ते खरंय. इन्संट कम्युनिकेशन हॅज मच लेस चार्म.. याचा अर्थ तुझा मोबाईल नंबर मी मागत नाही असा नाही मात्र. तो मिळेपर्यंत मी सतवणार तुला.. अगदी भूत

बनून बनारसच्या घाटाघाटात फिरून तुला हैराण करणार .. अर्थात थोडा प्रॉब्लेम आहेच, भूत बनण्याचे क्वालिफिकेश पोस्ट मॉर्टेम मिळते म्हणे.. आणि माझ्या सारख्या अलाइव्ह आणि किकिंग वन ला भूताचे प्रमोशन असेच कसे मिळेल..

तू कवितांचा विषय काढलेलास.. बट आय हॅव स्टा ॅप्ड द प्रॉडक्शन डिअर. त्यामुळे चकलीसारखी ही नाही नि केकसारखीही नाही ..नो मोअर पोएट्री फॉर मी.. आणि इथे ही तुला खाणे सुचावे? कवितेला चकलीची उपमा देणारा तूच पहिला .. आणि ही उपमा म्हणजे खाण्याचा तो उपमा नाही एवढे ध्यानात ठेव! थोडक्यात काय तर डिक्शनरी पाठवायची गरज नाही! आणि खादाड बकासुरा, आय पिटी युवर वाईफ!

तुझ्या त्या चार ओळींच्या कवितांची आपल्यावेळी क्रेझ होती.. आठवतेय मला.. तुझ्या स्पेशल इंग्रजीत तू तुझ्या चारोळ्या समजावून सांगायला लागायचास.. तुझ्या चारोळ्या तुझ्या इंग्रजीहून ओरिजिनलच मला जरा जास्त कळायच्या! तुझं चारोळ्या प्रॉडक्शन बंद आहे हे ऐकून बरं वाटले .. म्हणजे बराच माणसाळलायस.. की बायकोने ठोकून ठोकून सरळ केलाय तुला? तसेच असणारे नाहीतर कविलोक काय असे गप्प बसतात?

तू नाटकाबद्दल म्हणालास ना, एक इंग्रजी नाटक मी प्रोफेशनल स्टेजवर केलेले. लाँग बॅक. पन्नास शोज केले. त्यातली गंमत गेली.. आपली कॉलेज गँग नि तू नव्हतास ना ऑडियन्स मध्ये. मग परत कधीच

स्टेजवर चढले नाही. खूप ठिकाणी मेडिकल ऑफिसर होते.. आता जी.पी. आहे. पेशंट आहेत.. दे कीप मी बिझी..

चल, विल राईट टू यू लॅटर..

टेक केअर

ॲनी

***

डिअर ॲनी,

सॉरी. लिहायला थोडा उशीर झालाय.. पण यू आर टू बी ब्लेम्ड! तू भूत झालीस तर कशी दिसशील याचा विचार करत होतो. कल्पना कर.. पांढऱ्या साडीत तू .. हा भुतांचा युनिफॉर्म असतो का? तर अशी श्वेतांबरा तू.. सिटिंग ऑन द मानगूट .. असो.. मरे तुम्हारे दुश्मन यार.

माहिती असते तर तुझ्या सगळ्या नाटकांच्या सगळ्या शोज् ना आलो असतो.. बट दॅट वॉज नॉट टु बी. यस मिलॉर्ड.. वुई प्लीड गिल्टी.. द इंग्लिश स्टेज लॉस्ट द मोस्ट ब्रिलियंट ॲक्ट्रेस.. माझ्या कवितांबद्दल काय बोलू? तू बोलून टाकलेच आहेस.. तेव्हा कुठला 'एक ओळी' कवितांचा प्रकार मार्केटमध्ये येईतोवर काही लिहिणार नाही मी!

असो.

ॲनी, तू पत्र ॲबरप्टली थांबवलेस.. पण टेल यू.. पेशंट्स रियली कीप अस बिझी. अपडेट्स इन मेडिसीन आर रॅपिड.. वुई हॅव टू बी ऑन द टोज .. मला हे आवडते.. नो टाइम टू थिंक अबाऊट एनिथिंग!

वाढदिवसाबद्दल म्हणालेलीस ना.. तू म्हणतेस म्हणून यावेळीस केक कापणार आहे.. ॲटलिस्ट वन पर्सन शुड बी हॅपी.. हो की नाही?

आणि तुझ्या पत्राची वाट पाहतोय ..

राम

ता.क.

जमले तर तुझा फॅमिली फोटो पाठव.. यू नो आयॅम फोटोफोबिक. मी फक्त पासपोर्ट साईज फोटो काढतो. तुझे तसे नाही. ए कॉलेज क्वीन अँड अ ग्रेट स्टेज ॲक्ट्रेस.. फोटो पाठवच.

राम

***

डिअर राम,

एक रिक्वेस्ट.. याला तू नाही म्हणालास तर नो मोअर लेटर बाजी..अगदी हमारी मांगे पूरी करो स्टाईल मोर्चा काढेन बनारसवर.. म्हणजे मग तुला मानावेच लागेल..

एक मेन आणि एक सब रिक्वेस्ट अँड माय अंडरटेकिंग..

१. प्लीज बर्थडेच्या दिवशी जॉइन अवर कॉलेज ग्रूप.. जस्ट फॉर अ डे. नथिंग मोअर दॅन दॅट

२. त्यासाठी तुझा फोन नंबर लागेल.. प्लीज मला दे.

३. अंडरटेकिंग: मी तुला कधीच तुझ्या नंबरवर कॉल करणार नाही, ना ही मेसेज करीन.. दॅट्स ॲनास वर्ड .. यू नो हाऊ पर्टिक्युलर आय ॲम.

तू नाही म्हणणार नाहीस याची खात्री आहे मला. मी म्हणाले म्हणून तू बर्थडे केक कापायला तयार झालास.. हिमनग वितळतोय.. आयॅम ऑब्लाइज्ड.. थ्यांक्स. तुझा केकसोबत फोटो पाठव ही मात्र माझी मागणी नाही डिअर राम! तेव्हा ओन्ली शाब्दिक रिपोर्ट विल डू.. सध्या नो मोअर अदर डिस्कशन्स. गृपवर सगळे आर वेटिंग फॉर यू. ॲम शुअर यू विल्बी हॅपी विथ देम!

चल.. अगदी ऑफिशियल पत्रासारखे..

थ्यांकिंग यू इन ॲँटिसिपेशन

युवर्स सिन्सियरली

ॲनी

***

प्रिय ॲनी,

आय गिव्ह अप.. गिव्ह इन.. तू जिंकलीस.. ते मला आधीच ठाऊक होतं. यू आर डेस्टिन्ड टू विन अँड रूल ..आय कॅन नॉट इमॅजिन यू लूझिंग डियर!

माय फोन नंबर इज सिंपल.. 98 फॉलोड बाय माझ्या वाढदिवसाच्या तारखेचे आठ डिजिट्स! सोपाय नंबर. आणि तू शब्दाची किती पक्की आहेस ते मला ठाऊकच आहे.. बट यू मे कॉल मी व्हेन नीडेड ..

नंतर डिटेल्स मध्ये लिहीन.. लांबलचक.

सध्या बिझी विथ नेक्स्ट मंथ्स प्रेझेंटेशन.

बाय. सी यू सून ऑन द ग्रूप..

राम

***

डिअर राम,

थ्यांक्यू. कॉलेजचे सगळे तुला गृपवर पाहून खूश झाले. यू ऑल्सो सीम्ड हॅपी डिअर.. तू माझे ऐकून एवढे सारे केलेस.. मी पण खूप खूश आहे. सो थ्यांक्स..

पण आज पत्र लिहायचे कारण वेगळे आहे राम. तुझी पत्रे वाचली मी.. आणि कालची तुझी ग्रूपवरची बडबडही.. ॲज अ गुड फ्रेंड, कॅन यू टेल मी.. व्हाय आरंट यू हॅपी विथ लाइफ?

कामात सगळेच बिझी असतात .. पण म्हणून कोणी आजूबाजूला बघणे सोडत नाहीत. तुझ्या दोन पत्रांतला अंडरटोन इज डिस्टर्बिंग मी डिअर. आणि आय डोन्ट थिंक माझी रिडिंग चुकीची आहेत.. ऑफकोर्स आय वुड बी हॅप्पी इफ इट इज सो.

आणि सगळयात शेवटी.. तू काल म्हणालास ते.. आय, मी, मायसेल्फ इज द फॅमिली.. याचा अर्थ काय?

प्लीज राइट टू मी.. वेटिंग अँक्शसली फॉर रिप्लाय..

ॲनी

***

प्रिय ॲनी,

कॉलेजात असताना मी तुला सांगितले होते, यू शुड बी अ सायकियाट्रिस्ट.. तू वाक्यांच्या मागच्या भावना किती हुशारीने वाचतेस.. बोललेले शब्द तर कळतातच तुला, न बोललेले ही कळतात .. तेव्हा ही तू तशीच होतीस.. अजूनही तशीच आहेस.. तू का नाही पीजी केलंस तेव्हा?

तर काही गोष्टी आपल्या काळजात दडवून ठेवाव्या लागतात. अगदी आपल्या सावलीला ही सांगू नयेत नि समजू नयेत. पण माणसाचे मन मोठेच विचित्र असते. कुठे ना कुठं त्याचा उच्चार होतच राहतो. इतरांच्या नाही लक्षात येत किंवा त्यांच्यासाठी मी कोण? पण तू हुशार

आहेस.. नुसतीच हुशार नाहीस, सेन्सिटिव्ह आहेस.. त्यामुळे यू पिक्ड इट अप राइटली..

तू विचारतेस म्हणून सांगतो.. फक्त तुझ्या मनात ठेव.. अर्थात आय डोन्ट नीड टू टेल यू धिस..

खरेतर ही गेल्या पंचवीस वर्षांची गोष्ट आहे. एम डी संपले, लेक्चररचा जॉब सोडून बनारस ला मी परत आलो. तोवर मी लग्न न करण्याचा निश्चय करून टाकला होता. कारण 'ती' मुलगी. मनोमन ती माझी होती. तिची स्वप्ने पाहिली मी.. आवडायची ती मला. माझा अंदाज आहे तिला पण मी आवडत असणार. पण पोरं काही पोरींसारखी अशा गोष्टी समजण्यात तरबेज नसतात .. तुला सांगतो, तिला मी कधीच माझ्या मनातली गोष्ट सांगितली नाही. त्याला ही काही कारणं होती.. ती कारणं नाही सांगत.. पण ती सुखी व्हावी एवढे मनोमन वाटायचे तेव्हा .. बनारसला आलो.. घरचे मागे लागले लग्नासाठी. एक तर ते जुने दिवस. त्यात युपी. दहावीपर्यंत पण कोणी शिकलेली मुलगी दिसेल तर शपथ.. त्याचा फायदा झाला मला. मी ठरवलेले.. यापुढे फक्त तिच्या आठवणींवर जीवन काढायचे.. तेवढी कमिटमेंट हवीच .. माझे वडील मोठे ज्योतिषी होते. त्यांनी कुंडली पाहून सांगितले, लग्न होईल पण उशीरा.. ते ही लव्ह मॅरेज! त्या सगळ्या प्रेडिक्शनची पण एक्सपायरी डेट निघून गेलीय. पुढे काय, बाबूजी गेले, आई गेली. मी एकुलता.. एकटा उरलो. म्हणून म्हटले, आय मी मायसेल्फ इज माय फॅमिली! इतरांना ती थट्टा वाटली पण तुला बरोबर

कळले ते. तू तुझ्याकडे ही गोष्ट गुपित ठेव.. आज ही तिची आठवण येते मला.. आज काल कॉलेजची पोरं किती सहजपणे मूव्ह ऑन करत राहतात .. मला नाही पटत. किती सुंदर बंधन आहे आमचे.. तिला तर ते ठाऊकही नाही .. ती कुठेय त्याचा नुकताच थोडा पत्ता लागलाय. शी इज अ स्वीट पर्सन.. मस्ट बी हॅपी विथ हर स्वीट फॅमिली.. अँड शी डिझर्व्हस इट दॅट वे!

तर ॲनी, हे सगळे असे आहे. लिहिण्यात कुठे कुठे एकटेपणाचा उल्लेख होत राहतो.. कारण दॅट हॅज बिकम अ पार्ट ऑफ माय पर्सनॅलिटी..

बाय. जास्त विचार करू नकोस. कुणाला तरी सांगितले की मनावरचे ओझे कमी होते. हू एल्स दॅन यू फॉर इट? आय ॲम अदरवाईज अ हॅपी मॅन..

राम

***

डिअर राम,

तुझी ती एक्स मिस एक्स कोण होती ते सांगू नकोस तरी चालेल.. तुला तिचा पत्ता लागलाय म्हणतोस .. अजून शोध घे तिचा.. बी अ लिट्ल बोल्ड आणि बघ तिला काय हवंय ते.. बिलिव्ह इन युवर फादर्स प्रेडिक्शन.. हॅव फेथ आणि यू मे गेट युवर लव्ह. इट्स नेव्हर टू लेट डियर..

विल डेली प्रे फॉर यू..

ॲनी

***

प्रियतमा ॲन,

प्रियतमाच..

तू बी अ लिट्ल बोल्ड म्हणालीस ना..

हे पत्र शेवटी मी लिहायचे ठरवलेच.. प्लीज पत्र पूर्ण वाच, नंतर फाडून टाक.. रागावलीस माझ्यावर तर चालेल, यापुढे तू पत्र नाही लिहिलेस तरी चालेल. कारण तो तुझा हक्कच आहे..

ती एक्स मिस एक्स.. खरेतर एक्स नाहीच.. तर ती मिस एक्स तूच आहेस ॲन. तुला शेवटचे पाहिलेले ते कॉलेजात. तू बाय म्हणायला आलेलीस. मी मित्रांबरोबर होतो. ठरवून तुझ्याकडे दुर्लक्ष केलेले तेव्हा. तू एकाएकी निघून गेलीस.. तुझ्याशी बोललो असतो तर रडलो असतो तुझ्यासमोर.. म्हणून बोललोच नाही .. पुढे तुझा पत्ताच नाही काही. एम डी झालो तेव्हा ते गोल्ड मेडल तुला दाखवायचे होते.. तुला शोधणार कुठे होतो मी?

तू आवडायचीस मला, खरेतर दिवसरात्र ॲन माझ्या विचारांना व्यापून होती. पण ज्या नात्याला भविष्य नाही .. त्यात तुला ते सगळे सांगून का तुलाही दु:खी करावे? माझे कुटुंब बनारस मधले प्रतिष्ठित ब्राह्मण कुटुंब. कर्मठ आणि सनातनी. पंचवीस वर्षांपूर्वी ब्राह्मण कुटुंबात ख्रिश्चन सून ही गोष्ट पचनी पडलीच नसती. आजूबाजूचे सनातनी तुझा नि माझा जीव

घेतल्यावाचून शांत झालेच नसते.. आणि बनारसमधल्या दुसऱ्या ख्रिश्चनांनाही त्यांनी संपवले असते. तिथे त्यांचाच कायदा चालतो.. तसे तुझ्या घरचे पण अस्सल भारतीय असल्याने त्यांना देखील हा हिंदू जावई पचनी पडला नसताच .. शेवटी जात नि धर्म आर रियल रिॲलिटीज ऑफ अवर सोसायटी.. ह्याच खऱ्या गोष्टी आहेत जणू.. त्यांच्यासाठी प्रेम वगैरे सगळे दुय्यम .. तुला काहीच न सांगणे हाच एक उपाय होता. तुझ्या सारख्या कॉलेजक्वीनला स्वप्नातला प्रिन्स मिळणे कठीण नव्हतेच.. तो मिळालाच असणार. यू मस्ट बी हॅपी विथ लाइफ.. मला तेच तर हवे होते.. बट आय ॲम कमिटेड.. तुझ्याशिवाय मी कधी कोणाचा विचार नसते करू शकलो.. सो व्हॉट मी तुला कधी बोललो नसेन.. पण आय मायसेल्फ ॲम अवेअर ऑफ इट.. तेवढी कमिटमेंट तर हवीच..

आज तुला सांगितले हे.. फिलिंग रिलिव्हड. तू हे वाच नि विसरून जा. ॲन, तुझ्या सुखी संसारात डोकावण्याचा माझा थोडाही उद्देश नाही. तेव्हा हे पत्र नष्ट करून टाक. या जन्मी नाही पण पुढील जन्मी तरी आपण भेटूच परत..

बाय.. टेक केअर.

तुझाच

रामशरण

***

डिअरेस्ट राम्या,

येस राम्याच आहेस तू माझा. तू इतका वेडा असशील याचा अंदाज नव्हता मला. तू काय नि मी काय.. दोघांचे प्रेम अव्यक्त राहिले .. कॉलेजच्या शेवटच्या दिवशी यू इग्नोअर्ड मी.. रागावून तिरमिरीत मी निघून गेले. आय वॉज अपसेट फॉर मंथ्स टुगेदर.. मग मेडिकल ऑफिसरचे जॉब करत राहिले .. कुठेच मन लागेना .. तुला म्हटले तसे स्टेजवर काम करून पाहिले .. ते ही सोडले. तिशी गाठेपर्यंत हे असेच सुरू होते. तू एमडी झालास तोवर तुझा ट्रॅक होता. पुढे काय कसलाच पत्ता नाही.. मी पण ठरवून टाकले .. डीप फ्रॉम विदीन आय फेल्ट कमिटेड टू यू.. घरचे लग्नासाठी मागे लागले. मी एकच कंडिशन घातली.. नो अल्कोहॉल फॉर माय ग्रूम.. तुला ठाऊकच आहे हाऊ इट्स इन कॅथलिक्स.. हळूहळू लग्नाचे वय उलटून गेले. लोकांनी विचारणे पण सोडले .. अँड आय वॉज रिलिव्हड. हिअर आय ॲम कमिटेड टू यू.. तुझा पत्ता मिळाला हल्ली तर म्हटले तुझ्याशी थोडा संपर्क असेल तर तेवढेच जगण्याला निमित्त राहिल..

आता एकच बाकी आहे, फेमस पॅथॉलॉजिस्ट डॉ. रामशरण त्रिपाठी बनारसमध्येच असतील तर पहिली फ्लाइट पकडून तिकडे येते.. तुझी हरकत नसेल तर.. तुझ्या डोळ्यांत पंचवीस वर्षांपूर्वीची मी असणार. त्यानंतर माझे वजन सातशे किलो तीन ग्रॅम नी वाढले आहे.. सोबत माझा लेटेस्ट फोटो पाठवतेय. लवकर निर्णय घेणे. मला तुझ्या फोटोची गरज नाही. असे पण पासपोर्ट साइझ फोटो बघण्यात काय गंमत असणार आहे?

तुझीच

ॲन

***

डिअरेस्ट मिसेस ॲन,

तू जिद्दी आहेस हे ठाऊक होते पण इतकी जिद्दी असावीस?

तू बनारस ला येऊ नकोस कारण पुढील आठवड्यात मीच येतोय मुंबईत कॉन्फरन्स साठी. दोन दिवस आधी पोहोचतो.. बुधवारी. तुझा वाढदिवस तो. एकत्र सेलिब्रेट करू. तुझा वाढदिवस माझ्या लक्षात कसा ते विचारू नकोस.. लक्षात ठेवायला तो विसरलोच कधी होतो मी. माझा वाढदिवस मी कधी सेलिब्रेट केला नाही, पण गेली पंचवीस वर्षे मी तुझाच वाढदिवस एकट्याने सेलिब्रेट करत आलोय डिअर.. आता एकत्र साजरा करू.. मिसेस ॲन..

कधी तुला भेटतोय असे झालेय..

आणि एक.. आमच्या पॅथो कॉन्फरन्ससाठी मिस्टर रानशरण आणि मिसेस ॲनी म्हणून तुझे पण नाव रजिस्टर करून टाकलंय मी. पंचवीस वर्षांच्या कमिटमेंटनंतर औपचारिक लग्नविधीची खरंच गरज आहे? मला नाही वाटत.. शेवटी बाबूजींची प्रोफेसी खरी ठरली म्हणायची..

राम्या ऑफ ॲन

३.

# धोबीपछाड!

प्रिय मुरलीधरास,

तुला कित्येक वर्षांनी पाहिले. किती आनंद झाला म्हणून सांगू. शाळेतल्या त्या दिवसांनंतर या शाळेत आपली भेट झाली. आपले रोल बदलले. तेव्हा आपल्या शाळेतले आपण मित्र. एकाच झाडावरच्या चिंचा मीठ लावून खाणारे. पेरूच्या बागेतील तुरट पेरू खाऊन दात कसेसे झालेले.. सारे आठवले. माझ्या शेजारी तू बसायचास, तो बाक आठवला. खरे सांगतो अगदी पाठीला बाक यायचे वय होईल तोवरही बालपणाच्या आठवणी विसरता येणार नाहीत. गावाकडल्या विहिरीत डुंबता डुंबता आपण तासनतास काहीतरी बोलत असू. काय बोलायचो आठवत नाही. पण बोलायचो अखंड. तसा तू बोलका ढलपा. तोंडाची टकळी अखंड सुरू असायची. गंमत बघ, आपण दोघेही पुढे या बोलण्याच्याच व्यवसायात उतरलो. म्हणजे तुझ्या नि माझ्या सामाजिक स्थानात जमीन अस्मानाचा फरक आहे. तुझी लाल दिव्याची गाडी घेऊन सगळ्यांचा सलाम घेत फिरतोस तू. गावागावातून भाषणे देतोस. बोलणे नि बोलत राहाणे हेच तुझे भांडवल. मी शाळा मास्तर. माझे ही काम तेच. अर्थात शिकवण्या व्यतिरिक्त

कामांतून वेळ मिळू दिला तर. ते असो. शाळेतील मुले 'मुकी बिचारी कुणीही हाका' अशी असतील तर आम्ही ही 'मुके बिचारे.. कोणतेही काम यांच्यासमोर खुशाल टाका' या कॅटेगरीतले. तुमच्या शासनव्यवस्थेची कृपा. आणि काय? असो. ते रडगाणे नकोच. तुझ्या समोर तर नकोच नको.

तर आज शाळेला भेट द्यायला तुझ्या शासकीय गाडीतून आलास. मोठा मंत्रीबिंत्री झालास म्हणून ओळख विसरला नाहीस, हे पाहून भरून आले. आमच्या शाळेच्या अंधाऱ्या खोल्या पाहून लवकरच इकडे चांगल्या दिव्यांची नि मुलांसाठी चांगल्या बाकांची व्यवस्था करण्याचे आश्वासन देऊन गेलास. ते पूर्ण होवो की न होवो, पण कुणीतरी तसा विचार तरी करतोय हे पाहूनच बरे वाटले. बाकी आश्वासनांचे काय? सर्व पूर्ण केली म्हणावे तर दिवसाकाठी तू शंभर ठिकाणी शंभर वेळा वेगवेगळी देत असणार. कोणकोणती ध्यानात ठेवणार? आणि काही पूर्ण केली तरी काही ना काही मागे सुटणारच. तेव्हा तुम्ही शासकच काय, पण आम्ही सामान्यही ते जास्त गंभीरतेने घेत नाही. उगाच अपेक्षाभंगाचे दु:ख पदरात पाडण्यापेक्षा अपेक्षा न ठेवणे हाच खरा मार्ग हे तत्वज्ञान जीवनाच्या शाळेत शिकलोय आम्ही.

असो. बाकी कसा आहेस? तुकतुकीत कांतीवरून मात्र तुला मंत्रीपद मानवले हे दिसतेय. तुझ्या मंत्रीपदाच्या शपथेच्या दिवशी नशिबाने मी शहरात होतो. टीव्हीच्या डब्यात तुझी छबी पाहून किती आनंद झाला सांगू. शाळेत असताना तू इतका मोठा होशील याची कल्पना कुणी केली नसेल.

घोसाळकर गुरुजींनी तर तुझी आशाच सोडलेली जणू. तसे गुरुजी बरे होते पण तुझे पाळण्यातले पाय बघण्यात चुकले म्हणायचे आणि काय?

तू भेटलास.. तुझ्या व्यस्त कामकाजात जास्त वेळ बोलता आलं नाही. म्हणून म्हटले लिहूनच टाकावे. तुझ्या उत्तराची अपेक्षा आहे. लिहिशील ना? शाळेत तसे निबंध मी तुला लिहून द्यायचो. आठवते ना? एकाच विषयावर मी दोन वेगवेगळे निबंध लिहायचो.. एक माझा नि दुसरा तुझ्यासाठी. पण तुझे पत्र मात्र तुलाच लिहायचेय.. तसे लिहिशीलच. वाट पाहातोय.

तुझा मित्र

गोपाळ

***

प्रिय मित्र गोपाळ,

तुझे पत्र अनपेक्षित होते. मिळाले नि आनंद झाला. राजकारण नि मंत्रीपद वगैरे मिळाले. आम्ही जनतेत राहणारी माणसं पण पाण्यात राहून तहानलेले तसे आम्हाला जवळचे कोणी नसल्यासारखे. जो भेटेल तो कामासाठी. उगाच मित्र म्हणून भेटावा असा कोणी नाही. त्यामुळे तुला भेटून आनंद झालाच नि तुझी चिठ्ठी वाचून तर अधिकच आनंद झाला.

तू म्हणतोस ते खरेय. शाळेतले दिवस विसरू म्हणता विसरता येत नाहीत. घोसाळकर गुरुजींच्या पट्टीचा मार आठवतो अजून. पट्टी तुटली पण

आपण काही बदललो नाही. आपण म्हणजे मी. तू तसा हुशार. स्का ॅलर म्हणावा तसा. तू माझा मित्र म्हणून माझीपण कॉलर ताठ असायची. दहावीत इंग्रजीने दगा दिला. गणितात काठावर पास झालो. तिथेच आपले मार्ग बदलले. खरेतर तू अजून पुढे जायचास. पण परिस्थितीमुळे ही शाळामास्तराची नोकरी पकडलीस. पोरांना शिकवण्यासारखा आनंद नाही तो मिळवतोयस. नाहीतर आमचे बघ. कामापुरता मामा आम्ही. सगळे जी हुजूर जी हुजूर. राजकारणात कोणी कोणाचे नाही. आजचा मित्र उद्याचा शत्रू नि परवा कदाचित परत मित्र. कोणाचा आपल्यावर भरवसा नाही नि आपला कोणावर नाही. आजचा मित्र पायात पाय घालून कधी तोंडघशी पाडेल सांगता येत नाही. त्या हळदणकराच्या हऱ्याला मी असा तेव्हा पाडला होता. गुरुजींनी हातावर तुटेपर्यंत पट्टीचा मार दिलेला. तुला सांगतो, तेव्हापासून कातडी जी जाड झालीय, राजकारणात हरघडी उपयोगी पडतेय.

बाकी बोलण्याबद्दल बरोबर बोललास. तेवढेच तर भांडवल आमच्या गाठीशी आहे. शब्दांचा उपयोगच तो आहे. वापरा, वापरत रहा. बोलायला मी तेव्हा पटाईत होतो.. आता आम्ही नुसते बोलत असतो. समोर माईक नि चार डोकी दिसली की भाषणाला चेव येतो. पण तसे असले तरी शाळेतल्या वक्तृत्व स्पर्धेत जिंकायचास तूच. आम्ही ओवाळून टाकल्यासारखे. नववीपर्यंत तू मदत केलीस. दहावीत नाईलाज झाला. त्याने फार काही बिघडले असे नाही पण एखादी डिग्री नावापुढे लागली की प्रतिष्ठा आपोआप मागे लागते. अरे, आजकालची पोरं हुशार झालीत,

राजकारणात येण्याआधीच ॲडव्होकेट नाहीतर डॉक्टर वगैरे डिग्र्यांची सोय करून ठेवतात. त्यासाठी तशी समांतर व्यवस्था असते. तिचा वापर करतात. म्हणजे पुढच्या राजकारणाचेच धडे ते तेव्हापासूनच घेतात म्हण ना. तर ते आमचे राहू दे.

तुला भेटलो तर आम्हाला खरेच आनंद झाला. राजकारणाच्या दलदलीत अशी मैत्रीची कमळे उगवणे म्हणजे नवलच.

जमले तर पुन्हा प्रत्यक्ष भेटू. तोवर पत्रोपत्री भेटत राहिले तर बरे. तू काय, लिहिण्यात तरबेज. लिहीच. आम्ही जमेल तशा भाषेत उत्तर लिहित राहूच. निबंधाची याद दिलीस मन मागे गेले. आजचा दिवस छान गेला.

तू पत्र लिहीच.

तुझा मित्र,

आमदार मुरलीधर गुळवणी

राज्यमंत्री

सांस्कृतिक आणि शिक्षण खाते

महाराष्ट्र राज्य

***

आमदार मा. मुरलीधर गुळवणी यांस,

पद आणि प्रतिष्ठेने तुम्ही कुठच्या कुठे निघून गेलात. आनंद आहे. बाकी पायाकडे नव्हे तर कळसाकडेच आपण बघतो. त्यामुळे आजवर तुमच्या गाठलेली उंचीच महत्त्वाची. बाकी शाळकरी दिवसांचे काय? पाळण्यातले पाय कोणाला दिसले न दिसले.. ते पुढे पडायचे थांबतात काय? तसे ते पडलेच आणि तुम्ही उत्कर्षबिंदू गाठलात, तो ही अल्पावधीत. आपल्या गावास त्याचा अभिमान आहे आणि राहिल.

बाकी राजकारणाचे काय? त्यासारखा सर्वव्यापी नि सर्वसमावेशक विषय या जगात नाही. अन्न, वस्त्र, निवारा या सर्वांना राजकारण स्पर्शून जाते. अशी कोणतीही जीवनावश्यक गोष्ट नाही की जिच्यावर राजकारण प्रभाव टाकत नाही.

बाकी शिक्षकी पेशा वगैरे आदर्श हे सांगण्यापुरते. म्हणजे आपल्या डबल स्टँटर्डला शोभेलसे. गुरूर्देवो म्हणा नि महिनोन महिने पगार अडकवून त्या गुरूला उपाशी ठेवा. अर्थात वर्षभरात एकदा गुरूच्या पायावर डोके टेकायला विसरत नाही कुणी. पण तो दिवस गेला की कुणाचे उगीच लाड नाहीत. तसे तुमचे नाही. तुम्हा मंडळींचे लाड इतर कुणी करण्याची गरजच नाही. तो तुमचा पदसिद्ध अधिकार आहे म्हणाना. ते तुम्ही स्वतः करवून घेता. आनंद आहे म्हणायचा.

तुमची इकडच्या शाळेची भेट फार गाजली. इकडच्या पेपरवाल्यांनी मोठमोठया हेडलाईन्स छापल्या. तुमचे एक दोन फोटो आले. तुमच्या आश्वासनांबद्दल चौकटीत मजकूर आला. एकूण दौरा यशस्वी झाला याबद्दल दुमत नसावे.

तुम्हाला राजकारणात कोणी मित्र नाही म्हणालात. मान्य आहे. पण एकूण आयुष्यात ही तसेच असते. माणूस शेवटी एकटाच असतो नि एकटाच राहतो. त्यामुळे कोणी कोणाचे नसते. आयुष्याच्या प्रवाहाच्या ओघात दोन ओंडक्यांसारखे कोणी भेटतात नि परत विलग होतात. ही नियती म्हणावी. एकदा हे मान्य केले की कोणी आपले कायमचे नसल्याबद्दल फारसा खेद होण्याचे कारण नाही. अर्थात मी थोडा भाषेचा विद्यार्थी असल्याने हे मांडू शकतो. पण तुम्ही मंडळी प्रत्यक्षात हे आचरणात आणत असता. त्यामुळे मी तुम्हाला नव्याने सांगावे असे नाही. असो.

भेटीमुळे जुने दिवस आठवले हे खरे. शाळेतल्या लहान पोरांच्या जागी मी स्वतःस पाहतो. थोडे हसू येते. लहानपणच्या आपल्या रम्य आठवणींत रमता रमता पुढे आयुष्यातील वाढून ठेवलेला संघर्ष आठवतो नि यापेक्षा कष्टात नि गरिबीत गेलेले बालपणच रम्य होते असे वाटायला लागते. तुमच्या शाळेतल्या दिवसांत शिक्षा अधिक नि शिक्षण कमी असेलही पण आता त्याच शिक्षण खात्यात मंत्री बनून तुम्ही काव्यगत न्यायाने बदला घेतला असे नाही वाटत? असो. उगाच गांभीर्याने लिहावे कशाला?

तुम्ही तसे खूपच बिझी असणार. मंत्री होणे काही सोपे काम नाही, आणि ते पद टिकवून ठेवणे तर नाहीच नाही. सार्वजनिक आयुष्यात वावरताना तुम्ही सरावला असणार वर्षानुवर्षे, तरीही बरेवाईट आपल्याबद्दल लिहून छापून येते ते वाचून वाईट किंवा चांगले वाटत असेलच ना? कारण नुकताच एका पेपरात शिक्षणखात्याबद्दल लेख वाचला. कोरडे ओढणारा. एरवी काही वाटले नसते, पण त्या खात्याचा मंत्रीच मित्र आहे म्हटल्यावर थोडे वाईट वाटलेच. असो.

एकदा भेट झाली, परत कधी होईल? कदाचित मीच मंत्रालयात चक्कर मारेन तेव्हा. पण तिकडे आजूबाजूस कोणाला फिरकू देतीलसे वाटत नाही. त्यामुळे ही पत्रोपत्री भेटच सध्या तरी खरी. मी तर लिहिनच. तुम्ही सुद्धा वेळ काढून लिहित राहणे.

आपल्या गावच्या आपल्या शाळेच्या वाचनालयातल्या पेपरात तुमच्या फोटोचे कात्रण.. माजी विद्यार्थी म्हणून अभिमानाने लागले गेले. याच शाळेने आपल्याला दहावीचा फॉर्म भरू दिला नव्हता आधी, उपस्थिती कमी पडते म्हणून! असो. कालाय तस्मै नम: आणि काय!

असो. पत्रोत्तराच्या प्रतीक्षेत

आपला

गोपाळ

***

प्रिय गोपाळ,

तुझे पत्र मिळाले. एकाएकी तू मला आदरार्थी बहुवचनात घालून टाकलेस? काही हरकत नाही. भाषेचे काय? ती आपल्यासाठी आहे, आपण तिच्यासाठी नाही. खरे की नाही?

तसा मंत्री झालो नि जगाचे संदर्भ बदलले. बघ ना, एरवी तुझा शाळकरी दोस्त कोणी भेटला असता तर अशी पत्रापत्री झाली असती का? थोडक्यात काय या खुर्चीची किमया सारी. नि ती मिळवण्यासाठी केलेल्या मेहनतीचीही. तुला ते गाणे आठवते? दुनिया करे सलाम असे काहीतरी. तर हे असे आहे. तुझ्याबद्दल म्हणत नाही, पण असतील शिते तर जमतील भुते हे आम्ही दररोज पाहतो. उद्या बुडाखालची खुर्ची गेली की शिपायाचा सलामही सलामत राहात नाही. म्हणून सारा खुर्चीसाठी अट्टाहास नि आटापिटा. मग राजकारण त्यासाठी करणे आलेच. तुला गंमत सांगतो.. लोकसेवा, जनसेवा, समाजसेवा वगैरे वगैरे ही त्या खुर्चीपर्यंत पोहोचण्याची भाषा आहे. म्हणजे एखाद्या कुलुपाची किल्ली असावी ना तशी. उद्या कोणी मला मंत्री बनून राज्य करायचेय तेव्हा मत देऊन माझे स्वप्न साकार करा असे खरेखुरे सांगू लागला समज.. कोणी ढुंकूनही पाहिल का? त्यासाठी तिथे देवाणघेवाणच हवी. आम्ही त्यांना स्वप्न दाखवतो. त्याबदल्यात मते गोळा करतो. साधा व्यवहार आहे हा. जो जास्त चलाख तो जास्त काळ दुनियेला फसवू शकतो. मी ग्रामपंचायतीतून सुरूवात केली. आजवर कित्येक निवडणुकांच्या परीक्षा दिल्या. दहावी काय की अगदी बीए एमे

काय.. त्याहून कठीण, ज्या परिक्षेचा पेपरच ठाऊक नाही अशी परीक्षा. कितीतरी देऊन झाल्या. काही पास झालो, काही फेल. हळूहळू हा पेपर आपणच बनवायचा असतो.. प्रश्न आपणच तयार करायचे नि उत्तरेही आपणच द्यायची हे कळायला लागले. आता निवडणूक म्हणजे अपेक्षित २१ प्रश्नांचा प्रश्नसंच झालाय जणू. हे सर्व तुला सांगायचा मुद्दा हा, की यातून तावून सुलाखून निघालेल्यास कुणी टीका करा की स्तुती काय फरक पडणार? गंमत बघ, आध्यात्मिक लोक याला स्थितप्रज्ञता म्हणतात, नि राजकारणात ह्यालाच म्हणतात गेंड्याची कातडी! तशी कातडी कमावून वर्षे उलटली. थरावर थर पुटावर पुटे चढावीत तसे जमलेत. तेव्हा टीकेचे वगैरे मनावर विशेष घेऊ नकोस.

बाकी गुरूजनांबद्दल लिहिलेस ते खरेय. पण अगदी खरे सांगू? जनता जितकी जास्त सुशिक्षित तितकी जास्त प्रश्न विचारते. आमची ही जमात अशी आहे जिला प्रश्न विचारलेले आवडत नाहीत. तर शिक्षणाचा कैवार घेताघेताच जनता कमी शिक्षित रहावी ही तारेवरची कसरत आमची सुरू असते. हे तुला उघड सांगणार नाही कोणी, पण तुझा मित्र म्हणून सांगतोय. आहे हे असे आहे. तेव्हा आपल्या संस्कृतीला अनुसरून गुरूजनांस वंदन तर करू आम्ही, पण त्यांना डोक्यावर चढवून ठेवण्याइतके मूर्ख राजकारण आम्ही करत नाही.

तू म्हणालास तो काव्यगत न्याय वगैरे आम्हाला कळत नाही. तशी मंत्रीपदाची खाती सारखीच, काही कमी खाती.. काही जास्त खाती आणि

काय? आपापल्या वकुबावर अवलंबून आहे. त्यामुळे मंत्रीपद ही पक्षश्रेष्ठींची कृपा नि त्या संधीचे सोने करणे ही आपली करामत. असो.

सध्या शाळांच्या प्रवेशाबद्दल धोरण बनविणे सुरू आहे. नवीन शिक्षण धोरणाची रूपरेषा आखायची आहे. अधूनमधून उद्घाटने नि भाषणे आहेत. कॉलेजात आम्ही कधी गेलो नसू, पण तिथल्या प्राचार्यांना नि प्रोफेसरांना चार शब्द शिकवणुकीचे सांगावे लागतात. पोराटोरांना अभ्यासाबद्दलचे अथांग ज्ञान वाटल्याच्या सुरात काही सांगावे लागते. कामे खूप नि वेळ कमी असा प्रकार आहे. अर्थात सत्ताकारणात पुढील शिड्या चढायच्या तर हे करणे आलेच. रात्रीचा दिवस करणे आलेच. त्याबद्दल तक्रार करून कसे चालेल?

इतक्या वर्षांत आम्ही शिकलो ते सत्य एकच आणि अबाधित सत्य.. ते एकच, उगवत्या सूर्याला नमस्कार करते जग. अर्थात नमस्कार करणे आपल्या संस्कृतीत बसणारे आहे. सूर्यदेव सर्व चराचरातील ऊर्जेचा स्त्रोत म्हणून त्याला नमन करणे आले.. बाकी फक्त उगवत्या सूर्यासच नमस्कार ही माणसाने काढलेली सुधारित आवृत्ती म्हण.

असो. तुझे निर्हेतुकपणे लिहिलेले पत्र वाचून बरे वाटते. लिहित रहा.

आता थांबतो, जवळच्या कॉलेजात प्राध्यापकांना मार्गदर्शन करण्यासाठी जायचे आहे.

पत्राची वाट पाहातो.

तुझा मित्र

आमदार मुरलीधर गुळवणी

राज्यमंत्री

सांस्कृतिक आणि शिक्षण खाते

महाराष्ट्र राज्य

***

आमदारसाहेबांस,

सादर नमस्कार

तुम्ही पत्रे छानच लिहिता. मनातले विचार कागदावर उमटवणे इतके सोपे काम नाही. तुम्ही लीलया जमवता. छानच.

बाकी शिक्षण नि राजकारणाबद्दलचे स्पष्ट विचार विचार करण्यासारखे आहेतच. आम्ही शिक्षक वर्ग म्हणजे भारंभार भरती केलेले थोडे सुशिक्षित हमाल आहोत. हमालांबद्दल काही आकस नाही, ना ही त्यांच्या कामास कमी लेखणे. पण आमचे काम जी वरून ऑर्डर येईल त्याची अंमलबजावणी करणे. खिचडी शिजवण्यापासून निवडणुकीच्या कामापर्यंत .. मागे जनगणनेच्या कामात मी गावोगाव भटकलो. इतरही कामे

.. कमी तिथे तुम्ही म्हणत आमच्याकडून करवून घेतात. वेळ मिळाला तर आम्ही मुलांना शिकवतो ही असे म्हणायची वेळ आलीय. अर्थात बेरोजगारीहून हा रोजगार बरा. उगाच सगळ्याबद्दल तक्रारच कशाला करावी? पोरं काय आठवीपर्यंत नापास होत नाहीत. त्यामुळे न पोरांना टेन्शन ना त्यांच्या घरी. फक्त खिचडी खायला मिळावी म्हणून शाळेत येणारे कित्येक जण आहेत. एकूण तुम्ही म्हणालात तसे, शासन दरबाराचे शिक्षणधोरण एक धोरणीपणाने यशस्वीरीत्या सुरू आहे. ह्या सर्वांचा कधी कधी उबग येतो. हे सोडून वाटतं दुसरं काही करावे. मनात विचार अनेक आहेत. त्यांना आकार कसा मिळावा?

कधी कधी वाटते शाळेपासून एका शिस्तीत अभ्यास केला मी, पुढे थोडेफार शिक्षण घेतले. डिग्री नावापुढे लागली. शेवटी बनलो काय? तर शाळामास्तर. याचसाठी केला होता अट्टाहास? मास्तरकीची तशी आवड मला. पण अशैक्षणिक कामेच इतकी की शैक्षणिक काम म्हणजे फक्त हजेरी पट भरणे नि पोरांना पुस्तके उघडायला लावून बाकी कागदोपत्री कामे पूर्ण करत बसणे. असो. रडगाणे पुरे माझे.

तर आपल्या शाळेतील इतरांची हालहवाल काही? माझ्या माहितीत तरी जास्त कोणी नसते. तो हरी हळदणकर बाहेरगावी असतो, तो भेटलेला एकदा हल्ली. त्याला ते पायात पाय घालून पाडल्याचा प्रसंग अजून आठवतो. उगाच डोक्यात हवा गेली असणार, कारण म्हणाला कसा, मुरलीधराची लाईन एकदम व्यवस्थित जमलीय. पायात पाय घालून पाडणे..

राजकारण्यांसाठीच योग्य. लहानपणच्या त्या खोड्यांना मोठेपणी असे प्रोजेक्ट करणे मानभावी पणा नुसता. घोसाळकर गुरूजी गेले. तशी आपली शाळा आहे तशीच आहे. शिक्षक कोणी ओळखीचे उरले नाहीत पण इमारत तशीच आहे. अर्थात शासकीय शाळांच्या इमारती बदलून बदलून किती बदलणार? शहरात शाळा असती तर जागेला गगनाएवढा भाव असता, खेड्यातील जमिनीवरच्या शाळेचे एवढे काय, हो की नाही?

जमल्यास नवीन दौऱ्यात आमच्या शाळेकडे येता येईल तर उत्तम. तेवढीच भेट होईल. थोडे आधी कळवल्यास पूर्वतयारी करता येईल. इन्स्पेक्शन बद्दल नाही बोलत मी. तयारी म्हणजे पाहुणचार वगैरे.

शासनात कोणी माझा मित्र आहे यावर माझा खरेच विश्वास बसत नाही. नाहीतर स्वतःस बिचारी समजणारी जमात सामान्यांची. तुमच्या सारख्या असामान्यांची ओळख असणे म्हणजे कित्येक समस्यांवर जालीम इलाज. असो. शेवटी शिक्षण म्हणजे तरी काय? सामान्यत्वाकडून असामान्यत्वाकडे प्रवास करणे. तमसो मा ज्योतिर्गमय म्हणतात तसे. त्या अर्थाने आम्हा लोकांचे शिक्षण अजून सुरूच आहे म्हणायचे.

असो. जास्त वेळ घेत नाही. कार्यबाहुल्यातून वेळ काढून पत्रोत्तर लिहिणे.

तुमचा मित्र

गोपाळ

***

प्रिय मित्रास,

कार्यबाहुल्याबद्दल म्हणालास म्हणून गंमत आठवली. आमच्याकडे नामकरणाची पद्धती असते, त्यात एखाद्या हृदयसम्राट असतो तसा एखादा कार्यसम्राटही असतो. पण तू एक पाहिले आहे का? तुला कोणी मेंदूसम्राट सापडणार नाही. कारण मेंदू काम करायला लागला की आमची पंचाईत होते. माणूस हा भावनाप्रधान प्राणी असल्याने किती सोय झालीय सांगू. नाहीतर बुद्धीप्रधान जनतेस झुलवावे ते कशाच्या जोरावर? असो. तू जवळचा म्हणून लिहितोय नाहीतर दुसरा कोणी ह्याची ब्रेकिंग न्यूजच बनवायचा.

तर तुझे पत्र वाचले की खरोखरच सामान्य जनतेस काय वाटत असेल याचा विचार येतो. जनसेवेसाठी अहोरात्र आम्ही झटत असतो, पण अफाट जनसंख्येपुढे आम्ही कुठे कुठे पुरे पडणार? तरीही यथाशक्ती आम्ही झटत असतोच. शेवटी पंचवार्षिक परीक्षा कोणाला सुटली आहे? परीक्षा नि तिची आर्थिक तरतूद ह्यात पाच वर्षे हा हा म्हणता निघून जातात. त्या कामातून डोके वर काढायला खरेच वेळ होत नाही. त्यात परत व्यक्तीगत कामे घेऊन येणाऱ्यांची भाऊगर्दी. खरोखरच मुरली भाऊ म्हणत गळ्यात पडणारे मतदार. त्यांची कामे होतील वा न होतील, पण गोड शब्द बोलावेच लागतात. मग कुठे भाषणे ठोका, उद्घाटने करा.. विधिमंडळाचे अधिवेशन नि मिटिंगामागून मिटिंगा.. वगैरे वगैरे. तरीही तुला मी चिठ्ठी का लिहितो? कसलीच अपेक्षा न ठेवता तू लिहितोस म्हणून.

मागे तू टीकेबद्दल लिहिले होतेस. टीका कोणाला चुकलीय? अगदी गांधीजींच्या देशप्रेमावर संशय घेणारे या देशात निपजलेत.  देशासाठी त्याग सोसणाऱ्यांवरही, अगदीच मोठमोठया नेत्यांवर वाटेल ते आरोप करणारेही बांधव आपलेच आहेत. त्यांच्या पुढे आम्ही कोण? यक:श्चितच म्हणावे. तर टीका होणारच. काही ना काही आमच्याविरोधी शोधून काढले जाणारच. या बाबतीत तरी मोठमोठया लोकांशी आमचे साम्य आहे!

तुझ्याबरोबर मनमोकळेपणाने बोलले की बरे वाटते. शाळेत तू मला अभ्यासात मदत करायचास. आता तुला कसली मदत हवी असेल तर विनासंकोच सांग. यथाशक्ती मी ती करेनच.

आता थांबतो. स्वच्छता मंत्री दिल्लीत गेलेत, त्यामुळे इकडच्या शौचालयाच्या उद्घाटनाची जबाबदारी आमच्यावर येऊन पडलीय. तिकडे जावे लागेल. तेव्हा आता थांबावे लागेल.

तुझा मित्र

आमदार मुरलीधर गुळवणी

राज्यमंत्री

सांस्कृतिक आणि शिक्षण खाते

महाराष्ट्र राज्य

***

मेहरबान मंत्री महोदय साहेबांस,

सादर नमस्कार

तुमच्या बिझी शेड्यूलमधून वेळात वेळ काढून तुम्ही लिहिता याचे अप्रूप आहेच. मित्रास पत्र लिहिण्यासाठी कार्यबाहुल्याचे निमित्त न सांगता तुम्ही लिहिता याबद्दल आभार. तसे मैत्रीत आभार मानणे प्रशस्त वाटत नसेलही पण ती समसमान व्यक्तींची मैत्री असेल तर. तुम्ही तुमच्या कर्तृत्वाच्या जोरावर पुढे निघून गेलात आणि मी शिकवण्या घेणारा साधा शाळामास्तर म्हणून मागे राहिलो.

तुम्ही राजकारणी मंडळी मात्र तशी दिलखुलास असता. म्हणजे बाहेर तुम्ही कितीही विकासाच्या गप्पा मारा, तो विकास कोणाचा याबद्दल आतील गोटात बिनधास्त बोलत असता. किंवा नसालही. निव्वळ निखळ मैत्रीच्या जोरावर तुम्ही ते मला सांगत असाल. तसे असल्यास माझे भाग्य थोर.. की मला असा एक सरकार दरबारातील मित्र भेटला, जो माझ्याशी सविस्तर बोलायलाही तयार आहे. तुमचा जनसंपर्क दांडगा नि आजूबाजूला असतात ऐरेगैरे. एक विनंती आहे, म्हणजे तसे मला नकोय काहीही. पण विनंती इतकीच, राजकारणातल्या गंमती जमती सांगितल्या तर? युद्धस्य कथा रम्य: म्हणतात तशाच राजकारणस्य कथाही रम्य म्हणाव्यात अशाच.

त्याही प्रत्यक्ष त्यात मुरलेल्या कोणाकडून ऐकणे म्हणजे पर्वणी. राजकारण्यांचा मनुष्य संपर्क दांडगा, येणारे अनुभव सामान्यांच्या विचारशक्तीपलिकडील. मानवी स्वभावाचे विशेष जेवढे तुम्ही जवळून पाहता, क्वचितच इतरांस दिसत असतील. राजकारणी एखाद्या नटासारखा. कोणत्याही भूमिकेत, पात्रात अभिनेता कसा शिरतो तसा शिरणारा, म्हणजे समोरच्याच्या मनात कोणती चाल आहे ते समजून त्याप्रमाणे आपली प्यादी चेहऱ्यावर त्याच्या अगदी विपरीत भाव ठेवून हलवणारा. किती म्हणून वैशिष्ट्ये सांगावीत? तर अशा काही सुरस आणि चमत्कारिक कथा ऐकायला गंमत वाटेल. अर्थात तुमची हरकत नसेल तरच. माझ्या सारख्या निरूपद्रवी शिक्षकाकडून ही माहिती अर्थातच बाहेर कुठे जाणार नाही. ब्रेकिंग न्यूजची बीमारी शहरी. आमच्या गावात टीव्ही आहे, पण वीजेच्या लपंडावामुळे त्या दिव्य दूरदर्शनास गावकरी अजून सरावले नाहीत हे खरे. असो. जमल्यास थोडे थोडे राजकारण प्रत्यक्ष मंत्रीमहोदयांकडून शिकावयास मिळाले तर कृष्णाच्या तोंडून डायरेक्ट गीता ऐकल्यासारखे वाटेल. ही माझी एक सूचना. तसा आग्रह नाही.. तरी पहावे जमल्यास.

बाकी शाळा ठीक सुरू आहे. सरकारी ग्रांट सरकारी वेगाने येते. पगार ही एकावेळी तीन चार महिन्यांचा मिळतो. तो मिळतो तेव्हाचा आनंदच वेगळा. वर्षातून सरकार कृपेने असा आनंद तीनचार वेळा मिळतो. कृपा आहे सरकारची आणि काय? मुलांना खिचडी खाऊ घालून आता खिचडी तज्ञ झालो आहे. निवृत्तीनंतर एखादे छोटे हॉटेल काढता यावे इतपत

शिकून घेऊ का? ही एक गंमत म्हणून. अशा बारीकसारीक समस्या मंत्री महोदयांस सांगून त्यांच्या वेळेचा अपव्यय करणे अक्षम्य आहे हे मान्य. त्यामुळे आधीच क्षमा मागून ठेवतो.

आपला

गोपाळ

***

प्रिय गोपाळ,

राजकारणाबद्दल तुला इतका रस असल्याचे वाचून खरंच बरे वाटले. आपल्याकडे राजकारण निषिद्ध क्षेत्र मानून शिकले सवरलेले लोक त्याकडे दुर्लक्ष करतात. अर्थात तिथे पाहिजे जातीचे हे खरेच. तरी देखील तुझा राज-का-रण कथा ऐकण्याचा इंट्रेस्ट पाहून काही गोष्टी लिहिनच.

दहावीपर्यंतचा जीवनक्रम तर तुला ठाऊक आहेच. तिथून आपली आयुष्ये वेगवेगळया वळणांवर गेली. आपल्या गावचे सरपंच श्री.गोविंदराव गणफुले यांनी तेव्हा पंखाखाली घेतले म्हणून, नाहीतर सारे आयुष्य फुकट गेले असते. गोविंदराव तसे खटपटे लटपटे. त्यांच्या कडून खूप काही शिकायला मिळाले. कोणाशी बोलावे कसे नि त्याच्या अगदी बरोबर उलट त्याच वेळी वागावे कसे.. कोणाला संशय न येता डाव कसा साधावा वगैरे वगैरे राजकारणातील कठीण पण मूलभूत गोष्टी आम्ही त्यांना पाहून पाहून

शिकलो. गोविंदरावांचे आम्ही उजवे हात होतो अगदी. त्यांचे ऋण आणि त्यांची शिकवणूकही आम्ही जन्मभर विसरणार नाही. मग काही वर्षांत त्यांचा डाव त्यांच्यावर उलटवून आम्ही सरपंचपदाची माळ स्वतःच्या गळयात घालून घेतली. आपला शिष्य असा आपल्या पुढे गेलेला पाहून एखाद्या गुरूला कसे भरून आले असते नाही? पण तेव्हा हृदयविकाराचा झटका येऊन गोविंदराव निवर्तले नि गुरूच्या छत्रछायेस आम्ही हरपलो. त्यांच्या शिकवणुकीची शिदोरी घेऊन पुढे आम्ही विधानसभा लढवली. हरलो एकदा. मग पुढील वेळी जिंकलो. हिंमत न हरता लढणे महत्त्वाचे. त्यावेळी श्री.मारोतीराव पाटील मदतीस आलेले. ते आमचे दुसरे गुरू म्हणायला हरकत नाही. गोविंदराव शाळा चालवत म्हणावे तर मारोतीराव डायरेक्ट पोस्ट ग्रॅज्युएटचे शिक्षण देणारे. त्यांनी राज्यभराची दृष्टी दिली. एका परीने राज्यातील मंत्रीपदासाठी आम्हाला तयार केले म्हण ना. आता सध्या मारोतीरावांत आणि आमच्यातून विस्तव ही जात नाही. पण त्यांनी तेव्हा उपकृत केलेले ह्याचा उल्लेख आम्ही ते स्वतः हरले तेव्हाच्या सभेतही केला होता. तुला म्हणून सांगतो, एकाच पक्षाचे आम्ही, पण मारोतीरावांचा पत्ता तेव्हा आम्ही कापला म्हणून ही खुर्ची आमची झाली. त्यांचे उपकार स्मरून आम्ही ती सांभाळतो आहोत. मारोतीराव आता तळ ठोकून आहेत इकडे, आमचा पत्ता काटण्यासाठी. तुझ्यासारख्या नवख्यांना ही पतंगबाजीसारखी काटाकाटी पाहून गांगरल्यासारखे होईल. चालायचेच. राजकारण म्हटले की अशा गोष्टी व्हायच्याच.

अर्थात मधल्या काळात संगीत खुर्चीचा खेळ कसा चालतो ते जवळून पाहिले. त्या खेळात जसे योग्य वेळी तुम्ही खुर्ची समोर नसाल तर बाद होता तसेच इथे ही. वेळ साधणे महत्त्वाचे. जर ती वेळ लवकर येत नसेल तर तशी संधी निर्माण करणे महत्त्वाचे. असो. ह्यास कोणी गलिच्छपणा मानत असतील, पण खुद्द चाणक्य सारे सांगून गेलाय. त्या प्राचीन परपंरागत ज्ञानाप्रमाणे वागणे गलिच्छ कसे असेल? आणि सारेच मारे स्वच्छतेकडे धावायला लागले तर गलिच्छवस्ती सुधार कार्यक्रम कोणी राबवावा? असो. तूर्तास इतके ज्ञान पुरे.

लिहित रहा. वाट पाहातो.

तुझा मित्र

आमदार मुरलीधर गुळवणी

राज्यमंत्री

सांस्कृतिक आणि शिक्षण खाते

महाराष्ट्र राज्य

***

मानानीय नामदार मंत्री महोदय यांस,

तुमचे पत्र अति रोचक आहे. राज का रण म्हणून तुम्ही त्यास युद्धाच्या पातळीवर आणून ठेवले आहे. आपल्या शिक्षकांबद्दलचा आदर व्यक्त करण्याची तुमची राजकारणी पद्धत आवडली. गुरूची विद्या गुरूलाच परत देण्याइतके शिक्षण देणारे गुरू धन्य आणि विद्यार्थी ही धन्य. मारोतीराव हल्ली तिकडे म्हणजे मुंबईतच तळ ठोकून आहेत की दिल्ली दरबारी? नाही म्हणजे असे निर्णय तिकडून होतात असे आम्हा सामान्यांस वाटते म्हणून. मारोतीराव आणि शिवाजीराव कदमांचे साटेलोटे असल्याचेही ऐकिवात आहे. शिवाजीरावही तुमच्या आगेमागे असायचे, ते मारोतीरावांच्या गोटात गेले असे दिसते. तुम्ही म्हणता तसे, चालायचेच. विजयराव निकम आणि बबनराव निंबाळकरांबद्दल ही असेच काही कानावर आले आहे. हे सारेच तिकडे तळ ठोकून मोर्चा बांधणी करत आहेत का? राजकारणात विजेत्यांस शत्रू फार असे दिसते. अर्थात ह्यातील आतील बातम्या तुम्हालाच ठाऊक. आमचे फक्त सांगोवांगी आणि कानोकानी. असो.

पुढे मागे मुंबईत कामानिमित्त येणे व्हायची शक्यता आहे. अर्थात तुमची भेट होण्याची शक्यता कमीच, कारण तुम्ही सतत दौऱ्यावर असणार. तरीही तुम्ही पुढील महिन्यात कधी असण्याची शक्यता आहे ते कळवल्यास त्याप्रमाणे येता येईल. अर्थात काम काही नाहीच, जुन्या मैत्रीस उजाळा आणि काही नाही.

सध्या शाळेच्या इन्स्पेक्शनची गडबड आहे. पटसंख्येवर शाळांची मान्यता ठरते, तेव्हा गुरांना संध्याकाळी गोठ्यात घेऊन जावे तसे सकाळी मुलांना शाळेत आणावे लागते. तशी मुलं चांगली असतात. मला वाटते त्यांचा बरा वाईट माणूस होतो तो मोठेपणी. म्हणजे मुलं वयाने लहान पण मनाने मोठी, आणि मोठी माणसं वयाने वाढतात नि मनाने कोती होत जातात. आणि आपण त्यांना मोठे म्हणत असतो! किती मनोज्ञ विरोधाभास हा नाही? असो. असले काही निरीक्षण आमच्यासारख्या रिकामटेकड्यांचे काम. तुम्ही तुमच्या कामात मश्गूल असता. चांगले आहे.

सवड काढून पत्रोत्तर देणे.

आपला,

गोपाळ

***

प्रिय मित्र गोपाळराव,

खूपच दिवसांनी तुझे पत्र आले. वाट पाहात होतो. अर्थात तुला तुझी कामे असणारच. मध्ये दीड दोन महिने उलटून गेले म्हणून वाटले, तब्येत वगैरे ठीक आहे की नाही. तशी ती असणार.

गंमत सांगू तर काही दिवसांपूर्वी तुझ्या सारखाच दिसणारा कोणी माणूस रस्त्यावर दिसला. आम्ही आमच्या गाडीत होतो. वेगाने गाडी पुढे गेली. मग विचार आला, तू आलास तर तसे कळवशीलच. आणि एकासारखी दिसणारी माणसे असतातच. असो.

तर तुझे म्हणणे खरे आहे. वयाने वाढतात माणसं नि मनाने छोटी होत जातात. हा जगाचा नियमच असावा. नाइलाज आहे.

एकूण तू राजकारणाची बरीच माहिती गोळा केलेली दिसते. तू घेतलेली नावे बरोबर आहेत, पण ही माहिती तुला माहिती कोठून मिळाली? म्हणजे आतील गोटातील आहे, विशेषतः विजय निकमबद्दल. तो माझा उजवा हात एकेकाळी. हल्लीच एकाएकी मारोतीरावांनी फितवला. फारसे कोणास माहिती नाही. नाइलाज आहे. आमची धांदल पाहात असशीलच. म्हणजे सगळे काही एकाचवेळी वेगवेगळ्या आघाडीवर लढत रहायचे. राज का रण म्हणालो ते यासाठी. समाजकारण, राजकारण आणि सत्ताकारण ह्या एकापुढे एक येणाऱ्या पायऱ्या आहेत.

शेवटी उद्देश शेवटच्या पायरीवर चढणे. तिथे मात्र आपली सावलीदेखील आपला साथ देईल की नाही ते सांगता येत नाही तर इतरांचे काय? निष्ठावान हा शब्दच शब्दकोशातून काढून टाकण्याची वेळ आलीय हे खरे. असो. रडगाणे आम्ही राजकारणी लोक कधीच गात नाही. जनतेला सुखस्वप्नात गुंगवणे नि गुंतवणे हे आमचे काम. त्यात मग आपली व्यक्तीगत दुखणी कोणास कशी ऐकवावीत? असो. राजकारणात हे चालायचेच.

पुढील महिन्यात विचारशील तर आम्ही येऊन जाऊन असू. दौरे आहेत, मिटिंगा आहेत, निवडणुका आहेत. मधूनमधून दिल्ली दरबारात हजेरी लावावी लागते. हजारो व्यवधाने आहेत. सारे सांभाळून तुझी भेट घेता येईलच याची शक्यता आजपासून वर्तवणे कठीण. लवकरच शिक्षक मतदारसंघाच्या उमेदवारीची वेळ येईल, तिकडे जमल्यास लक्ष द्यायचे आहे. पण सध्या लक्ष परदेश दौऱ्याच्या तयारी कडे लागले आहे. सहा ते तीस या तारखांमध्ये आम्ही नक्कीच येथे नाही आहोत. स्वित्झर्लंडमधील प्राथमिक शाळांची पाहणी करण्यास जायचे आहे. मोठया मिनतवारीने हा दौरा माननीय मुख्यमंत्री यांच्याकडून सँक्शन करवून घेतला आहे. अर्थात घार हिंडते आकाशी चित्त तिचे पिलापाशी सारखे लक्ष सारखे इकडे लागले असेल. आमदारपदास पाच वर्षे कुणी धक्का लावू शकत नाही, पण मंत्रीपदाचे तसे नाही. पण शिक्षणमंत्री म्हणून स्वित्झर्लंडला जायचे आहे ते ही महत्त्वाचे. मंत्री झाल्यावर हा पहिलाच मोठा परदेशी दौरा, तो ही स्वित्झर्लंडचा. त्यामुळे आमच्यावर जळणाऱ्यांच्या संख्येत नक्कीच वाढ

होणार. असे म्हणतात शिखरावर एकाच माणसाला उभे राहण्याची जागा असते, अजूनतर शिखराचा पत्ता नाही तरीही हितशत्रू जमा करत जावे लागते. राजकारण ते, नाइलाज आहे. असो.

बाकी तुझ्यासारख्यांचे एक बरे आहे, उगाच ह्या सगळ्या गोष्टींची कटकट नाही. युद्धाच्या कथा आवडत असल्या तरी कोणी युद्धावर हौसेने जात नाही, तसेच आहे हे थोडेफार. राजकारणाच्या कथा ऐकतोयस मोठया इंट्रेस्टने.

थोडा पुढील पत्रव्यवहारास उशीर होईल. युरोपात असू. आम्ही नसू तोवर इकडे मधल्या निवडणुका होतील, नवे पदवीधर आमदार म्हणून येतील. त्या तशा निरूपद्रवी निवडणुका त्यामुळे फारसे टेन्शन नाही. आम्ही परतलो की मग सविस्तर परदेश दौऱ्याबद्दलही लिहूच.

तुझा मित्र

आमदार मुरलीधर गुळवणी

राज्यमंत्री

सांस्कृतिक आणि शिक्षण खाते

महाराष्ट्र राज्य

***

माननीय मंत्रीमहोदय यांस,

सादर नमस्कार

हे पत्र मिळेल तेव्हा तुम्ही स्वित्झर्लंडच्या थंडगार हवेत वहिनींबरोबर ट्यूलिप गार्डनमध्ये फिरत असाल. अर्थात प्राथमिक शिक्षणाबद्दलचे प्राथमिक काम आटोपूनच. दुर्दैवाने मी मुंबईत दाखल होण्याची आणि तुमची प्रयाणाची तारीख एकच आहे. अर्थात मागे दोनदा हल्लीच मी मुंबईत काही भेटीगाठींसाठी येऊन गेलो. तेव्हा अतिशय घाईत होतो, त्यामुळे भेटीसाठी येऊ शकलो नाही. आणि आता सवड असेल तेव्हा तुम्ही नसणार. हे असेच असते. दात असतात तेव्हा चणे नाहीत नि चणे आहेत तेव्हा दात नाहीत, असले काही ना काही वाटत राहते. पुढे मागे भेट होईलच. तेव्हा नवलविशेष समजेलच.

समाजकारण नि राजकारण ही सत्ताकारणाचीच अभिन्न अंगे आहेत हे पटते. शेवटी हाती सत्ता नसते त्यास विचारतो कोण? तेव्हा दोन्ही गोष्टींचा वापर करून सत्तापदावर बसण्यात गैर काहीच नाही. पण काही जणांना समाजकारणाशिवाय ही सत्ताकारण जमू शकते अशी उदाहरणेही दिसतातच. असो.

हे पत्र फक्त लिहून पाठवून ठेवलेय. तुम्ही पत्रोत्तर लिहू शकणार नाही याची कल्पना आहेच. म्हणून जास्त काही लिहित नाही. सध्या पत्र नवीन पाठवत नाही. तुम्ही परत आलात की मगच नवीन घडामोडींबद्दल लिहिले जाईल. तोवर नमस्कार.

तुमचा मित्र

गोपाळराव कोळसेपाटील

***

मित्रवर्य मुरलीधर यास,

म्हटल्याप्रमाणे पत्र लिहितोय ते नवीन घडामोडींनंतर. तू आधीच म्हणून ठेवलेयस, राजकारण आहे तेथे सर्व चालायचेच. त्यास अनुसरूनच सारे झाले समज. मा.मारोतीराव, यशवंतराव, विकासराव इत्यादींच्या भेटीगाठीतून हे सारे साध्य झाले. राजकारणात काहीही घडू शकते हे खरेच. नाहीतर माझ्यासारखा एक शिक्षक निवडून येतो काय नि शिक्षणमंत्रीपदावर बसतो काय.. सारेच अकल्पित. अर्थात त्यासाठी मला मेहनत करावी लागलीच. प्रत्यक्ष निवडणुकीच्या वेळी तू युरोपात होता. तू पोहोचताच तुझ्याकडून राजीनामा घेण्यात आला. मी तुझ्याजागी राज्यमंत्री झालो.. ह्या

सगळयासाठी मार्गदर्शन तू नकळत करत होतासच. एकलव्याने द्रोणाचार्यांकडून शिकावे तसे राजकारण मी तुझ्याकडून शिकत आलो आहे. आपली पत्रापत्री ही गेल्या आठदहा महिन्यातली. त्याआधीपासूनच कित्येक वर्षांत तुझा उत्कर्ष होताना पाहात नि त्यातून शिकत आलो आहे. या वर्षी शिक्षक उमेदवारांची निवड होताना मारोतीरावांहून अन्य कोणी मदत करणारा मला भेटू शकणार होता? तुझ्या पत्रातून तूच त्यांचे नाव सुचवलेस आणि माझा प्रवास थोडा अधिक सुकर झाला. तसे मारोतीराव व्यक्ती म्हणून चांगले आहेत, माझे शिक्षक असणे उपयोगी पडले. त्यातून निवडून आल्यावर तुझ्या जागी राज्यमंत्री म्हणून शिक्षित आमदारास बसवणे.. अर्थात शिक्षित असणे शिक्षणमंत्र्यास गरजेचे नाही, परंतु मारोतीरावांनी तुझे अशिक्षित असणे नेमके हेरून त्याविरूद्ध पक्षश्रेष्ठींकडे आवाज उठवला. खरेतर तुझी खुर्ची काढून घेणे इतका मर्यादित अॅजेंडा मारोतीरावांचा असण्याचा फायदा मला झाला.. किंवा मी तो उठवला म्हण. हा तू निवडणुकीत त्यांना पाडलेस, त्याचा त्यांनी घेतलेला बदला म्हणता येईल. अर्थात तुझे आमदारपद कोणीच काढून घेऊ शकणार नाही हे खरे.

ही मंत्रीपदाची खुर्ची तशी उबदार आहे. तुझ्या राजीनाम्यानंतर येथे बसताना तसे थोडे अवघडल्यासारखे झाले, पण ते तात्पुरते. राजकारणात सारे चालायचेच हे तू सांगितलेले ब्रीदवाक्य मी सदैव ध्यानी ठेवतोय.

आपण आधीही मित्र होतो. पुढे ही तसेच राहू. हे राज का रण आपल्यामध्ये विनाकारण येऊ देऊ नये हे उत्तम. मला मनापासून तसे वाटते. तुला पटत असेलच.

आता मंत्रालयात कधी कामानिमित्त माझ्या दालनात येऊन भेटू शकतोस. तुझ्या बिझी शेड्यूलमधले कार्यक्रम आता मला अटेंड करावे लागतील, पण मित्र म्हणून तुझ्यासाठी वेळ काढीनच. राजकारण तात्पुरते नि मैत्री अखंड आहे..

तुझा मित्र

आमदार गोपाळराव कोळसेपाटील

राज्यमंत्री

शिक्षण खाते

महाराष्ट्र राज्य

४.

# आता तरी येशील का ?

प्रियतम...

आपले पत्र पावले. आपण कुठल्या हिशेबाने सांगत आहात की आपण मे महिन्यापर्यंत मोकळे व्हाल? आणि इकडे येण्याचे कराल? आपला इरादा नेक दिसत नाही. आम्ही आपल्यावर खफा आहोत. एका माणसाने इकडे न येण्याचेच ठरवलेले दिसते. आपल्या वाटेकडे पाहून आमचे डोळे शिणले आहेत. हे पत्र तार समजून लागलीच निघून येण्याचे करावे. ते ही आमची प्रकृती तोळामासा होण्याअगोदर.. शीघ्र पत्रोत्तरा बरोबर व्यक्तिश: शीघ्र गतीने येण्याचे करावे. राणीसरकारांचा हुकूम समजून उलटपावली न आल्यास यथायोग्य समाचार घेऊन सजा फर्मावली जाईल याची नोंद घ्यावी..

.... तुझीच

***

प्रियतमे..

तुझे पत्र पोहोचले. तुझ्या पोष्टाचा स्पीड चांगलाच जलद दिसतो. त्यामुळे ते पत्र रमतगमत आणि डुलत डुलत आठवडा भरात पोहोचले इथवर.

तुझ्या भाषेची गंमत वाटली.

तू मीनाक्षी नसून साठीच्या दशकातील कोणी गोपिकाबाई लिहित असाव्यात असे वाटले वाचून. छान जमते तुला असे लिहावयास.

येण्याचे म्हणशील तर इथून सवड मिळणे कठीण. You know my boss..खत्रुड is the only word. Anyhow..प्रयत्न करतो.

किती मस्त वाटतेय पत्र वाचताना सांगू.. हस्ताक्षराचा ओलावा टाईप केलेल्या अक्षरास नसतो..

इतपत ऑफिशियल मजकूर पुरे..

पुढे काम की बात..

किती महिने झाले प्रिये.. स्वप्नातही तू दिसत नाहीस इतका मिस करतोय तुला. दिल करता है उडकर आऊं.. सामने बैठूं.. और दोहराऊं...इथे नदीकाठी संध्याकाळी मस्त हातात हात घालून फिरायला किती मजा येईल.. पण हाय .. नुसतेच प्रिया आज माझी नसे साथ द्याया.. म्हणताना कंटाळा येतो. प्रेमी जिवांची ताटातूट करणाऱ्या या नोकरीच्या बैलाला

ढोल.. ढोल आणि बैल.. जरा जास्तच देशी वाटतात नाही असल्या हृदयद्रावक मजकुरात? पण आतून आलेले आहेत ते dear!

चल.. थांबतो.. माझ्या गुलाबाकडून लगेच उत्तर येऊ देत.. मोगऱ्यासारख्या टपोऱ्या अक्षरात! किती मजा ना गं खरीखुरी पत्रे वाचताना!

... तुझाच

***

प्रियतम,

गुलाब आणि मोगरा!

आम्ही असल्या चापलूसीस भुलू ऐसे आपणास वाटत असेल वाटत असेल तर तो आपला घोर गैरसमज आहे. फुलांची नावे ठेवून fool ( गोपिकाबाईही काही इंग्रजी बुके शिकल्यात म्हणावे ) बनवण्याचे इकडून घाटत आहे असा राणीसरकारांच्या मनाचा समज झाला आहे. त्यास प्रत्यक्ष भेटी अंती खुलासा केल्या वाचून समाधान होणे नाही. तरी सबबी न देणे. आपण हिंदी सिनेमा.. नाट्यगीते..भावगीते.. वगैरेची उजळणी येथे येऊन केल्यास उत्तम. हात तुझ्या हातात .. धुंद ही हवा हे गाणे जास्त योग्य होईल असे वाटत नाही का आपणांस? तशी आम्हास ही गाणी येतात. तेरी दो

टिकीया की नौकरी में मेरा लाखोंका सावन जाए.. काय म्हणायचे ते कळले असेलच! म्हणून मनोवेगाने येण्याचे करावे म्हणजे आम्ही संतुष्ट होऊ.. कळावे .. लोभ असावा..

...तुझीच

***

प्रियतमे..

प्रियेची नाराजी ओळखून चंद्राच्या चकोराची सय येते गं.. तू म्हणालीस ते खरे.. दो टिकिया की नौकरी.. फार पूर्वी बोनापार्टींच्या नेपोलियनाला समजलेले सत्य सांगतो राणीसरकारांस.. सैन्ये पोटावर चालतात.. तद्वत ही संसाररूपी लढाई पोटावरच जिंकली जाईल! काय हा दुनियेचा न्याय! तू म्हणतेस तशी गाणी गायला आवडेल मला. किंवा नाहीही आवडणार.. का ते ओळख? करेक्ट ओळखल्यास तू ओळखशील त्याच्या शंभरपटीने तुला बक्षीस! हसू नकोस.. हे बक्षीस दोघांत विभागून असेल हे तुलाही ठाऊक आणि मलाही! असो .. पण तुझ्या पत्रलेखनास दाद द्यायलाच हवी राणी! एखादा खलिता धाडल्यासारखी पत्रे तुझी. काय सांगू मी तुझ्या पत्राची किती वाट पाहात होतो. ही मजा खऱ्याखुऱ्या पत्रातच.. हुरहूर, बेचैनी आणि भाषिक करामती...old is gold..या फास्ट

जमान्यातही आपली snail mail would win! आपली भेट प्रत्यक्ष नाही .. पण पत्र रूपी तर होते.. हे ही नसे दोडके...sorry थोडके!

असो.. तू थोडक्यात सारे लिहून जातेस.. मला शब्दांचा फाफटपसारा मांडायला लागतो. माझे गुल्लाबाचे फुला.. आमाचा लोभ आहेच. आणि प्रत्यक्ष भेटीची ओढ ही आहे. तोवर..

..तुझाच

***

प्रियतम..

जिथे सागरा धरणी मिळते.. तिथे तुझी मी वाट पाहाते.. नच आलास तर वाट लावते..

...तुझीच

***

प्रियतमे..

काय हे गुलबानो.. गुल गुलशन गुलफाम.. गुलाबी गुलाबाच्या फुला.. किती ही नाराजी.. मोठ्या उत्सुकतेने हे पत्र उघडले तर त्यात फक्त दोन ओळींचाच मजकूर? तो ही खंडणी मागितल्यासारखा? राणीसरकार कमीतकमी शब्दात ठासून अर्थ भरण्यात माहिर आहेत.. पण या चातकास काही शब्दांचे तुषार चोचीत पडण्याची आस आहे.. गोपिकाबाईंनी इतके नाराज होऊ नये.. आम्ही आलो की आपला राग शांत करूच.. तुम्ही ते कोडे.. मागील पत्रातील.. सोडवलेत का? सोडवाच.. मनातल्या मोर पिसांची शपथ तुला आहे.. दिल्या घेतल्या वचनांची शपथ तुला आहे..

***

प्रियतम..

प्राणनाथ.. इस नाचीज को लिखनेका बहुत कंटाळा आता है! तुझी ही पत्रे आतुरतेने वाट पाहात वाचते मी राजा! लिहू पाहाते पण लिहिता येत नाही.. पण ते गाणे खरेय.. पत्र तुझे येता अवचित.. गाली लाली खुलते नकळत..

...तुझीच

***

प्रियतमा..

Thanks..किती बरे वाटतेय सांगू राणी.. आणि एका गुलाबी गुलाबाच्या फुलाचे गाल.. लाल.. लाल..! किती बरे वाटतेय सांगू.. ते कोडे सोडवायचे सोडून दिलेस की काय? हिंट देऊ? गाण्यासाठी तोंड वापरायचे की.. बस इतकीच हिंट..  तशी तू माझ्याहूनही चतुर, चाणाक्ष आणि लब्बाडही आहेस हे मला ठाऊक आव राणी.. कधी वाटते असल्या पत्रांसाठी तरी काही दिवस दूर रहायला हवे की काय? तुझे मोत्यासारख्या अक्षरांतले पत्र.. त्यापुढे माझे गिचमिड.. पण कसे ही असो.. पण राणी भावना सच्च्या आहेत सोळा आणे! ऑफिसच्या बैलाला अजून एकदा ढोल.. मधुराणी तुला सांगू का..

...तुझाच

***

प्रियतम..

तुझे पत्र मिळाले. मजकूर समजला. कळावे. इतकेच लिहिणार होते मी! प्रतीक्षा करण्याची शिक्षा.. तुझ्या दर्शनाची वाढ भिक्षा.. तुझे कोडे उलगडले आहे मला..आलास की प्रत्यक्षच तोंड देईन तुझ्या प्रश्नास! मग ते

शंभर पटीने वाढवायचे की नावे ते तू ठरव. तूर्तास वाट पाहणे.. कधी रे येशील तू.. जिवलगा!

...तुझीच

***

प्रियतमे..

हाय.. नको असे जीवघेणे लिहित जाऊस.. इथे दिवस सरत नाहीत.. त्यात तुझे असले पत्र.. कितीदा गाऊ.. प्रिया आज माझी नसे साथ द्याया.. तुला आठवते.. आपण त्या सिनेमाला गेलो होतो.. त्यातले ते गाणे.. दिल दीवाना.. बिन सजनाके मानेना.. आज अजून लिहवत नाही राणी.. ऐक .. नको जाऊ कोमेजून माझ्या प्रीतीच्या फुला..

...तुझाच

***

प्रियतम...

ये पगला.. समझानेसे समझेना..! आम्ही फक्त आमच्या राजकुमाराची वाट पाहतोय.. आतुरतेने.. काही होवो.. तू असा जवळी रहा.. किती हार्टलेस रे तुझे ते ऑफिस.. मी किती वैतागलेय सांगू..?

...तुझीच

***

प्रियतमे..

गुलबदन गुलाबी गुलाब.. माझ्या फुलाने असे कोमेजू नये.. उदास का तू.. आवर वेडे नयनातील पाणी.. लाडके.. आम्ही मोहीम फत्ते करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहोत. आपल्या हस्तस्पर्शाने पुनीत झालेल्या खलित्याच्या कागदाचा सुगंध आमच्या काळजात भरून घेत आहोत. मग तो गंध आमच्या धमन्या धमन्यांतून वाहील.. नखखिशांत.. पोहोचेल ते..आठवते ते नखखिशांत? शाळेतल्या बाईंनी उपटले होते माझे कान.. तू तेव्हा दोन वेण्या घातलेली .. पहिल्या बाकावर बसून हसलेलीस मला.. नखशिखांत! आठवतेय अजूनही.. आज फारा दिवसांनी आपल्या लव्हस्टोरीच्या सुरूवातीची याद आली.. आणि नखखिशांत गेलो मोहरून! मुश्कील है बहुत आसान नहीं है.. प्यार भुलाना बचपन का!

...तुझाच

***

प्रियतम..

बाई बाई मनमोराचा कसा पिसारा फुलला.. तुझे पत्र वाचून आठवली ती गोष्ट.. किती फिदीफिदी हसलेले मी तुझ्यावर! नखशिखांत! तोच तो क्षण राजा.. तुझ्ता चेहऱ्यावरचे निरागस भाव.. मी हसले खरी .. पण खरे तर तिथेच फसले.. तू खाली बसेतोवर मला किती वाईट वाटले सांगू.. म्हणजे तुला मी ते कधीच सांगितलेय.. कल्पना कर.. त्या खिशातून निघालीय आपली ही स्टोरी! ते सोड.. येतोस कधी ते सांग.. वाट पाहून डोळयांच्या झाल्यात खाचा.. लिखो कब आओगे.. तुम बिन ये घर सुना सुना है..

...तुझीच

***

प्रियतमे..

परत राणी हे.. हे काय? रुलायेगी क्या पगली? त्या प्रेमकथेला सुरूवात खिशातून झाली.. नि खिशातच संपणार होती ती.. remember

माझ्या खिशातले ते प्रेमपत्र.. सुरंगी सुमधुर सुंदरीस.. सुरूवातीचा सुयोग म्हणून लिहून ठेवलेले खिशात. ते नेमके पडावे टीचरच्या हाती.. त्या सु सु वाल्या पत्राने माझे डोळे सु-जवले चांगलेच! आणि लबाड तू.. त्याकडे सु-चतुरतेने

सु-कानाडोळा केलास.. अजून नाही विसरलोय.. आलो की घेईनच बदला!

...तुझाच

***

प्रियतम..

येच राजा.. कधी येतोस? बदला घ्यायला तरी ये.. विरहाग्नीत जळतेय ही राधिका.. कृष्णाची सखी..

...तुझीच

***

प्रियतमे..

कृष्णाची राधा.. रोमियोची जूलिएट.. आठवतेय.. कॉलेजच्या नाटकात होतो आपण दोघेही.. तू नि मी.. नाटकातले नवरा बायको.. प्रत्यक्षात होण्याअगोदर..

मस्त होते नाटक ते.. नाटक कसले.. real life! तू किती छान करायचीस काम स्टेज वर. मी तुला पाहात राहायचो नुसता.. विसरायचो आपल्या लाईन्स..rather लायनी मारताना लाईन्स विसरायचो.. आपला डायरेक्टर होता ना समीर.. कसली तडी दिलेली त्याने मला.. तुझ्यामुळे .. couldn't help.. तुझ्याकडे पाहताना मी सगळे विसरायचो.. लायनींचे काय.. जास्त नाहीत.. साताठ वर्षे झाली .. मंतरलेले दिवस ते राणी..wish they come back..

...तुझाच

***

प्रियतम..

मी विसरेनसे वाटते तुला? नाटकातल्या नाटकात.. मध्ये स्टेजवर अंधार झाला तेव्हा तू कानात येऊन कुजबुजलास..ते I love you.. मी क्षणभर विसरलेच होते माझा डायलॉग.. त्या नाटकात नंतर होता तो आपल्या भांडणाचा सीन.. मला चिडायचे तुझ्यावर नि तू ..I love you ..

बोलतोयस.. फजिती होता होता बचावले मी.. विसरले नाही अजून..wish those days are back..इतकी वर्षे लोटली.. खरेच नाही वाटत.. मी तुझी आठवण काढून इकडे तळमळतेय नि तू आठवणींची पुरचुंडी.. पुरचुंडी कसली .. पोतडेच उघडून बसलायस..

...तुझीच

***

प्रियतमे..

काय करू राणी? इकडे ऑफिस तिकडे बॉस .. कामाचा डोंगर नि त्यात सतत दिसत राहणारी तू.. विरहाग्नी! खरा शब्द आहे ना? भाषा आपली ग्रेट आहे. बिरहाकी आगमें जलना.. ये भी कोई जीना है.. ये भी कोई मरना..आठवतेय एकदा आपण त्या नदीकिनारी बसलेलो.. समोर सूर्यास्त.. रंगीबेरंगी आकाश.. हात तुझ्या हातात.. धुंद ही हवा.. तू म्हणालीस .. तू असा जवळी हवा.. मी म्हणालो.. चल घेऊया चहा! एक एक आठवण माझी सखी आहे गं..

...तुझाच

***

प्रियतम..

राजा.. किती रे रडवशील? ते राणी न बिणी .. सरकारबिरकार.. काही कामाचे नाही रे.. तुला आठवतात त्या गोष्टी मी विसरेन का रे? तिथे खाल्लेल्या मक्याचा दाणा न दाणा आठवतो.. म्हणजे दाणादाण आठवते.. माकड हातातले कणीस हिसकायला आले त्यावेळेची! कसले रे दिवस ते! आठवायला लागले की अजूनच आठवायला लागतात.. करोगे याद तो .. कुछ और याद आएगी..

...तुझीच

***

प्रियतमे..

खरंय राणी.. पण हे दिवस सरतील.. दिस जातील.. दिस येतील.. भोग सरल .. सुख येईल.. तुझ्यामाझ्या संसाराला आनि काय हवं.. पुढे लिहवत नाही..

...तुझाच

***

प्रियतम..

होय रे.. तुझे माझे लेकरू.. मी पण पाहतेय वाट.. त्याची किंवा तिची! तुझंमाझं लेकरू.. आणि आपले घरकुल.. पण त्याआधी.. मी रागावलेय तुझ्यावर.. तुझे ते दूरदेशी जाणे.. मी आता बोलणार नाहीए तुझ्याशी ..

***

प्रियतमे..

हं.. नकोस सखे अशी रागावूस.. का गं अबोला.. बोल काहीतरी बोल माझ्या फुला.. जरी बोलणे हे तुझे चांदण्याची सुरी! लेकराची वाट मीही पाहतोय गं.. मी असा परदेशात.. तूच येऊ शकली असतीस तर? मला ठाऊक आहे ते शक्य नाही .. आता.. माझ्यासाठीही.. पुढे कधी.. तू असतीस तर फुलला असता चांदण्यांचा मळा..

...तुझाच

***

प्रियतम..

नको रे राजा.. भरून येतो गळा.. थकले रे नंदलाला.. लिहून लिहून थकले .. दमले तुझ्या येण्याची वाट पाहात.. मला वाटते मी तेच तेच लिहितेय का? लिहिणे बंद करू? तू वैतागला असशील तेच तेच वाचून..

...तुझीच

***

प्रियतमे..

नाही गं.. तुझ्या पत्रांवर जगतोय मी.. तुझ्या हातांचा स्पर्श झालेला कागद .. तुझी पत्रे मी पुन्हा पुन्हा वाचतोय.. रिव्हिजन म्हण! इथल्या शुष्क वातावरणात तोच विरंगुळा नि दिलासा ही.. तुझे पत्र वाचले की तू जवळ असल्यासारखे वाटते. वाटते तुझ्या हातांचे हार आहेत गळयात.. मी त्यांना आंजारतोय.. गोंजारतोय.. तू मला बिलगून म्हणतेस.. शोन्या..

तुझा तो आवाज ऐकायची खूप इच्छा होते गं.. लिहिल्याने मन तरी होते मोकळे.. तू लिहीत रहा.. तोच माझा प्राण आणि प्राणवायू..

...तुझाच

***

प्रियतम..

Sorry..आजवर मी माझाच करत होते विचार.. तू पण एकटाच आहेस .. तेही दूरदेशी .. तुलाही एकटेपणा सोसत नसेल .. कधीच रे मी असा विचार नाही का केला? माझी मलाच वाटते लाज.. यापुढे मी नाही रे रागावणार तुझ्यावर .. खोटेखोटे ही नाही. खरेच.. शपथ! पण काय करू रे.. I miss you.. सैरभैर होते मी एकटी.. आपण भेटलो तेव्हा चंद्र होता साक्षीला.. त्या चंद्राची शपथ..

***

प्रियतमे..

प्रिये.. प्राणप्रिये.. तुझ्यातला प्राण गेल्याला आज बरोबर एक वर्ष झाले. तू गेलीस.. आपल्या बाळाच्या निशाणीसह.. तू होतीस एक उत्साहाचा झरा.. सतत गुणगुणायचीस तू.. ती सारी भावगीते तुझ्या आवडीची.. तुझ्या आवाजात माधुर्य होते. नाद होता. आज तू जिथे

पोहोचलीस तिथून माझी आठवण काढत असशील. तू होतीस. कॉलेजपासून.. खरेतर शाळेपासून आपली साथ. मग कामानिमित्त माझे दूर राहाणे.. आता असतीस तर तू मला नि मी तुला असलीच पत्रे लिहिली असतीना गं... आज अनावर होऊन लिहायला बसलो तुला.. तर तू लिहिल्यावाचून माझे पत्र कसे होणार गं पूर्ण? मग मी तुझीही लिहून काढली पत्रे.. तू असेच लिहिले असते ना गं.. मी ओळखतो गं तुला.

डाव अर्धा मांडून .. नि मोडून तुला जायला लागले. भातुकलीच्या खेळामधली राणी अर्ध्यावर डाव सोडून गेली. ते गाणे तुला आवडायचे फार. तशी तुला असली गंभीर म्हणा .. किंवा दु:खभरी म्हणा गाणी आवडायची नाहीत. पण हे गाणे आवडायचे तुला. कित्येकदा नकळत पाणी यायचे तुझ्या डोळ्यांत ते ऐकताना. मी पाहिलेय ते तुझ्या नकळत. तुला असे होणार हे ठाऊक होते का गं? खरेतर हे जीवनच भातुकलीचा खराखुरा डाव आहे असे वाटायला लागलेय मला. सारे त्यात खोटे हे खेळणाऱ्या चिमुकल्याना समजत नाही.. पण कधीतरी उमजतेच ते! डावावरून कोणीना कोणी कधी ना कधी जाणारच.. पण थोडा वेळ तरी खेळण्यास जास्त मिळावा ना? जर आणि तर.. काय अर्थ आहे सखी आता..बहुधा तुझी गरज त्या स्वर्गात जास्त होती काय न कळे. तू गेलीस सोडूनिया आत सर्व धागे.. हे ही तुझे आवडते गाणे होते ना गं? ती बगळ्यांची माळ अजूनही अंबरात फुलते. सारे काही तसेच.. मीही तसाच आहे वरून.. फक्त तू असतीस तर?


शेवटी एकच.. तू येणार नाहीस हे माहित असूनही.. सखी मंद झाल्या तारका.. आता तरी येशील का?


... जन्मजन्मांतरी तुझाच


(पूर्वप्रसिद्धी : प्रिय पत्रा, ई साहित्य प्रकाशन)


## डॉ. नितीन मोरे यांची ३५+२ प्रकाशित पुस्तके

यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.
















सदू आणि दादू


डॉ. नितीन मोरे












































डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते


डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची परी कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे


Jackson!


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २


सुलट
डॉ. नितीन मोरे

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष
# डॉ. नितीन मोरे यांचे हे छत्तिसावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१३), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन

मोरे (३६), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३१), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(१८), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(९), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(६), श्याम कुलकर्णी(३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक, मंगेश चौधरी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ‘‘इ’’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।